# ५ भारतीय राष्ट्रवादाचा उदय आणि विकास

## भारतातील राष्ट्रवाद

इंग्लंडच्या ईस्ट इंडिया कंपनीने सतराव्या शतकात भारतात व्यापार करण्यास सुरुवात केली; हळूहळू त्यांनी व्यापाराबरोबर राजकारणही केले. इ. स. १७५७ च्या प्लासीच्या लढाईमधील त्यांचा विजय ही भारतातील ब्रिटिश सत्तेच्या स्थापनेची सुरुवात मानली जाते; या लढाईद्वारे ब्रिटिशांनी बंगाल प्रांतात आपली सत्ता प्रस्थापित केली. कंपनीच्या रॉबर्ट क्लाईव्ह, वॉरन हेस्टिंग्ज, लॉर्ड हेस्टिंग्ज, कॉर्नवालीस, वेलस्ली यांसारख्या गव्हर्नर जनरलनी ईस्ट इंडिया कंपनीच्या सत्तेचा भारतात विस्तार केला; मुस्लीम, शीख, मराठे इत्यादी सत्तांना पराभूत केले. आपापसातील संघर्षाने क्षीण झालेल्या भारतीयांना आपल्या एकत्वाची जाणीव परकीय सत्तेच्या वर्चस्वानंतर प्रकर्षाने झाली आणि त्यातून भारतीय राष्ट्रवादाच्या निर्मितीला सुरुवात झाली. यामध्ये विस्मृत झालेले राष्ट्रवादाचे काही घटक असे होते ज्यांची जाणीव पुनश्च झाली, तर काही घटक परकीय सत्तेमुळे निर्माण झाले. या भारतीय राष्ट्रवादाच्या उदयाच्या पार्श्वभूमीची चर्चा या प्रकरणात केली आहे.

**प्राचीन काळातील भारतीय एकात्मता**

भारताचा विस्तार प्रचंड असून त्याला नैसर्गिक सीमा लाभलेल्या आहेत; त्या सीमांनी बद्ध असलेला देश एक आहे याची जाणीव भारतीयांना होती. राजकीयदृष्ट्या एवढ्या विस्तीर्ण प्रदेशात, काही अपवाद वगळता, एकछत्री साम्राज्ये फार काळ टिकली नाहीत. राज्यकर्त्यांमध्ये राज्यविस्तारासाठी संघर्ष होत राहिला; तरीही भारतीयांमध्ये एकात्मता होती. आपण एकाच राष्ट्राचे घटक आहोत ही भावना राजकीय नसली तरी सांस्कृतिक क्षेत्रात निश्चितच होती. भारतातील विविध प्रांतांतील लोकांचे परस्परांशी संबंध होते. भारतात अनेक प्रांतांत विखुरलेल्या पवित्र स्थळांना भेटी देण्यासाठी तीर्थयात्री येत-जात होते. महाभारत व रामायण यांसारख्या महाकाव्यांचा प्रभाव जनमानसावर देशात सर्वत्र होता. सामाजिक आदर्श व नीतिमूल्ये सर्वत्र सारखी होती. डॉ. राममनोहर लोहिया यांनी म्हटल्याप्रमाणे भारताच्या सांस्कृतिक जीवनाचे वस्त्र रामायण व महाभारत या महाकाव्यांच्या उभ्या आणि आडव्या धाग्यांनी विणले गेले होते. प्रादेशिकता आणि भाषिक विविधता यांवर मात करणारी, आपण एकाच समाजाचे घटक आहोत ही एकात्मतेची भावना समाजात अस्तित्वात होती. सिंधू नदीपासून ब्रह्मपुत्रेपर्यंत आणि हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत भारतीय समाज एका अंत:सूत्राने बांधला गेलेला होता. संपूर्ण भारताचे राज्य एका छत्राखाली आणण्याचे चक्रवर्ती पदाचे राजकीय ध्येय प्राचीन काळात होते. ब्रिटिशांच्या सत्तेमुळे काही राजकीय, सामाजिक बदल होऊन आधुनिक काळात अप्रत्यक्षपणे राष्ट्रीय भावना निर्माण होण्यास मदत झाली. हे कोणते बदल ब्रिटिश सत्तेच्या आगमनामुळे झाले, याचा आढावा पुढीलप्रमाणे आहे. हेच बदल भारतीय राष्ट्रवादाच्या निर्मितीबरोबर काँग्रेसच्या (भारतीय राष्ट्रीय सभा) स्थापनेलाही कारणीभूत ठरले. तेव्हा प्राचीन काळात सांस्कृतिक क्षेत्रात राष्ट्रीय भावना किंवा राष्ट्रवाद अस्तित्वात होताच, ब्रिटिशांच्या काळात यात काही अन्य घटकांनी राष्ट्रवाद प्रबळ केला. त्या घटकांचा परिचय पुढीलप्रमाणे आहे–

## भारतातील राष्ट्रवादाच्या निर्मितीची कारणे

(१) **पाश्चात्त्य विद्वानांकडून हिंदू संस्कृतीचा गौरव :** ब्रिटिश सत्ता भारतात स्थापन झाल्यानंतर भारतीय संस्कृती, इतिहास, साहित्य इत्यादींचा अभ्यास त्यांच्या काही विद्वानांनी सुरू केला. इ.स. १८६१ मध्ये कनिंगहॅम यांच्या कार्याने व तळमळीने प्रकाशित होऊन आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली व त्याचे पहिले सर्वेक्षक म्हणून कनिंगहॅम यांची निवड करण्यात आली. कनिंगहॅम यांनी १८६१ पासून भारतात पुरातत्त्वीय उत्खनन हाती घेतले; त्यातून प्राचीन भारताचा इतिहास व तत्कालीन संस्कृतीचे ज्ञान भारतीयांना झाले. त्याशिवाय मॅक्समुलर, विल्सन, फर्ग्युसन आदी विद्वानांनी, प्राचीन भारतीयांनी विविध क्षेत्रांत केलेल्या प्रगतीची माहिती देऊन ग्रीक व रोमन संस्कृतीसारखीच भारतीय संस्कृती प्रगत व श्रेष्ठ असल्याचे दाखवून दिले. यातून भारतीयांना त्यांना लाभलेल्या संपन्न, ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाची जाणीव झाली; तसेच भारताने एके काळी इतरांपेक्षा केलेल्या अधिक प्रगतीचा परिचय भारतीयांना होऊन त्याचा अभिमान त्यांना वाटला. यातून त्यांचा आत्मविश्वास वाढला व पुन्हा एकदा ते वैभव आपण निर्माण करू शकू, अशी उमेद त्यांच्यात निर्माण झाली. या पाश्चात्त्य विद्वानांनी वैदिक आर्यांनी रचलेले वेद हे जगातील प्राचीनतम वाङ्मय आहे आणि उपनिषदातील तत्त्वज्ञान हे श्रेष्ठ दर्जाचे आहे हे स्वत:होऊन मान्य केले होते. भारतीय राष्ट्रवादाला असा ऐतिहासिक वारशाचा आधार मिळाला. वेगळ्या भूमिकेतून विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी आपल्या 'आमच्या देशाची स्थिती' या निबंधातून प्राचीन भारतीयांच्या कर्तृत्वाचा आलेख मांडून दाखवला होता आणि भारतीयांनी प्राचीन काळात विविध क्षेत्रांत केलेल्या प्रगतीची जाणीव तत्कालीन देशबांधवांना करून दिली होती.

(२) **प्रशासकीय केंद्रीकरण, शांतता आणि स्थैर्य :** भारतात ब्रिटिश सत्तेच्या स्थापनेमुळे बऱ्याच कालावधीनंतर पुन्हा एकदा एकछत्री सत्ता प्रस्थापित झाली आणि यातून राजकीय ऐक्य घडून आले. संस्थानिकांना काही प्रमाणात स्वायत्तता देऊन अखिल भारत ब्रिटिश सत्तेखाली आणला गेला. सर्व भारतीयांना एकच सत्ता, एकच कायदा, समान प्रशासकीय धोरण याचा अनुभव आला; परंतु यामुळे आजवर ज्या भारतीयांना वेगवेगळ्या सत्ताधीशांच्या सत्तेखाली वावरावे लागत होते त्यांना आपण एकाच राष्ट्राची प्रजा आहोत ही एकत्वाची जाणीव झाली. आपली दु:खे, अडचणी, प्रश्न आणि मागण्या समान आहेत, याचीही जाणीव भारतीयांना झाली. परकीय सत्तेचे अस्तित्व अशा रीतीने भारतीयांना एकत्र आणण्यास कारणीभूत ठरले.

(३) **दळणवळण आणि संदेशवहनाची आधुनिक साधने :** एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटिशांनी रेल्वेचे जाळे भारतात विणण्यास सुरुवात केली. रेल्वेमुळे विभिन्न प्रांतांतील लोकांची एकमेकांच्या प्रदेशात ये-जा वाढली. रेल्वेसारखे वेगवान दळणवळणाचे साधन उपलब्ध झाल्यामुळे लोकांचा प्रवासाद्वारे परस्परांशी संपर्क वाढला; त्यातून आपल्या देशातील भौगोलिक स्थिती, लोकजीवन, संस्कृती, इतिहास यांबद्दलची माहिती वाढली आणि देशाबद्दलची आस्था वाढीला लागली.

रेल्वे किंवा अन्य दळणवळणाच्या साधनांत वाढ करण्यात ब्रिटिशांचा हेतू प्रामुख्याने आपली सत्ता मजबूत करणे, व्यापार वाढविणे व भारताचे संरक्षण करणे हा होता; तरीही याचे काही फायदे भारतीयांना झाले. विविध प्रांतांतील भारतीय नेत्यांना, विचारवंतांना व इतरांना परस्परांशी विचार-विनिमय करणे शक्य झाले. यातूनच अखिल भारतीय स्वरूपाची काँग्रेससारखी संघटना उभी राहिली. पोस्ट आणि तारयंत्रांमुळे देशाच्या विविध भागांतील लोकांना परस्परांशी तातडीने संपर्क साधण्यात मदत झाली; बातम्या एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी त्वरित पोहोचवल्या जाऊ लागल्या, ही बाब भारतीयांच्या ऐक्यभावनेला उपकारक ठरली.

(४) **ब्रिटिश सत्तेविरुद्ध असंतोष :** ब्रिटिश सत्तेच्या स्थापनेनंतर त्यांच्याविरुद्ध भारतीयांच्या मनात विविध कारणांनी असंतोष निर्माण झाला. ब्रिटिशांचे भारतीयांबद्दलचे वंशविद्वेषाचे व आर्थिक शोषणाचे धोरण, डोईजड कर, प्रजेच्या न्याय्य मागण्यांकडे केलेले दुर्लक्ष, इत्यादी कारणे या असंतोषामागे होती. ब्रिटिश शासनाने ऑगस्ट, १८६०

मध्ये आयकर कायदा (इन्कम टॅक्स) लागू केला. भारतीय व्यापारी, ज्यांना या कराची झळ पोहोचत होती अशा भारतीयांनी या कराविरुद्ध असंतोष व्यक्त केला. याच सुमारास बंगाल-बिहार भागांत नीळ पिकविण्याची सक्ती ज्या भारतीय शेतकऱ्यांवर होत होती त्यांनी इंग्रज मळेवाल्यांविरुद्ध संघर्ष सुरू केला. इ.स.१८५९-६२ या काळात नीळ पिकविणाऱ्या शेतकऱ्यांचे आंदोलन चालले. दारिद्र्य, उपासमार, अन्नधान्याचा तुटवडा यांनी संत्रस्त झालेल्या भारतीयांनी बंगाल (१८७३) आणि महाराष्ट्रात (१८७५) उठाव केले. ब्रिटिश सत्ताधाऱ्यांच्या मदतीने ख्रिश्चन मिशनऱ्यांनी हिंदू धर्मावर केलेली टीका, हिंदूंचे घडवून आणलेले धर्मांतर, ख्रिश्चन धर्माचा प्रसार याची भारतीय जनतेत तीव्र प्रतिक्रिया उमटली.

(५) **ब्रिटिशांचे वंशविद्वेषाचे धोरण :** ब्रिटिशांना आपल्या गोऱ्या कातडीचा, रंगाचा आणि वंशाचा फार अभिमान होता; त्या वेळेस ते भारतीयांना पराभूत करून भारतीयांवर राज्य करीत असल्यामुळे हा अहंकार अधिकच होता. भारतीयांनी अनेक क्षेत्रांत कर्तबगारी दाखविली असली तरी भारतीयांना सदैव तुच्छ लेखणे हे ब्रिटिशांचे धोरण होते. रेल्वेच्या एकाच डब्यात भारतीयांना इंग्रजांबरोबर प्रवास करण्यास प्रतिबंध करणे, भारतीयांना गोऱ्या व्यक्तीस अभिवादन करण्याबद्दल सक्ती करणे, गोऱ्या मालकांकडून त्यांच्या भारतीय नोकरांना केली जाणारी अमानुष मारहाण, इत्यादी ब्रिटिशांच्या उद्दामपणाची व वंशद्वेषाची उदाहरणे होती; तसेच नीळ पिकविणाऱ्या भारतीय शेतकऱ्यांवरील युरोपीय मालकांकडून होणारे अत्याचार, चहाच्या मळ्यातील भारतीय कामगारांना मळे-मालकांकडून होणारी मारहाण, भारतीय सैनिकांना लष्करात दिली जाणारी तुच्छतेची व उपेक्षेची वागणूक, ही ब्रिटिशांच्या वंशद्वेषी धोरणाची आणखी काही उदाहरणे होती.

न्यायदानाच्या क्षेत्रात ब्रिटिशांचा पक्षपात जाणवण्याइतपत होता. भारतीय न्यायाधीशांसमोर एखाद्या गोऱ्या ब्रिटिश आरोपीचा खटला चालविणे हा त्या आरोपींना अपमानास्पद वाटत असे; आणि म्हणूनच ते त्यांना अमान्य होते. गोऱ्या आरोपींना भारतीयांची हत्या केल्याबद्दल बऱ्याच वेळा शिक्षा होत नसे आणि झालीच तर अगदी नाममात्र असे. ग्रामीण भागात गोऱ्या आरोपींवर स्थानिक न्यायालयात खटला भरता येत नसे; यामुळे त्यांना भारतीयांवर अत्याचार करण्यास दिक्कत वाटत नसे.

न्यायदानाच्या क्षेत्रातील विषमता दूर करण्याच्या हेतूने गव्हर्नर जनरल रिपन याने फेब्रुवारी, १८८३ मध्ये एक विधेयक मांडले; या विधेयकानुसार जिल्हा व सत्र न्यायाधीश पदावरील भारतीय न्यायाधीशाला युरोपीय आरोपींवरील खटला ग्रामीण व शहरी भागांत चालविण्याचा अधिकार देण्याची तरतूद करण्यात आली होती. हे बिल इलबर्ट यांनी तयार करून मंजुरीसाठी लेजेस्लेटिव्ह कौन्सिलमध्ये मांडले; परंतु भारतातील गोऱ्या मंडळींनी या बिलाला विरोध केला; कारण भारतीय न्यायाधीशांसमोर आपला खटला चालविला जाणे त्यांना मान्य नव्हते; त्यांनी बिलाविरुद्ध चळवळ उभी केली. यातून ब्रिटिशांच्या वंशश्रेष्ठत्वाचा अहंकार पुन्हा एकदा स्पष्ट झाला. अखेर रिपनला इलबर्ट बिलाबाबत माघार घ्यावी लागली.

सनदी नोकऱ्यांच्या बाबत ब्रिटिश राज्यकर्ते पक्षपाती होते. १८५७ च्या उठावानंतर इंग्लंडच्या राणीने आपल्या जाहीरनाम्यात भारतीयांना आश्वासन दिले होते की, वंश, वर्ण (रंग) आणि धर्माच्या आधारावर त्यांच्याबाबत कोणताही पक्षपात केला जाणार नाही; परंतु या आश्वासनाचे उल्लंघन ब्रिटिश शासनाने सतत केले. अधिकार, चांगला पगार आणि प्रतिष्ठा असलेली पदे इंग्रजांनाच मिळत असत. भारतीय प्रशासन सेवेत (इंडियन सिव्हिल सर्व्हिस) प्रवेश फक्त इंग्रजांनाच मिळत असे. इ .स. १८५३ पासून भारतीय तरुणांना या सेवेसाठी असलेल्या स्पर्धात्मक परीक्षेला बसण्याची परवानगी देण्यात आली; तरीही ब्रिटिशांना ब्रिटिश साम्राज्यशाहीचा कणा असलेल्या या महत्त्वपूर्ण प्रशासन सेवेत भारतीय तरुणांना संधी मिळावी असे वाटत नव्हते आणि याच हेतूने त्यांनी वेगवेगळे नियम आणि अटी घालून भारतीय तरुणांसमोर अडचणी निर्माण केल्या. ही परीक्षा फक्त इंग्लंडमध्ये घेतली जाई

आणि परीक्षेसाठीची वयोमर्यादा खाली आणण्यात आली. भारतीय पालकांना इतक्या लहान वयात इंग्लंडमध्ये परीक्षेसाठी प्रचंड खर्च करून आपल्या मुलांना पाठविणे शक्य नव्हते; तरीही जे भारतीय बुद्धिमान तरुण या परीक्षेत पास होत, त्यांच्यासमोर वेगळ्या अडचणी उभ्या केल्या जात. यामुळेच भारतीयांनी ही परीक्षा इंग्लंडप्रमाणेच भारतातही घेतली जावी आणि परीक्षेसाठीची वयोमर्यादा वाढविली जावी अशी मागणी केली. थोडक्यात, भारतीयांना प्रशासन सेवेत येऊ न देण्यासाठी निर्माण केलेल्या अडचणी पाहता ब्रिटिशांचे वंशद्वेषी धोरण पुरेसे स्पष्ट होते.

(६) **पाश्चात्त्य शिक्षणाचा प्रभाव** : गव्हर्नर जनरल विल्यम बेंटिंकच्या कारकिर्दीत भारतात इंग्रजी भाषेतून शिक्षण देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. इ.स. १८३५ मध्ये मेकॉलेने जे धोरण याबाबत मांडले, त्यात भारतात पाश्चात्त्य ज्ञान दिले जावे आणि ते इंग्रजी भाषेतून दिले जावे अशी तरतूद होती. यामागे हेतू असा होता की, भारतात शरीराने भारतीय परंतु मनाने, वृत्तीने इंग्रजी असा भारतीय तरुण तयार व्हावा, जो इंग्रजांच्या नोकरशाहीलासुद्धा उपयुक्त होईल. ब्रिटिशांची ही अपेक्षा काही प्रमाणात पूर्ण झाली.

याउलट, वेगवेगळ्या मार्गांनी भारताच्या राष्ट्रीय ऐक्याला व राष्ट्रीय जागृतीला इंग्रजी शिक्षण कारणीभूत ठरले. पाश्चात्त्यांचे अंधानुकरण करणारी मंडळी समाजाच्या उपहासाला आणि टीकेला पात्र ठरली; त्याऐवजी पाश्चात्त्यांचे अंधानुकरण न करता, पाश्चात्त्य ज्ञानाच्या आधारे भारतीय समाजाला आधुनिक व प्रगतिशील बनवू पाहणाऱ्या सुशिक्षितांचा वर्ग भारतीयांच्या आदराला पात्र ठरला.

इंग्रजी भाषेतून शिक्षण घेतलेल्या भारतीय विद्यार्थ्यांना सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, व्हॉल्तेअर, रूसो, हॉब्स, मॉन्तेस्क्यू, मिल, स्पेन्सर, बैंथम, एडमंड बर्क आणि इतर विचारवंतांचे विचार व तत्त्वज्ञान वाचावयास मिळाले. या विचारवंतांनी मांडलेल्या स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, उदारमतवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, जनतेचे सार्वभौमत्व, मानवतावाद, सत्तेचे विभाजन इत्यादी राजकीय व सामाजिक विचारांचा भारतीय सुशिक्षितांवर परिणाम झाला. पुढच्या भारतीय राष्ट्रवादाच्या जडणघडणीत, सामाजिक सुधारणांमध्ये व स्वातंत्र्याच्या चळवळीवर या विचारांचा परिणाम झालेला दिसतो.

पाश्चात्त्य ज्ञानाबरोबर पाश्चात्त्य देशांचा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय इतिहास उच्चशिक्षित तरुणांच्या वाचनात आला. जागतिक इतिहासात महत्त्वपूर्ण ठरलेल्या अमेरिकेचे स्वातंत्र्ययुद्ध, फ्रेंच राज्यक्रांती, इटली व जर्मनीचे एकीकरण आणि त्यातील जोसेफ मॅझिनी व गॅरिबाल्डी यांची भूमिका, इंग्लंडमधील लोकशाहीची वाटचाल, आयर्लंडमधील आयरिश लोकांची स्वातंत्र्याची चळवळ इत्यादींचे ज्ञान भारतीय सुशिक्षित तरुणांना झाले. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धातील मानवी हक्कांचा जाहीरनामा आणि फ्रेंच राज्यक्रांतीमधील स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यांचा परिचय भारतीय तरुणांना झाला. हे ज्ञान राष्ट्रवाद, स्वातंत्र्य, लोकशाही यांच्या बाजूने आणि वसाहतवादविरुद्ध संघर्ष यांना प्रेरणा देणारे ठरले. आपल्या देशात लोकशाही हक्कांसाठी संघर्ष करणारे ब्रिटिश इतरांसाठी किती कट्टर साम्राज्यवादी आहेत हे त्यांच्या लक्षात आले; तसेच औद्योगिक क्रांतीमुळे इंग्लंडची झालेली प्रगती आणि त्याद्वारे विज्ञान, तंत्रज्ञान व औद्योगिक प्रगतीचे महत्त्व भारतीय सुशिक्षित तरुणांच्या लक्षात आले. याचबरोबर, वैज्ञानिक दृष्टिकोन, विवेकनिष्ठ विचार-पद्धती, इत्यादी विचारांचे महत्त्व त्यांना पटले. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी इंग्रजी शिक्षणाला वाघिणीच्या दुधाची उपमा दिली ती योग्य होती. अर्थात, चिपळूणकर पाश्चात्त्यांचे सर्वच चांगले असे म्हणणारे नव्हते. उलट, प्राचीन काळातील भारतीयांनी केलेल्या प्रगतीबद्दल त्यांना अभिमान होता. इंग्रजी शिक्षणाने पाश्चात्त्य ज्ञानाचा परिचय करून देणारी खिडकी उघडली.

इंग्रजी शिक्षणामुळे विविध प्रांतांतील नव्या सुशिक्षित वर्गाला एकत्र येण्यास, परस्परांचे विचार समजून घेण्यास आणि समान वैचारिक भूमिका स्वीकारण्यास मदत झाली. विविध भाषिक भारतीय समाजात इंग्रजी भाषा हे विचारांच्या देवाण-घेवाणीचे माध्यम बनले. स्वातंत्र्यपूर्व काळातील विविध प्रांतांतील राजकीय नेत्यांचा पत्रव्यवहार पाहिल्यास हे सहज लक्षात येते. इंग्रजी भाषेने भारतीयांमध्ये संपर्क भाषा म्हणून कामगिरी पार पाडली.

पाश्चात्त्य शिक्षण इंग्रजीतून दिल्यामुळे पाश्चात्त्य संस्कृती व विचारांचाही प्रभाव भारतीय तरुणांवर पडला. पाश्चात्त्यांमधील तर्कनिष्ठ दृष्टिकोन, चिकित्सक वृत्ती, व्यक्तिस्वातंत्र्य इत्यादींनी युरोपीय समाज प्रभावित झाला होता; तसेच अंधश्रद्धेच्या जागी बुद्धिप्रामाण्य, सामाजिक न्याय आणि राजकीय हक्क या संकल्पना पाश्चात्त्यांकडून भारतीय तरुणांनी घेतल्या. भारतातील समाजात असलेल्या अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, परंपरा यांच्याकडे ते चिकित्सक दृष्टीने पाहू लागले. आपल्या पराभवात त्यांना समाजाचे काही दोष जाणवले आणि ते दूर करण्याचा प्रयत्न सुशिक्षित भारतीयांनी केला. प्रगतीसाठी आवश्यक असलेल्या विचारस्वातंत्र्याचा त्यांनी पुरस्कार केला. सामाजिक समता, व्यक्तिस्वातंत्र्य, चिकित्सक दृष्टिकोन, विज्ञाननिष्ठा, बुद्धिप्रामाण्य इत्यादी मूल्यांवर आधारित भारतीय समाजाची पुनर्रचना करण्याचा निश्चय त्यांनी केला. पाश्चात्त्य ज्ञानाच्या संपर्काने भारतीय प्रबोधन घडून आले. त्याद्वारे राष्ट्रवादी, नव्या मूल्यांवर आधारित समाज निर्माण होण्यास मदत झाली.

इंग्रजी शिक्षणामुळे सुशिक्षित भारतीय बहुसंख्य अशिक्षित समाजापासून दुरावले नाहीत. उलट शिकलेल्या तरुणांनी आपल्या समाजाच्या मागण्या आणि प्रश्न शासनासमोर मांडले. इंग्लंडमध्ये नागरिकांना असलेले हक्क आणि भारतासारख्या वसाहतीमधील नागरिकांच्या वाट्याला येणारे अपमानित जिणे यांतील फरक शिकलेल्या भारतीयांच्या लक्षात आला. यासाठी लढा देण्याची प्रेरणा इंग्लंडच्या इतिहासातील लोकशाहीच्या लढ्यातून मिळाली.

(७) **धार्मिक व सामाजिक प्रबोधन :** पाश्चात्त्य संस्कृती, ज्ञान व विचारांशी संपर्क आल्यानंतर सुशिक्षित भारतीय तरुणांमध्ये काही बदल घडून आले; त्यांच्यापैकी काहींनी आपल्या समाजाच्या पराभवाची कारणमीमांसा केल्यावर आपल्या सामाजिक व धार्मिक जीवनात त्यांना काही दोष दिसून आले; ते दोष दूर करण्याचा निर्धार या तरुणांनी केला. अतिशय चिकित्सक वृत्तीने त्यांनी धर्म व समाजव्यवस्थेचा अभ्यास केल्यानंतर त्यातील अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, चालीरीती, परंपरा, कर्मकांड इत्यादी दूर करून धर्म शुद्ध व निर्दोष स्वरूपात लोकांसमोर मांडण्याचे ठरविले; त्याचबरोबर पाश्चात्त्य संस्कृतीमधील बुद्धिप्रामाण्य, विज्ञाननिष्ठा इत्यादी चांगली मूल्ये घेऊन आपल्या समाजाची पुनर्रचना करण्याचे त्यांनी ठरविले. एकोणिसावे शतक हे सामाजिक आणि धार्मिक प्रबोधनाचे होते.

या सामाजिक व धार्मिक प्रबोधनाची सुरुवात राजा राममोहन रॉय यांनी केली. त्यांनी १८२८ मध्ये ब्राह्मो समाजाची स्थापना केली. या संघटनेची मंडळी वेदप्रामाण्य मानणारी, एकेश्वरवादावर विश्वास ठेवणारी आणि मूर्तिपूजेला विरोध करणारी होती. त्याचबरोबर स्त्री-पुरुष समता, मानवाची प्रतिष्ठा, बुद्धिप्रामाण्य इत्यादींचा राजा राममोहन रॉय यांनी पुरस्कार केला. पौर्वात्य आणि पाश्चिमात्य ज्ञानाचा आणि मूल्यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न त्यांनी केला. सती प्रथेसारख्या कुप्रथांना ब्राह्मो समाजाचा विरोध होता आणि सती प्रथा थांबविण्यासाठी त्यांनी ब्रिटिश शासनाकडे पाठपुरावा केला. स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या हीनतेच्या वागणुकीविरुद्ध त्यांनी आवाज उठवला. या संदर्भात त्यांनी बहुपत्नीत्वाला विरोध केला. पारंपरिक व आधुनिक शिक्षणाचा पुरस्कार करूनच राममोहन रॉय थांबले नाहीत तर त्यांनी स्वत: शिक्षणसंस्था उघडून या कार्याचा प्रारंभ केला. आपल्या विचारांच्या प्रसारासाठी त्यांनी वृत्तपत्रेही काढली. राममोहन रॉय भारतीय प्रबोधनाचे जनक किंवा प्रणेते म्हणून ओळखले जातात; त्यांच्यानंतर केशव चंद्रसेन व ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी स्त्रियांचे हक्क, विधवापुनर्विवाह, स्त्री-शिक्षण, कामगारांचे शिक्षण इत्यादी बाबतींत मोलाचे कार्य केले; तसेच बहुपत्नीत्व, जातिभेद यांना विरोध केला.

महर्षी दयानंद यांनी इ. स. १८७५ मध्ये मुंबई येथे आर्य समाजाची स्थापना केली; आर्य समाजाने सामाजिक सुधारणा व भारतीय राष्ट्रवाद यांना गती दिली. वेदप्रामाण्य आणि त्यातील धर्मतत्त्वांच्या आधारे भारतीय समाजाचे पुनरुज्जीवन करणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. बालविवाह, स्त्रियांवरील बंधने, जातिव्यवस्था, मूर्तिपूजा, अस्पृश्यता इत्यादींना आर्य समाजाने विरोध केला. याउलट, स्त्री-शिक्षण, हिंदू धर्माच्या रक्षणासाठी शुद्धी मोहीम (हिंदू धर्म सोडून परधर्मात गेलेल्यांना पुन्हा हिंदू धर्मात परत आणणे) इत्यादींचा पुरस्कार केला. पौर्वात्य आणि पाश्चिमात्य

(८) **भारतीय वृत्तपत्रांचे कार्य** : भारतीय वृत्तपत्रांनी, विशेषतः भारतीय भाषांमधील वृत्तपत्रांनी, राष्ट्रवादाच्या निर्मितीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. परकीय राज्यकर्ते भारतीयांचे जे शोषण करीत होते, अन्याय व जुलूम करीत होते, त्याला वाचा फोडण्याचे कार्य वृत्तपत्रांनी केले. जनतेचे प्रश्न, गाऱ्हाणी, असंतोष यांनाही वृत्तपत्रांनी सरकारसमोर मांडले. इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारानंतर शिकलेली तरुण मंडळी वृत्तपत्रांच्या क्षेत्रात उतरली. या मंडळींना ब्रिटिश साम्राज्याच्या खऱ्या स्वरूपाची आणि भारतीयांवरील त्याच्या दुष्परिणामाची जाणीव होती. भारतीय वृत्तपत्रांच्या संपादकांनी जनतेमध्ये राष्ट्रीय जागृती घडवून आणली. वृत्तपत्र हा व्यवसाय म्हणून न करता समर्पित भावनेने, स्वातंत्र्याच्या चळवळीचे एक साधन म्हणून त्याच्याकडे पाहिले गेले. या काळात बंगालमध्ये 'हिंदू पॅट्रिऑट', 'इंडियन मिरर', 'अमृत बझार पत्रिका', 'बेंगाली' इत्यादी वृत्तपत्रे प्रमुख होती. मद्रास प्रांतात 'दि हिंदू' तर मुंबई प्रांतात 'ज्ञानप्रकाश', 'प्रभाकर', 'मराठा', 'केसरी', 'काळ' इत्यादी वृत्तपत्रे प्रमुख होती. दिल्ली, पंजाब भागांत 'ट्रिब्यून' हे वृत्तपत्र प्रमुख होते. लोकमान्य टिळकांच्या लेखणीचा म्हणजेच त्यांच्या 'केसरी' या वृत्तपत्राचा धाक ब्रिटिश शासनालाही होता; यावरून वृत्तपत्रांच्या प्रभावाची कल्पना केली जाऊ शकते.

(९) **भारतीय साहित्य** : त्या काळात म्हणजेच एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतातील विविध प्रादेशिक भाषांमध्ये निर्माण होणाऱ्या साहित्यावर राष्ट्रवाद आणि स्वातंत्र्याच्या भावनेचा प्रभाव होता. बंगाली भाषेतील बंकिमचंद्र चटर्जी यांची 'आनंदमठ' कादंबरी आणि त्यातील 'वंदे मातरम्' हे गीत स्वातंत्र्य चळवळीत लोकप्रिय ठरले. 'वंदे मातरम्' हे गीत आणि घोषणा स्वातंत्र्य चळवळीचा मंत्र बनली; बंकिमचंद्र यांची 'दुर्गेश नंदिनी' ही दुसरी कादंबरीसुद्धा लोकप्रिय ठरली. दीनबंधू मित्र यांचे 'नील-दर्पण' हे नाटक युरोपीय मळेवाल्यांचे भारतीय शेतकऱ्यांवरील अत्याचार दाखविण्यात प्रभावी ठरले. मराठी साहित्यात विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची 'निबंधमाला' राष्ट्रवादाची प्रेरणा देणारी होती. विशेषतः त्यातील 'आमच्या देशाची स्थिती' या निबंधात भारतीयांच्या विविध क्षेत्रांतील कामगिरीचा आढावा घेऊन त्यांच्यामधील पराभूततेची जाणीव नष्ट करून त्यांच्यात विजिगीषू वृत्ती निर्माण करण्याचा प्रयत्न चिपळूणकरांनी केला; मराठी भाषेत पौराणिक कथावस्तूंवर आधारित नाटकांतून राष्ट्रवाद आणि ब्रिटिश सत्तेविरुद्ध भावना जागृत करण्याचे कार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांच्या 'किचकवध'सारख्या नाटकांनी व अन्य साहित्यकृतींनी पार पाडले. कविता, नाटके, कादंबऱ्या इत्यादी साहित्यांतून राष्ट्रवादनिर्मितीचे कार्य भारतीय भाषांमधील साहित्याने पार पाडले.

(१०) **आर्थिक शोषण** : ब्रिटिश शासकांनी आपल्या राजकीय सत्तेचा वापर करून भारतात अशा प्रकारची आर्थिक धोरणे आखली की, ज्यामुळे भारतीयांच्या व्यापार व उद्योगांना धक्का बसला व ते जवळजवळ नष्ट झाले. भारतातील दारिद्र्याला ब्रिटिशांची साम्राज्यवादी आर्थिक धोरणे कारणीभूत होती. भारतीयांवर प्रचंड कर होते; इंग्रजांच्या मुलकी व लष्करी अधिकाऱ्यांना भरपूर पगार व भत्ते भारतीयांच्या उत्पन्नापासूनच दिले जात होते; भारतातून कापसासारखा कच्चा माल इंग्लंडमध्ये कमी दराने नेऊन तेथील गिरण्यांमधील कापड जास्त दराने भारतात विकून भारतीयांचे शोषण चालविले होते; इंग्लंड भारतातून संपत्ती लुटून नेत आहे आणि भारतातून संपत्तीचा ओघ इंग्लंडकडे वाहत आहे, असा लुटीचा किंवा शोषणाचा सिद्धान्त (Drain Theory) दादाभाई नौरोजी यांनी मांडला. आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ त्यांनी आकडेवारी सादर केली. दादाभाईंनी असे सांगितले की, भारतातील ब्रिटिश सैनिकांचे पगार, भत्ते इत्यादींवरील खर्च प्रचंड होता. इंग्लंड आपल्या वसाहतींच्या संरक्षणासाठी करीत असलेल्या खर्चापेक्षा हा खर्च अधिक होता. भारतात कराच्या रूपाने ब्रिटिश शासनाने गोळा केलेल्या रकमेपैकी बरीच रक्कम इंग्लंडमध्ये पाठविली जात होती. भारताची आयात जास्त आणि निर्यात कमी होती; त्यामुळे भारतीयांचे आर्थिक नुकसान होत होते. भारतीयांचे दरडोई उत्पन्न ब्रिटिश नागरिकांच्या तुलनेत खूपच कमी होते, जेव्हा की भारतात कराचे प्रमाण तिथल्यापेक्षा अधिक होते; तसेच भारतातील हस्तोद्योगांवर प्रतिकूल परिणाम करणारी आर्थिक धोरणे

इंग्रजांनी स्वीकारली. उदाहरणार्थ– भारतीय विणकरांना लागणाऱ्या सुतावर कर बसवून ते महाग केले, तर इंग्लंडमधून आयात केल्या जाणाऱ्या कापडावर जकात कमी करून ते स्वस्त केले. भारताचे दारिद्र्य, दुष्काळ, बेकारी इत्यादींच्या कारणांची आर्थिक मीमांसा करून याला ब्रिटिशांचा साम्राज्यवाद कारणीभूत होता हे दादाभाईंनी आकडेवारीनिशी सिद्ध करून आर्थिक राष्ट्रवादाला चालना दिली.

दादाभाई नौरोजींप्रमाणे न्यायमूर्ती रानडे, रमेशचंद्र दत्त यांनीही या विषयावर लिखाण केले; विशेष म्हणजे भारतीयांच्या आर्थिक दुर्दशेची भारतीय विद्वानांनी केलेली मीमांसा खरी असल्याचा व त्याला इंग्लंडचे साम्राज्यवादी धोरण कारणीभूत असल्याचा निर्वाळा काही ब्रिटिश अधिकाऱ्यांनीही दिला; यामध्ये विल्यम डिग्बी, सर जॉर्ज कॅम्पबेल आदींचा समावेश होता. रमेशचंद्र दत्त यांनी दुष्काळाची आणि त्यातील मनुष्यहानीची कारणमीमांसा करून याला ब्रिटिश शासनाने लादलेला प्रचंड जमीन महसूल व त्याची सक्तीने केलेली वसुली कारणीभूत होती, असा निष्कर्ष काढला.

(११) **लॉर्ड लिटनची कारकीर्द (१८७६–७८)** : गव्हर्नर जनरल लॉर्ड लिटनच्या कारकिर्दीत भारतीयांना ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या उद्दाम वृत्तीचा अनुभव आला; या काळातील भारतातील फार मोठ्या भागात दुष्काळ पडले. दुष्काळापाठोपाठ ताप व कॉलरा यांच्या साथीने समाजाला आणखी एका संकटाला तोंड द्यावे लागले; दुष्काळात लक्षावधी माणसे मृत्युमुखी पडली; दुष्काळनिवारणासाठी ब्रिटिश शासनाने दिलेली मदत फारच अपुरी होती. शासनाने भारतीय जनतेच्या केलेल्या उपेक्षेमुळे परकीय राजवटीचे निर्दयी स्वरूप स्पष्ट झाले.

या पार्श्वभूमीवर इंग्लंडची राणी व्हिक्टोरिया हिने 'भारताची सम्राज्ञी' हा किताब धारण केल्याची घोषणा करण्यासाठी लिटनने इ. स. १८७७ मध्ये दिल्ली येथे दरबार आयोजित केला. या दरबारात प्रचंड पैसा खर्च करून ब्रिटिश साम्राज्याच्या वैभवाचे प्रदर्शन करण्यात आले. दुष्काळाने तडफडणाऱ्या भारतीयांना हा दरबार म्हणजे जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार होता.

त्याच वेळी लिटनने भारतातील विविध भाषिक वृत्तपत्रांवर अनेक बंधने घालणारा व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्ट इ. स. १८७८ मध्ये पास केला; वृत्तपत्रे शासनावर टीका करणार नाहीत, अशी हमी त्यांच्याकडून लेखी स्वरूपात घेण्यात आली; त्याचबरोबर त्यांच्याकडून अनामत रक्कम सक्तीने घेण्यात आली. सरकारवर टीका केल्यास अनामत रकमेसह वृत्तपत्रांची सर्व मालमत्ता जप्त करण्याचा अधिकार व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्टने शासनाला मिळाला; विशेष म्हणजे शासनाच्या कार्यवाहीविरुद्ध न्यायालयात जाण्याचा अधिकार वृत्तपत्रांना नव्हता. भारतीयांच्या विचारस्वातंत्र्यावर हा मोठा आघात होता; परंतु हा कायदा इंग्रजी भाषेतील वृत्तपत्रांना लागू करण्यात आला नव्हता. लिटनने भारतीयांना परवान्याशिवाय शस्त्रे बाळगण्यास बंदी करणारा कायदा पास केला; याही ठिकाणी लिटनने पक्षपाती वागणूक देऊन अँग्लो–इंडियन व युरोपियनांना हा कायदा लागू केला नव्हता. अशा रीतीने लिटनच्या कारकिर्दीमुळे ब्रिटिश सत्तेविरुद्ध असंतोष निर्माण होण्यास मदत झाली. यातूनच भारतीय राष्ट्रवाद अधिक बळकट झाला. अशा विविध कारणांनी भारतात राष्ट्रवादाचा उदय झाला.

## काँग्रेसच्या स्थापनेपूर्वीच्या राजकीय संस्था

इ. स. १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय सभेच्या म्हणजेच काँग्रेसच्या स्थापनेपूर्वी भारतीयांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी काही प्रांतांत संस्था स्थापन करण्यात आल्या होत्या. ज्या इलाख्यात (प्रेसिडेन्सी) इंग्रजांचे राज्य प्रारंभी होते त्या ठिकाणी राजकीय जागृती सर्वांत प्रथम झालेली दिसते. उदाहरणार्थ– बंगाल, मद्रास आणि मुंबई. या संस्था बंगाल, मद्रास आणि मुंबई प्रांतातच प्रारंभी स्थापन झालेल्या दिसून येतात.

राजकीय चळवळीचा प्रारंभही बंगालमध्ये राजा राममोहन रॉयपासून झालेला दिसतो. आपल्या हक्कांबद्दल जनतेने जागरूक राहून त्यासाठी लढा दिला पाहिजे, असे त्यांचे मत होते. वृत्तपत्रासंबंधी एक अध्यादेश

सामताचा ...

## काँग्रेसमधील मवाळांचे राजकारण

काँग्रेसच्या प्रारंभीच्या कालखंडातील नेतृत्व हे मवाळ नेतृत्व म्हणून ओळखले जाते. इ. स. १९०५ नंतर काँग्रेसअंतर्गत तरुणांचा एक गट उदयास आला, जो मवाळांपेक्षा धोरणात्मकदृष्ट्या वेगळा होता. हा नवा गट जहाल गट म्हणून ओळखला गेला. मवाळांची ब्रिटिश शासनाकडे पाहण्याची दृष्टी, आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी त्यांनी स्वीकारलेले मार्ग आणि त्यांचे कार्यक्रम जहालांपेक्षा वेगळे होते आणि त्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे होते–

### मवाळ नेतृत्व

जन-आंदोलने, चळवळ या मार्गांनी ब्रिटिश शासनाची नाराजी ओढवून न घेण्याच्या या धोरणामुळेच या काळातील काँग्रेसच्या नेतृत्वाला मवाळ नेतृत्व आणि या कालखंडाला मवाळांचा कालखंड म्हणून ओळखले जाते. मवाळांची भाषा सदैव विनंतीची आणि आग्रहाची राहिली; हक्काची किंवा आव्हानाची नव्हती. आंदोलन करून ब्रिटिश सत्ताधाऱ्यांना दुखविणे, त्यांची नाराजी तथा रोष ओढवून घेऊन आपली संघटना धोक्यात आणावी अशी त्यांची इच्छा नव्हती. पुढे या मताशी सहमत नसलेला तरुणांचा गट उदयाला आला, जो ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवर विश्वास ठेवत नव्हता आणि ब्रिटिश शासनाला जागे करण्यासाठी आंदोलने, चळवळी, तुरुंगवास अशा मार्गांचा वापर आवश्यक असल्यास करावा अशा मताचा होता.

### ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवर विश्वास

काँग्रेसच्या या कालखंडातील बहुतेक पुढाऱ्यांचा ब्रिटिश सत्ताधाऱ्यांच्या न्यायबुद्धीवर विश्वास होता. इंग्लंडमध्ये लोकशाहीची प्रदीर्घ उज्ज्वल परंपरा आहे आणि ब्रिटिश राज्यकर्तेही लोकशाही स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते आहेत असे मवाळांचे मत होते; तसेच ब्रिटिशांकडे उदारमतवादी विचारपरंपरा आहे, तेव्हा ब्रिटिश राज्यकर्ते आज ना उद्या भारतीयांना त्यांच्या मागण्या मान्य करून त्यांना न्याय देतील असा या काळातील काँग्रेसनेतृत्वाचा विश्वास होता. भारतीयांच्या अडचणी, प्रश्न राज्यकर्ते सोडवतील; भारतीयांच्या उद्धारासाठी ते प्रयत्न करतील असा आशावादी दृष्टिकोन मवाळांचा होता.

### सनदशीर मार्गावर विश्वास

सनदशीर, घटनात्मक मार्गांनीच आपल्या मागण्या मान्य करून घ्याव्यात असा काँग्रेसच्या या काळातील नेतृत्वाचा आग्रह होता. या सनदशीर मार्गांमध्ये ठराव, निवेदने, अर्ज, विनंत्या, शिष्टमंडळे, वृत्तपत्रीय लेखन, कायदेमंडळातील भाषणे इत्यादींचा समावेश होता; मात्र, जन-आंदोलने, चळवळी, सशस्त्र उठाव इत्यादींना मवाळांच्या धोरणात स्थान नव्हते. ब्रिटिश राज्यकर्ते, जनता आणि प्रतिनिधी यांच्यासमोर भारतीयांच्या अडचणी, त्यांच्यावरील अन्याय, त्यांचे केले जाणारे शोषण नेटकेपणाने मांडल्यास ते लक्ष देऊन भारतीयांना न्याय देऊन हे सर्व थांबवतील, असा मवाळांचा विश्वास होता; या हेतूनेच मवाळांनी पुन्हा पुन्हा आपल्या मागण्यांचा उच्चार

काँग्रेस अधिवेशनात केला; इंग्लंडमध्ये काँग्रेसची शाखा याच हेतूने स्थापन करण्यात आली होती. इंग्लंडमधील संसद प्रतिनिधी, जनता व बुद्धिजीवी वर्गासमोर भारतीयांची स्थिती मवाळांनी अभ्यासपूर्ण भाषणातून आकडेवारीसह मांडली; मात्र, भारतीयांना स्वत:ची घटना (संविधान) किंवा सनदच नाही तर सनदशीर मार्गाचा अवलंब कशासाठी करावयाचा असा प्रश्न जहालांचा होता. विशेषत: हा मुद्दा लोकमान्य टिळकांनी उपस्थित केला होता. तथापि, यावर राणीचा जाहीरनामा हीच आमच्या हक्कांची सनद आहे असे महादेव गोविंद रानडे यांचे उत्तर होते.

### ब्रिटिश संबंधाबद्दलचा आशावाद

काँग्रेसच्या मवाळांच्या कालखंडातील आधार ब्रिटिश सत्तेबद्दल निष्ठा आणि ब्रिटिश साम्राज्याशी संबंध हा होता. ब्रिटिशांची भारतावरील सत्ता हे 'ईश्वरी वरदान' आहे असे काहींचे म्हणणे होते. ब्रिटिशांच्या साम्राज्यात राहूनच भारतीयांचा विकास आणि प्रगती होऊ शकेल असा मवाळांचा विश्वास होता. शांतता, कायद्याचे राज्य, सुव्यवस्था, समाजाचे आधुनिकीकरण, तंत्रज्ञान व विज्ञानातील प्रगती इत्यादींचा लाभ इंग्रजांमुळेच झाला असल्यामुळे ब्रिटिशांच्या सत्तेखाली राहूनच अधिकाधिक विकास भारतीयांनी साधावा असे मवाळांचे धोरण होते. साहजिकच, ब्रिटिशांना विरोध करून, त्यांना भारतातून घालवून देऊन स्वातंत्र्य मिळावे असा विचार या काळात नव्हता. विशेषत: इंग्लंडमध्ये असलेले ब्रिटिश राज्यकर्ते उदार, विचारी असून त्यांच्यासमोर भारतीयांच्या अडचणी मांडल्यास ते त्या दूर करतील; परंतु त्यांच्यापर्यंत पोहचण्यात अडसर नोकरशाहीचा आहे, जी भारतीयांच्या विरोधात आहे असे मत मवाळांचे होते. या हेतूनेच ब्रिटिश संसद, भारतमंत्री किंवा ब्रिटिश पंतप्रधान यांना भेटून आपली गाऱ्हाणी मांडण्याचा प्रयत्न टिळकांच्या काळातही केला गेला. ब्रिटिश लोकमताचा पाठिंबा व सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न मवाळांनी केला.

मध्ययुगातून भारताला आधुनिकेतेकडे आणण्याचे श्रेय ब्रिटिशांचे आहे आणि विज्ञान तंत्रज्ञान, शिक्षण, कायदा इत्यादी क्षेत्रांत भारताची प्रगती ब्रिटिशांमुळेच झाली आहे आणि पुढे भविष्यात होईल ही मवाळांची विचारसरणी होती; यामुळेच ब्रिटिशांचे राज्य जावे असे मवाळांना वाटत नव्हते. स्वराज्याला पर्याय सुराज्य नव्हे, हे धोरण नंतर उदयाला आलेल्या जहालांनी मांडले.

### सावकाश सुधारणा हा मार्ग

विविध राजकीय आणि प्रशासकीय सुधारणा हळूहळू घडवून आणाव्यात यावर मवाळांचा विश्वास होता. स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार, कायदेमंडळात भारतीयांना वाढते प्रतिनिधित्व, शासकीय सेवेत भारतीयांना संधी इत्यादी मागण्या त्यांनी केल्या. स्वराज्य हा शब्द इ. स. १९०६ मध्ये दादाभाई नौरोजी यांनी प्रथम वापरला आणि त्याचा नेमका अर्थ कोणता? याबद्दल मवाळ व जहालात मतभेद होते; तेव्हा एकदम स्वयंशासनाची मागणी न करता, सावकाश सुधारणा घडवून आणण्यावर मवाळांचा विश्वास होता.

### मवाळांच्या अडचणी

मवाळांच्या राष्ट्रभक्तीबद्दल कोणालाच शंका नव्हती; परंतु यावेळी ब्रिटिश शासनाशी संघर्ष करून संघटना नष्ट करून घेण्यापेक्षा शासनाशी चांगले संबंध ठेवून, जनतेचे प्रश्न सोडवून घेणे हा त्यांचा उद्देश होता. यामागे एक कारण असे होते की, भारतीय जनता अज्ञानी, असंघटित, आर्थिकदृष्ट्या दुर्बल, राजकीयदृष्ट्या जागृत नव्हती; यामुळे व्यापक जनाधाराशिवाय आंदोलन करणेही अवघड होते आणि जनतेपर्यंत जाण्याबाबत बुद्धिजीवी वर्गाच्या मर्यादा होत्या. जनतेच्या सामर्थ्याचा चळवळीसाठी वापर करण्याकडे मवाळांचा कल नव्हता. नंतरच्या काळात लोकमान्य टिळकांनी आणि गांधीजींनी चळवळीला व्यापक जनाधार मिळवून देऊन ब्रिटिश सत्तेला आव्हान दिले.

# मवाळांची कामगिरी

### मागण्यांचे सर्वसमावेशक स्वरूप

या काळात काँग्रेसमध्ये कार्य करणारी बहुतेक मंडळी उच्चविद्याविभूषित होती. ही मंडळी इंग्रजी शिक्षण घेतलेली, समाजातील सुप्रतिष्ठित मंडळी होती. त्यांच्यापैकी बहुतेकजण बुद्धिजीवी वर्गातील होते; तरीही या मवाळ गटाने जे ठराव काँग्रेसच्या अधिवेशनात पास केले त्यांवरून त्यांना इतर वर्गांच्या समस्यांची जाणीव होती असे दिसते. आपल्या राजकीय क्षेत्रातील ज्ञानाचा वापर मवाळांनी अज्ञानी, अशिक्षित, सामान्य बहुसंख्यांच्या समस्या सोडविण्यासाठी केला. कारखानदार, शेतकरी, मध्यमवर्ग, विणकर अशा विविध समाजघटकांच्या मागण्यांना मवाळांनी आपल्या ठरावात स्थान दिले होते.

### राष्ट्रीय चळवळीचा प्रारंभ

आतापर्यंत देशातील विविध प्रांतांत विविध संघटना राजकीय क्षेत्रात कार्य करीत होत्या आणि जनतेचे प्रश्न सोडविण्याबाबत प्रयत्नशील होत्या; परंतु काँग्रेसने पहिल्यांदाच या सर्व संघटनांना एकत्र आणून आपल्या समस्या मांडण्यासाठी, मागण्या मांडण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले; त्याच वेळी सौम्य स्वरूपात का होईना राष्ट्रीय चळवळीला प्रारंभ करून दिला. हीच चळवळ पुढे व्यापक आणि सामर्थ्यशाली बनली. या दृष्टीने मवाळांनी राष्ट्रीय चळवळीत भारतातील विविध प्रांतांतील नेत्यांना एकत्र आणले.

### ब्रिटिश साम्राज्यवादाचे स्वरूप स्पष्ट केले

मवाळांनी जरी प्रत्यक्ष जन-आंदोलन, सत्याग्रह, चळवळ, बहिष्कार, तुरुंगवास इत्यादी मार्गांचा वापर केला नसला, तरी आपल्यापरीने त्यांनी ब्रिटिश साम्राज्यशाहीचे स्वरूप आपल्या लिखाणातून, कौन्सिलमधील भाषणांतून स्पष्ट केले. भारताच्या वाढत्या दारिद्र्याला, आर्थिक दुर्दशेला ब्रिटिश सत्तेचे स्वार्थी धोरणच बऱ्याच अंशी कारणीभूत आहे आणि भारताची अर्थव्यवस्था ही इंग्लंडच्या विकासासाठीच वापरली जात आहे हे दादाभाई नौरोजी, गोपाळ कृष्ण गोखले यांसारख्या मवाळ नेत्यांनी स्पष्ट केले; विशेषत: दादाभाईंनी आपल्या 'ड्रेन थिअरी' किंवा शोषणाच्या सिद्धान्ताद्वारे भारतातील उद्योगांना ब्रिटिश शासकांकडून मिळणारी सापत्न वागणूक, भारतीय उद्योग-व्यापारावरील वाढते कर, ब्रिटिश अधिकाऱ्यांवरील वाढता खर्च इत्यादी बाबी भारतीयांच्या आर्थिक दु:स्थितीला कशा कारणीभूत आहेत हे आकडेवारीनिशी सिद्ध करून दाखविले; गोखले यांनीही अशीच कामगिरी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणातून बजावली. भारतीयांमध्ये ब्रिटिश सत्तेबद्दल असंतोष निर्माण होण्यास मवाळांचे हे कार्य कारणीभूत ठरले.

### १८९२ चा कौन्सिल ॲक्ट

भारतीयांना कायदेमंडळात वाढत्या संख्येने प्रतिनिधित्व मिळावे, कायदेमंडळातील सदस्य जनतेकडून निवडले जावेत, म्हणजेच निर्वाचनाचे तत्त्व मान्य केले जावे, त्यांना शासनाच्या कारभारावर टीका करण्याचा व अंदाजपत्रकावर चर्चा करण्याचा अधिकार असावा, इत्यादी मागण्या काँग्रेसने केल्या होत्या. शासनाकडून जमीनदार, संस्थानिक इत्यादींच्या नेमणुका कायदेमंडळात केल्या जात; त्याऐवजी सुशिक्षित भारतीयांना निवडून येण्याची संधी मिळाली म्हणजे ते जनतेचे प्रश्न अधिक चांगल्या रीतीने मांडू शकतील अशी काँग्रेसची मागणी होती. इ. स. १८९२ च्या कौन्सिल कायद्याने काँग्रेसच्या मागण्या काही अंशी पूर्ण केल्या. प्रांतिक कायदेमंडळ (कौन्सिल) आणि केंद्रीय कायदेमंडळातील सदस्यसंख्या वाढविण्यात आली. त्यांपैकी अर्धे सदस्य बिनसरकारी असावेत अशी तरतूद करण्यात आली. कायदेमंडळातील सदस्यांना शासनाला राज्यकारभारासंबंधी प्रश्न विचारण्याचा, अंदाजपत्रकावर चर्चा करण्याचा आणि टीका करण्याचा अधिकार मिळाला. निर्वाचनाचे तत्त्व अप्रत्यक्षरीत्या मान्य करण्यात आले.

या कायद्याने भारतीयांचे अपेक्षेइतके फायदे झाले नसले तरी भारतीयांना काही लाभ झाले होते. हे मवाळांच्या कार्याचे फलित होते. या कायद्यामुळेच गोपाळ कृष्ण गोखलेंसारख्या कायदेमंडळ सदस्यांना अंदाजपत्रकावरील आपल्या अभ्यासपूर्ण भाषणातून शासनाच्या त्रुटी, जनहितविरोधी धोरणे दाखवून देऊन भारतीयांचे प्रश्न मांडता आले.

**परदेशात केलेले कार्य**

मवाळांनी भारतीयांच्या मागण्या, त्यांचे प्रश्न यांबाबत आकडेवारी गोळा करून, अभ्यासपूर्ण अहवाल तयार करून ब्रिटिश शासनासमोर मांडले. त्याचबरोबर इंग्लंडमधील संसद सदस्य, ब्रिटिश नोकरशाहीतील वरिष्ठ अधिकारी, राजकीय नेते इत्यादींसमोर हे अहवाल मांडून त्यांना भारतीयांच्या मागण्यांचे महत्त्व पटवून दिले. आपली शिष्टमंडळे इंग्लंडला पाठवून, तेथे आपली शाखा उघडून काँग्रेसने हे कार्य साध्य करण्याचा प्रयत्न केला. थोडक्यात, भारतातील ब्रिटिश शासनावर ब्रिटिश जनमत व राजकीय नेते यांचे दडपण आणून भारतीयांच्या गाऱ्हाण्यांची दाद लावून घेण्याचा प्रयत्न काँग्रेसने केला.

**जनतेच्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न**

भारतातील विविध समाजघटकांच्या मागण्या मवाळांनी शासनासमोर मांडल्या. भारतातील कापड उद्योग शासनाच्या प्रतिकूल धोरणामुळे संकटात होता. त्याला वाचविण्यासाठी योग्य ती पावले उचलण्याची मागणी मवाळांनी केली; तसेच मिठावरील कर रद्द केला जावा, शेतकऱ्यांवरील महसुलाचा बोजा कमी केला जावा, शेतकऱ्यांना कमी व्याजाच्या दराने कर्ज उपलब्ध करून दिले जावे, शिक्षणाचा विस्तार करण्यात यावा, औद्योगिक व तांत्रिक प्रगती घडवून आणावी इत्यादी मागण्या या कालखंडातील काँग्रेस नेतृत्वाने केल्या.

**प्रशासनातील सहभागासाठी प्रयत्न**

भारतीयांना प्रशासनात अधिकाधिक सहभाग मिळावा, त्यांची वरच्या पदांवर नेमणूक केली जावी इत्यादी मागण्या या कालखंडातील काँग्रेस नेतृत्वाने केल्या. या दृष्टीने भारतीय सनदी सेवेसाठीची प्रवेशपरीक्षा इंग्लंडबरोबर भारतातही घेतली जावी आणि त्या परीक्षेसाठी वयोमर्यादा वाढवावी याबद्दल त्यांनी आग्रह धरला. ब्रिटिश शासन हे भारतीय जनतेच्या अडचणींबाबत उदासीन होते; ही उदासीनता कमी करून ते लोकाभिमुख व्हावे यासाठी मवाळांनी शासनाकडे आग्रहाची मागणी केली. न्यायदान विभाग व कार्यकारी विभाग यांचे विभाजन करण्यात यावे अशीही मागणी त्यांनी केली.

**राजकीय हक्कांची मागणी**

भारतीयांना नागरी आणि राजकीय हक्क वाढत्या प्रमाणात मिळावे अशी मागणी मवाळांनी केली. यात भाषणस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य, वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य इत्यादींचा समावेश होता. त्याचबरोबर केंद्रीय व प्रांतिक विधिमंडळाचा आकार वाढविण्यात यावा आणि यात निर्वाचित (निवडून आलेल्या) भारतीय प्रतिनिधींची संख्या अधिक असावी, विधिमंडळाचे अधिकार वाढवले जावेत इत्यादी मागण्या मवाळांनी केल्या. यांपैकी काही मागण्या अंशतः पूर्ण झाल्या.

थोडक्यात, धर्मनिरपेक्ष दृष्टिकोन ठेवून भारतातील विविध धार्मिक गटांना एकत्र आणून इंग्रजांविरुद्ध संघर्ष न करता, सनदशीर मार्गाने राष्ट्रीय जागृती घडवून आणून, ब्रिटिश शासनाचे लक्ष भारतीयांच्या प्रश्नांकडे वेधून घेऊन ते सोडविण्याचा प्रयत्न मवाळांनी केला. आपल्या ज्ञानाचा, अनुभवाचा आणि सुज्ञपणाचा लाभ मवाळांनी भारतीयांच्या अडचणी सोडविण्यासाठी वापरला.

**इंग्लंडमधील कार्य**

ब्रिटिश शासकांना भारतीय जनतेला अनुकूल अशी धोरणे स्वीकारण्यास भाग पाडण्यासाठी तेथील जनमताचा दबाव शासनावर आणला पाहिजे अशी काँग्रेस नेतृत्वाची धारणा होती. त्यानुसार इंग्लंडमध्ये आपल्या कार्याचा प्रचार करण्यासाठी व अनुकूल वातावरण निर्माण करण्यासाठी १८८६ मध्ये एक समिती विल्यम डिग्बी यांच्या

मार्गदर्शनाखाली लंडन येथे स्थापन केली. त्यानंतर १८८९ मध्ये 'द ब्रिटिश कमिटी ऑफ द इंडियन नॅशनल काँग्रेस' ही वेगळी समिती स्थापन करण्यात आली. या समितीचे अध्यक्ष वेडरबर्न होते, तर सचिव विल्यम डिग्बी होते. या समितीच्या स्थापनेत आणि कार्यात व्योमेशचंद्र बॅनर्जी व दादाभाई नौरोजी यांचाही सहभाग होता. या समितीने काँग्रेसची भूमिका ब्रिटिश जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी अनेक मार्गांचा वापर केला. यात भारताच्या समस्यांसंबंधी पत्रके छापून वाटणे, प्रचार- सभा आयोजित करणे, ब्रिटिश संसदेच्या सदस्यांशी संपर्क प्रस्थापित करणे आणि त्यांना भारतीय दृष्टिकोन समजावून सांगणे इत्यादी मार्गांचा समावेश होता. या समितीने 'इंडिया' या नावाचे एक नियतकालिक प्रकाशित करण्यास सुरुवात केली, ज्यात भारत, भारताच्या समस्या, मागण्या इत्यादींबद्दल माहितीपूर्ण लेख प्रकाशित केले जात.

या प्रयत्नातून भारताबद्दल सहानुभूती असणाऱ्या ब्रिटिश संसद सदस्यांच्या संख्येत वाढ झाली. या समितीच्या प्रयत्नातूनच भारतातील शासकीय खर्चाची तपासणी करण्यासाठी वेल्बी कमिशनची स्थापना करण्यात आली. इ. स. १८९१ मध्ये दादाभाई नौरोजींना इंग्लंडच्या संसदेत निवडून आणण्यात या समितीने मदत केली. इंग्लंडशिवाय इतर युरोपीय देशांत भारताच्या बाजूने या समितीकडून प्रचार करण्यात आला. इ. स. १९०४ मध्ये ॲमस्टरडॅम येथे भरलेल्या समाजवादी (सोशालिस्ट) काँग्रेससमोर ब्रिटिश साम्राज्यशाहीकडून भारताचे आर्थिक शोषण कसे करण्यात येत आहे हे दादाभाई नौरोजींनी आपल्या भाषणातून सप्रमाण सिद्ध केले.

## ब्रिटिशांची प्रतिक्रिया व मवाळांच्या कार्याचे मूल्यमापन

### ब्रिटिश शासनाची प्रतिक्रिया

काँग्रेसच्या स्थापनेमागे गव्हर्नर जनरल रिपनची सुशिक्षित भारतीयांना एकत्र आणण्याची इच्छा होती. त्यानंतरच्या गव्हर्नर जनरल डफरीनने ब्रिटिश शासनाला भारतीय जनमत जाणून घेण्यासाठी काँग्रेस स्थापनेला संमती दिली होती. ह्यूमसारख्या निवृत्त शासकीय अधिकाऱ्याने काँग्रेस स्थापनेत पुढाकार घेतला होता. या सर्व बाबींवरून काँग्रेसला ब्रिटिश शासनाचा विरोध राहणार नाही असे मानण्यास जागा होती; परंतु जसजसा काळ गेला तसतसा ब्रिटिश शासनाचा दृष्टिकोन बदलत गेला. काँग्रेसच्या प्रारंभीच्या कालखंडातील नेत्यांनी ब्रिटिश सत्तेबद्दलची आपली निष्ठा नि:संदिग्ध शब्दांत स्पष्ट केली होती, तरीही काँग्रेसबद्दल शासनाच्या मनात जो संशय निर्माण झाला तो कधीच संपुष्टात आला नाही; याचे एक उदाहरण म्हणजे ब्रिटिश सत्तेचे मुखपत्र मानल्या जाणाऱ्या लंडनच्या 'द टाईम्स' या वृत्तपत्रात काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनानंतर आलेला लेख होय. थोडक्यात 'टाइम्स'चे मत असे होते की, काँग्रेसच्या राजकीय हक्कांबद्दलच्या मागण्या मान्य करणे म्हणजे स्वराज्य (होमरूल) मान्य करणे होय; 'टाइम्स'ने असेही म्हटले होते की, ब्रिटिशांनी राजकीय व लष्करी सामर्थ्याच्या बळावर भारत जिंकला होता व त्याच बळावर ते भारतावर राज्य करीत आहेत. भारतीयांना राजकीय हक्क त्याच प्रमाणात मिळतील, ज्या प्रमाणात ते स्वत:ला पात्र होऊन दाखवतील. काँग्रेसचे नेते हे मूठभर बुद्धिजीवी असून, ते संपूर्ण भारताचे प्रतिनिधित्व करीत नाहीत, असेही 'टाइम्स'चे मत होते आणि म्हणूनच काँग्रेसच्या मागण्यांचा गंभीरपणे विचार करण्याची गरज नाही असा या वृत्तपत्राचा सल्ला होता.

प्रारंभी ब्रिटिश शासनाचे अधिकारी काँग्रेस अधिवेशनांना उपस्थित राहत असत; परंतु नंतर मात्र ब्रिटिश शासनाचा काँग्रेसविरोधी दृष्टिकोन स्पष्ट झाला. विशेषत: इ. स. १८८८ मध्ये अलाहाबाद येथे झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनाला जागा मिळू देण्यात ब्रिटिश शासनाच्या अधिकाऱ्यांनी अडथळे आणले; शेवटी दरभंगाच्या महाराजांनी एक बंगला विकत घेऊन तो स्वागत समितीकडे सोपवला. याच सुमारास शासकीय अधिकाऱ्यांनी काँग्रेस अधिवेशनांना उपस्थित राहू नये आणि काँग्रेसशी संबंध ठेवू नये असा आदेश त्यांना देण्यात आला. इ. स. १८८८ मध्ये जनरल चेस्ने यांनी काँग्रेस संघटना ब्रिटिश शासनाविरुद्ध व्यापक उठावाचा प्रयत्न करीत आहे आणि त्यात कदाचित सैन्याचाही सहभाग घेतला जाऊ शकेल असा इशारा दिला. या दृष्टीने काँग्रेसवर बंदी घालण्याची सूचना

## जहालांचा उदय आणि राजकारण

साधारणपणे इ. स. १८९५ पासून काँग्रेसमध्ये तरुण नेतृत्वाने प्रस्थपित नेत्यांपेक्षा वेगळे विचार मांडावयास सुरुवात केली. हे विचार मांडणाऱ्यांमध्ये लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे प्रमुख होते आणि नंतर काँग्रेसमधील या नव्या विचारांच्या गटाचे नेतृत्वही त्यांनीच केले. इतर प्रांतांच्या तुलनेने राजकीय जागृती जिथे मोठ्या प्रमाणावर झाली होती अशा महाराष्ट्र, बंगाल, पंजाब प्रांतांतून हे नेते उदयाला आले. ब्रिटिश शासनाविरुद्ध आपल्या हक्कांसाठी लढा द्यावा हा प्रस्थापित मवाळ नेतृत्व आणि जहाल तरुण नेतृत्व यांच्यातील मतभेदाचा महत्त्वाचा मुद्दा होता. जहालांनी राष्ट्रीय पातळीवर आणि काँग्रेसमध्ये आपले धोरण स्वीकारले जावे यासाठी प्रयत्न केले होते; दुर्दैवाने मवाळांनी काळाची पावले, बदलते राजकीय वातावरण आणि जनमानस न ओळखता जहालांना विरोध केला; यातूनच काँग्रेसमध्ये इ. स. १९०७ मध्ये फूट पडून जहालांना काँग्रेसबाहेर काढले गेले आणि ब्रिटिश शासनाच्या दडपशाहीच्या धोरणामुळे त्यांना तुरुंगात जावे लागले; तरीही जहालांचा प्रभाव जनतेमध्ये राहिला; यामुळे साधारणपणे इ. स. १८९५ ते १९०७ हा जहालांचा कालखंड म्हणून ओळखला जातो.

### जहालांची भूमिका

(१) **ब्रिटिश सत्तेमुळे भारताची प्रगती नाही** : बहुतेक मवाळांना इंग्रजांचे राज्य हे 'ईश्वरी वरदान' वाटत होते. त्यांच्या सत्तेखाली आपली प्रगती होईल, त्यांच्यामुळे कायदा सुव्यवस्था, तंत्रज्ञान, विज्ञान इत्यादी क्षेत्रांत भारतीयांना लाभ होईल असेही त्यांना वाटत होते; जहालांचे तसे मत नव्हते. ब्रिटिश साम्राज्यवादाचा भारत हा एक बळी आहे असे जहालांचे मत होते आणि ब्रिटिशांच्या सत्तेमुळे जे लाभ भारतीयांना होत आहेत त्यापेक्षा ब्रिटिशांच्या शोषणामुळे भारताचे अधिक आर्थिक नुकसान व अध:पतन होत आहे असा जहालांचा विश्वास होता.

(२) **भारतीय जनता स्वराज्याला पात्र आहे** : मवाळांचे असे मत होते की, भारतीय समाज स्वातंत्र्यप्राप्तीला अजून योग्य, समर्थ झालेला नाही. त्याला ब्रिटिशांच्या सत्तेखाली अजून प्रगती करण्याची, प्रशासनाचे अनुभव घेण्याची गरज आहे. मात्र, जहालांना भारतीय समाज स्वातंत्र्यप्राप्तीसाठी योग्य असल्याबद्दल कुठलीही शंका नव्हती. इतिहासकाळात भारतीयांनी साम्राज्ये प्रस्थापित केली होती, चांगले प्रशासन निर्माण केले होते, तत्त्वज्ञान, साहित्य, कला इत्यादी क्षेत्रांत भरीव प्रगती केली होती आणि भारतीयांचा सांस्कृतिक वारसा समृद्ध आहे याबद्दल जहालांना शंका नव्हती. ब्रिटिशांकडून भारत पराभूत झाला याचा अर्थ भारतीय समाज स्वातंत्र्यप्राप्तीला लायक नाही हे जहालांना मान्य नव्हते; म्हणूनच 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच' अशी घोषणा लोकमान्य टिळकांनी केली.

(३) **हक्कांसाठी चळवळ हवी** : ब्रिटिशांना आपण सुधारणा मागितल्यास, आपली गाऱ्हाणी, समस्या त्यांच्या कानावर घातल्यास ते त्या मागण्या मान्य करतील असा मवाळांचा विश्वास होता. यासाठी अर्ज, विनंती, शिष्टमंडळे इत्यादी मार्गांचा अवलंब करावा असे त्यांचे मत होते.

याबाबतीत जहालांचे मत असे होते की, आपली गाऱ्हाणी, समस्या, मागण्या इत्यादी ब्रिटिश शासकांच्या कानावर घालून किंवा विनंती करून सुधारणा मिळणार नाहीत, तर त्यासाठी चळवळ करावी लागेल आणि त्याद्वारे शासनावर दडपण आणावे लागेल. अर्ज, विनंती करून शासनाकडे विनवणी करण्यापेक्षा चळवळीचा, आंदोलनाचा मार्ग जहालांना अधिक योग्य वाटत होता. किंबहुना काही सुधारणा ब्रिटिशांकडे मागण्यापेक्षा स्वराज्याच्या मागणीवर जहालांनी भर दिला. याबाबत स्वराज्य हा भारतीयांचा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो त्यांना मिळालाच

पाहिजे आणि त्यासाठी गरज पडेल तसा संघर्ष व त्याग भारतीयांनी केला पाहिजे, हे जहालांचे धोरण होते. कोणतीही परकीय, साम्राज्यवादी सत्ता स्वत:हून आपल्या वसाहतीला स्वातंत्र्य देत नाही; तेव्हा ब्रिटिशांना काय वाटेल याचा विचार न करता चळवळ केली पाहिजे असे जहालांचे मत होते. या हेतूनेच त्यांनी सुधारणा मागण्यापेक्षा भारतीय प्रशासन आपल्या हाती घेण्याला अधिक महत्त्व दिले. होमरूल चळवळीचा उद्देश तोच होता.

(४) **ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवर विश्वास नाही :** मवाळांचा ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवर विश्वास होता, म्हणूनच त्यांनी चळवळ न करता सुधारणा मागण्यावरच भर दिला; इंग्रजांना न दुखवता आपल्या मागण्या सनदशीर मार्गाने मांडण्यावर सहकार्य करावे असे मवाळांना वाटत होते; मात्र, ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवर जहालांचा विश्वास नव्हता. ब्रिटिश सत्ता ही एक साम्राज्यवादी सत्ता असल्यामुळे तिचा उद्देश भारतीयांचे अधिकाधिक शोषण हाच आहे असे जहालांचे मत होते आणि हे लक्षात घेता ब्रिटिश शासनकर्ते स्वत:होऊन भारतीयांना स्वराज्य देतील ही शक्यता जहालांना वाटत नव्हती.

(५) **ब्रिटिशांचा फसवा उदारमतवाद :** ब्रिटिशांची इंग्लंडमधील लोकशाहीची परंपरा व उदारमतवाद यावर मवाळांचा विश्वास होता; मवाळांचे असेही मत होते की, कायदेमंडळातून आपण भारतीयांच्या समस्या मांडल्यास व मागण्या केल्यास त्यांची पूर्तता ब्रिटिश शासनाकडून केली जाईल; त्यासाठी आंदोलने, बहिष्कार इत्यादी मार्गांचा अवलंब करू नये असे मवाळांचे मत होते.

जहालांच्या मते, ब्रिटिशांची लोकशाहीची परंपरा व उदारमतवाद या बाबी खऱ्या होत्या; परंतु हे फक्त त्यांच्या देशापुरतेच (इंग्लंड) मर्यादित असून भारतीयांना त्याचा काहीही लाभ होणार नाही. भारतासारख्या वसाहतीबाबत ब्रिटिशांचे धोरण उदारमतवादी असण्याऐवजी कट्टर साम्राज्यवादी असणार याबाबत जहालांना खात्री होती; म्हणूनच ब्रिटिशांना भारतीयांची शक्ती दाखवून देण्यासाठी, त्यांच्या साम्राज्यवादाला थोपविण्यासाठी, भारतीयांच्या आर्थिक शोषणाला थांबविण्यासाठी ब्रिटिश वस्तूंवर बहिष्कार घालून स्वदेशीचा वापर भारतीयांनी केला पाहिजे असा जहालांचा आग्रह होता.

(६) **चळवळीच्या सामर्थ्यावर विश्वास :** मवाळांनी भारतीयांच्या शक्ती आणि सामर्थ्यावर भर देण्यापेक्षा ब्रिटिशांच्या औदार्यावर अधिक भर दिला. जनतेला एखादा कार्यक्रम देऊन त्यांच्या आधारावर मवाळांनी आंदोलन उभारले नाही. बहुसंख्य अशिक्षित आणि राजकीयदृष्ट्या जागृत नसलेल्या भारतीयांच्या वतीने मवाळांनी स्वत:च कायदेमंडळात मागण्या मांडल्या.

जहालांचा खरा आधार भारतीयांची शक्ती, सामर्थ्य हा होता. भारतीयांना चळवळ किंवा आंदोलनासाठी कार्यक्रम देऊन त्यात त्यांना सामील करून घ्यावे असे जहालांचे मत होते; या हेतूनेच जहालांनी स्वदेशी, बहिष्कार, बंगालच्या फाळणीविरुद्ध आंदोलन अशी आंदोलने उभी केली. भारतीयांनी स्वाभिमानाने, ताठपणे, जागृत होऊन स्वसामर्थ्यावर स्वराज्यासाठी आंदोलन केल्यास ब्रिटिशांना त्याची दखल घ्यावी लागेल असा जहालांचा विश्वास होता.

(७) **सनदशीर चळवळीबद्दल आग्रह नव्हता :** मवाळांच्या मते, भारतीयांनी त्यांच्या हक्कांसाठी चालविलेल्या चळवळीचे स्वरूप सनदशीर व घटनात्मक असले पाहिजे. जहालांचा यावर असा आक्षेप होता की, इंग्लंडमध्ये नागरिकांना घटनात्मक अधिकार आहेत; म्हणून त्यांचे आंदोलन घटनेला धरून होऊ शकेल. भारतीयांना सनद किंवा घटना यांपैकी काहीही नसल्यामुळे आंदोलन सनदशीर किंवा घटनात्मक असावे असा आग्रह धरता येणार नाही. इ. स. १८५७ चा राणीचा जाहीरनामाही जहालांच्या मते सनद होऊच शकत नाही. एक तर हा जाहीरनामा ब्रिटिशांनी भारतीयांना दिलेला होता, जो ते केव्हाही मागे घेऊ शकत होते; तसेच त्याचे पालन करण्याचे ब्रिटिशांवर बंधन नव्हते आणि तिसरे म्हणजे हा जाहीरनामा भारतीयांनी तयार केलेला नव्हता; म्हणून भारतीयांना कुठलेही अधिकार नसताना व अनेक बंधने असताना चळवळ सनदशीर ठेवण्याचा आग्रह भारतीयांना करणे हे योग्य नव्हते,

असे जहालांचे मत होते. याउलट, भारतीयांच्या स्वातंत्र्याचे अपहरण ब्रिटिशांनी केले असल्यामुळे भारतीयांना ते स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठी चळवळ करण्याचा पूर्ण हक्क आहे असा जहालांचा विश्वास होता.

थोडक्यात, दोन वेगवेगळ्या विचारधारा काँग्रेस पक्षात निर्माण झाल्या होत्या. तरुण नेतृत्व आपल्या मागण्यांचा स्वीकार काँग्रेसने करावा यासाठी प्रयत्नशील होते. त्याच वेळी काँग्रेसमधील मवाळ गट पक्षाचे नेतृत्व आपल्याच हाती राहील आणि नव्या, जहाल विचारांचा त्यात शिरकाव होणार नाही याची दक्षता घेण्यात गुंतले होते.

## जहालवादाच्या उदयाची पार्श्वभूमी व कारणे

जहालवादाचा आणि त्याचा पुरस्कार करण्याचा जहाल गटाच्या उदयाला भारतातील तत्कालीन राजकीय व सामाजिक परिस्थिती, ब्रिटिश शासकांचे अन्यायी धोरण, परदेशातील घडामोडी व मवाळांचे राजकारण इत्यादी घटक कारणीभूत होते; या घटकांचा विचार पुढे केला आहे.

(१) **ध्येय-धोरणाबाबत मवाळांशी मतभेद :** काँग्रेसच्या स्थापनेत महत्त्वाची भूमिका बजावणारे ए. ओ. ह्यूम यांनी १८९२ मध्ये भारत सोडून इंग्लंडला जाण्यापूर्वी काँग्रेसच्या नेत्यांना एक पत्र लिहिले होते. या पत्रातून ह्यूम यांनी काँग्रेसच्या मवाळ नेतृत्वाला जनतेला बरोबर घेऊन चळवळ उभी करण्याचा आग्रह केला होता. विशेष म्हणजे लोकमान्य टिळकांनी या पत्राला पाठिंबा दिला होता; परंतु मवाळांनी ह्यूम व टिळकांच्या आवाहनाकडे दुर्लक्ष केले होते. टिळक आणि अरविंद घोष या तरुण नेत्यांनी काँग्रेसच्या मवाळ नेतृत्वाकडे जनतेमध्ये जाऊन राजकीय जागृती निर्माण करणे, चळवळ उभी करणे, सरकारकडे सादर केलेल्या मागण्यांना जनतेचा पाठिंबा मिळविणे याबद्दल आग्रह धरला. जनतेचे पाठबळ असल्याशिवाय सरकार कोणतेही ठराव किंवा मागण्यांना किंमत देणार नाही असे टिळकांचे सांगणे होते. ''वर्षातून एकदा एकत्र येऊन, अधिवेशनात ठराव पास करून काँग्रेसला काहीही साध्य करता येणार नाही. रयतेचा सहभाग मिळवून काँग्रेस ही लोकसंघटना व्हावी, तसेच लोकमताला बोलके करून सरकारविरुद्ध आपल्या हक्कांसाठी चळवळ सुरू केली पाहिजे. मवाळ नेतृत्व सामान्य जनतेपासून दूर आहे, काँग्रेसचे राजकारण कृतिशील नाही.'' अशा प्रकारची टीका टिळक आपल्या 'केसरी'मधून करीत होते.

टिळकांप्रमाणेच जहाल गटातील दुसरे नेते, अरविंद घोष यांनी इ. स. १८९३-९४ मध्ये 'इंदुप्रकाश' या वृत्तपत्रात काही लेख लिहून जनतेला व्यापक प्रमाणात सामील करून काँग्रेस पक्षाला खऱ्या अर्थाने राष्ट्रीय बनविण्याची मागणी केली होती. लाला लजपतराय यांनीही काँग्रेसच्या कार्यात लोकांचा सहभाग नसल्याची तक्रार केली होती. बंगालमधील एक काँग्रेस कार्यकर्ते अश्विनीकुमार दत्त यांनी तर काँग्रेस अधिवेशनाचा 'तीन दिवसांचा तमाशा' असा उल्लेख केला होता. ब्रिटिश राज्यकर्त्यांनाही याची जाणीव होती की, काँग्रेसचा पाठिंबा सुशिक्षितांपुरताच मर्यादित आहे आणि म्हणूनच ते काँग्रेसच्या मागण्यांकडे पुरेशा गांभीर्याने लक्ष देत नाहीत ही वस्तुस्थिती काँग्रेसमधील जहालांना माहीत होती.

जहालांना काँग्रेसमध्ये तिहेरी बदल घडवून आणावयाचे होते. एक, काँग्रेसला स्वराज्य हे ध्येय स्वीकारावयास लावणे, दोन, काँग्रेसच्या धोरणात बदल घडवून आणणे म्हणजेच ठराव पारित करून शासनाला विनंती करून सुधारणा व इतर मागण्या करण्याऐवजी परदेशी मालावर बहिष्कार इत्यादी मार्गांचा अवलंब करणे, तीन, जनतेला काँग्रेसच्या कार्यक्रमात समाविष्ट करून संघटित करणे, जागृत करणे आणि विविध चळवळी व कार्यक्रम हाती घेणे.

(२) **ब्रिटिश शासनाची अहंता :** ब्रिटिश शासकांना स्वतःच्या श्रेष्ठतेबद्दल अहंता होती, तर भारतीयांबद्दल तुच्छता होती. भारतीयांनी केलेल्या मागण्या बऱ्याच वेळा अमान्य केल्या जात. उदाहरणार्थ, भारतीय सनदी सेवेसाठीची परीक्षा इंग्लंडबरोबर भारतातही घ्यावी ही काँग्रेसची मागणी शासनाने मान्य केली नाही. प्रशासनात भारतीयांचा शिरकाव होऊ नये आणि प्रशासन आपल्याच हाती असावे हा यामागचा शासनाचा उद्देश होता. बंगालच्या

फाळणीविरुद्ध आंदोलन होऊनही फाळणी रद्द केली जाणार नाही असे ब्रिटिश शासनाने घोषित केले. याउलट, "आम्ही भारत हा शस्त्रबळाने जिंकला आहे आणि शस्त्रबळावरच तो आमच्या सत्तेखाली ठेवू" असे उद्‌गार ब्रिटिश शासनकर्त्यांनी काढले; तेव्हा ब्रिटिश शासनाच्या उद्दाम वृत्तीबद्दल भारतीयांना संताप येणे साहजिकच होते.

(३) **१८९२ च्या ॲक्टने केलेली निराशा :** काँग्रेसने आपल्या अनेक अधिवेशनांतून भारतीयांना प्रशासनावर नियंत्रण ठेवण्याच्या प्रक्रियेत सामील करून घ्यावे अशी मागणी केली होती. विधिमंडळातील निर्वाचित भारतीय सदस्यांची संख्या अधिकाधिक वाढविणे आणि त्यांच्या हक्कातही वाढ करणे ही काँग्रेसची मागणी होती. इ. स. १८९२ चा इंडियन कौन्सिल ॲक्ट ब्रिटिश शासनाने भारतात लागू केला; परंतु या कायद्याने भारतीय सदस्यांना कोणतेही महत्त्वाचे व परिणामकारक अधिकार मिळाले नाहीत. या कायद्यातील सुधारणा जुजबी, वरवरच्या आणि पोचट होत्या. या कायद्याबद्दल मवाळांनी आपली निराशा व्यक्त केली होती. या कायद्याने विधिमंडळातील निर्वाचित सभासदांना आपल्या बळावर एखादा ठराव संमत करून सरकारला तो स्वीकारण्यास भाग पाडण्याची शक्ती मिळाली नव्हती; तेव्हा जहालांनी यातून हा बोध घेतला की, सरकारला विनंती करून सुधारणा किंवा हक्क मिळणार नाहीत, तर त्यासाठी आंदोलनच करावे लागेल.

(४) **भारतीयांचे आर्थिक शोषण व दुर्दशा :** ब्रिटिश राज्यकर्ते आपल्या साम्राज्याच्या वाढीसाठी भारतावरील सत्तेचा वापर करीत होते; ब्रिटिशांकडून भारताचे आर्थिक शोषण केले जात असून त्यामुळे भारतातील संपत्तीची ब्रिटिशांच्या फायद्यासाठी लूट केली जात आहे ही बाब दादाभाई नौरोजी व इतरांनी आकडेवारीनिशी सिद्ध केली होती. भारतातील हातमाग वस्त्रोद्योग व इतर छोटे पारंपरिक उद्योग ब्रिटिशांच्या स्वार्थी धोरणामुळे नष्ट झाले होते. इंग्लंडच्या कापड गिरण्यांतील कापड भारतात स्वस्त दराने विकता यावे म्हणून जकात कमी करणारे सरकार, भारतीय कापडाला इंग्लंडमध्ये बाजारपेठ मिळू नये म्हणून विविध कर लादीत होते. भारतातील उद्योग वाढीला लागावेत यासाठी ब्रिटिश शासनाने अनुकूल धोरण स्वीकारले नाही; विशेषत: बंगालमधील विणकर उद्ध्वस्त होण्यामागे ब्रिटिशांचे प्रतिकूल आर्थिक धोरणच कारणीभूत होते. भारतातील उद्योगधंद्यांच्या वाढीबाबत काँग्रेसने अनेक वेळा ठराव पास केले होते; परंतु ब्रिटिश शासनाने त्याकडे दुर्लक्ष केले होते. उद्योग वाढविल्याशिवाय लोकांना रोजगार मिळणे शक्य नव्हते. उद्योगांच्या वाईट स्थितीमुळे शेतीवरील भार वाढला होता, बेकारी वाढली होती. भारतातील उद्योगांना प्रोत्साहनपर, संरक्षक धोरण स्वीकारण्याची शासनाची तयारी नव्हती; यामुळे भारतीयांमध्ये ब्रिटिश सत्तेबद्दल असंतोष निर्माण झाला.

(५) **दुष्काळ व रोगराईबाबत शासनाची उदासीनता :** भारतातील शेतीची अवस्था चांगली नव्हती. शेतकऱ्यांवरील कराचा बोजा प्रचंड होता, जो कमी करावा अशी मागणी अनेक वेळा काँग्रेसने केली होती. त्यातच दुष्काळ पडल्यामुळे शेतकऱ्यांची स्थिती अधिकच वाईट झाली. भारतात इ. स. १८७६-७८, १८९६-९८, १८९९-१९०० या काळात मोठे दुष्काळ पडले, ज्यात लक्षावधी भारतीय मृत्युमुखी पडले. या दुष्काळावर योग्य ती उपाययोजना करण्याबाबत असलेली शासनाची उदासीनता चीड व संताप आणणारी होती; त्यात भर म्हणजे दुष्काळातही शासनाने सारावसुली थांबविली नाही. टिळकांनी इ. स. १८९६ च्या दुष्काळात शेतकऱ्यांना आपल्या हक्कांबाबत आणि शासनाच्या कर्तव्याबाबत जागृत करण्यासाठी मोहीम हाती घेतली होती.

याच सुमारास प्लेग, कॉलरा इत्यादी रोगांमुळे देशातील जनता त्रस्त झाली होती. शासनाने जरी काही ठिकाणी प्रतिबंधक उपाययोजना करण्याचे प्रयत्न केले तरी ते अपुरे होते; तसेच प्रतिबंधक उपाययोजना करताना स्थानिक जनतेच्या भावना, परंपरा इत्यादींचे उल्लंघन केले होते. विशेषत: पुण्यात महिलांशी वागताना ब्रिटिश सैनिकांनी अशिष्ट वर्तन केले व अत्याचार केले; यामुळे पुण्यातील प्लेगविरोधी मोहिमेचा प्रमुख असलेल्या रँडची हत्या करण्यात आली. एकूणच या नैसर्गिक संकटांमुळे त्रस्त झालेल्या जनतेच्या हाल-अपेष्टांत शासनाच्या उपेक्षेमुळे भर पडली; ज्याचा परिणाम भारतीयांत, विशेषत: तरुणांमध्ये असंतोष निर्माण करण्यास कारणीभूत ठरला.

(६) **आंतरराष्ट्रीय घटनांचा प्रभाव** : या कालखंडात पूर्व आणि पश्चिम, दोन्हीकडील देशांत राष्ट्रवादाचा उदय झाला ही महत्त्वाची बाब होती; याचा परिणाम राष्ट्रवाद्यांवर झाला. आयर्लंडमधील इंग्लंडविरोधी होमरूल चळवळ, दक्षिण आफ्रिकेत बोअर लोकांनी ब्रिटिश साम्राज्यवाद्यांविरुद्ध दिलेला लढा, चीनमध्ये परकीयांविरुद्ध झालेले बॉक्सर बंड आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे इ. स. १९०४-०५ मध्ये जपानसारख्या पूर्वेकडील छोट्या देशाने रशियासारख्या मोठ्या पाश्चिमात्य देशाचा केलेला पराभव, ही सर्व राष्ट्रवादाच्या उदयाची उदाहरणे होती.

या घटनांच्या आधीही इ. स. १८७० मध्ये इटलीचे एकीकरण आणि त्यात जोसेफ मॅझिनी, कॅव्हूर आणि गॅरिबाल्डी यांनी बजावलेली कामगिरी यांचाही परिणाम भारतीयांवर झाला होता. सुरेंद्रनाथ बॅनर्जी व स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांनी आपापल्या काळात मॅझिनीचे चरित्र लिहिले होते. एवढा प्रभाव या घटनेचा भारतीय राष्ट्रवाद्यांवर होता. इ. स. १९०४-०५ मध्ये जपानने रशियावर मिळविलेल्या विजयातून भारतीयांना त्यांच्या इंग्लंडविरोधी लढ्यात हा संदेश मिळाला की, निश्चय केल्यास एखादे छोटे राष्ट्रही स्वतःचे सामर्थ्य वाढवून बलाढ्य शत्रूचा पराभव करू शकते, भारतीयांमध्ये निर्माण झालेल्या आत्मविश्वासाचे प्रत्यंतर लो. टिळकांनी या घटनेसंबंधी 'केसरी'मधून लिहिलेल्या लेखांमधून मिळते. थोडक्यात, राष्ट्रवादाचा आंतरराष्ट्रीय आविष्कार भारतीयांना प्रखर राष्ट्रवादाची चळवळ चालविण्यात प्रेरणा देणारा ठरला.

(७) **देशाबाहेर मिळणारी अन्यायकारक वागणूक** : ब्रिटिश साम्राज्यात असलेल्या दक्षिण आफ्रिका या वसाहतीमध्ये तेथील भारतीयांना अपमानास्पद वागणूक दिली जात होती; त्यांच्याबाबत वर्णभेद पाळला जात असे आणि गोऱ्या ब्रिटिशांच्या तुलनेत भारतीयांशी पक्षपात केला जात असे. या वर्णभेद आणि अन्यायपूर्ण वागणुकीविरुद्ध महात्मा गांधींनी दक्षिण आफ्रिकेत सत्याग्रह केला होता. अशीच वागणूक ब्रिटिशांच्या ताब्यातील अन्य वसाहतींमधील भारतीयांना मिळत होती; यामुळे भारतीयांमध्ये ब्रिटिश राज्यकर्त्यांविरुद्ध असंतोष निर्माण झाला.

(८) **पुनरुज्जीवनाची चळवळ** : भारतीय राष्ट्रवादाच्या निर्मितीमध्ये धार्मिक प्रबोधनाने जे योगदान केले तसेच कार्य जहालांच्या उदयाच्या संदर्भात धार्मिक पुनरुज्जीवनाच्या चळवळीने केले. दयानंद सरस्वती यांनी आर्य समाजाच्या स्थापनेतून वैदिक संस्कृतीच्या मूल्यांची पुनर्स्थापना करण्याचा प्रयत्न केला. विवेकानंदांनी हिंदुधर्माला सुप्रतिष्ठित करण्याचे कार्य पार पडले. मानवी मूल्यांना महत्त्व देणारी सामाजिक सुधारणेची राजा राममोहन रॉय यांची ब्राह्मो समाजाची चळवळ ही याची काही उदाहरणे होती. या सर्व मंडळींनी हिंदुधर्मातील दोष आणि उणिवा दूर करून त्याला नवी शक्ती व प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.

जहालांचे नेतृत्व करणाऱ्या टिळक, अरविंद घोष, लजपतराय आणि बिपिनचंद्र पाल या मंडळींनी स्वातंत्र्य चळवळीला लढाऊ राष्ट्रवाद आणि धार्मिक पुनरुज्जीवनाचे अधिष्ठान प्राप्त करून दिले. ब्रिटिशांचे आक्रमण केवळ राजकीय नव्हते तर ते सांस्कृतिकसुद्धा होते. ख्रिश्चन मिशनरी धर्मप्रसार व धर्मांतरे घडवून आणत होते. अनेक भारतीय पाश्चात्त्य संस्कृतीच्या प्रभावाखाली होते; तेव्हा भारतीयांमधील न्यूनगंड दूर करण्यासाठी, धार्मिक व सांस्कृतिक आक्रमणाला परतवून लावण्यासाठी जी प्रेरणा लागते तिचा आधार टिळक व इतर मंडळींनी हिंदुधर्म व संस्कृतीत शोधला. टिळकांनी गीतारहस्यात मांडलेल्या कर्मयोगाचा सिद्धान्त, त्यांनी सुरू केलेला गणपती उत्सव आणि शिवजयंतीचा कार्यक्रम ही याचीच उदाहरणे होत.

अरविंद घोषांनी राष्ट्रवादाला ईश्वरी अधिष्ठान दिले. यात कालीमातेला महत्त्वपूर्ण स्थान होते. ॲनी बेझंट यांनीही भारतीयांचा सांस्कृतिक वारसा गौरवास्पद असल्याचे मत आग्रहाने प्रतिपादन केले. या काळातील क्रांतिकारकांच्या प्रेरणाही धार्मिक राष्ट्रवादावर आधारित होत्या; त्यामुळे स्वधर्म आणि संस्कृती यावर जहालांनी आपली जी चळवळ उभारली ती मवाळांपेक्षा याबाबतीत वेगळी होती. हिंदू संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाबद्दल जहालांना कोणतीही शंका नव्हती व त्यापासून प्रेरणा घेऊन त्यांनी ब्रिटिशांविरुद्ध लढा दिला. बंकीमचंद्र चटर्जी व रवींद्रनाथ

टागोर यांनीही सांस्कृतिक राष्ट्रवाद आपल्या साहित्यातून मांडला. अशा रीतीने धार्मिक पुनरुज्जीवनाची चळवळ प्रखर राष्ट्रवादी चळवळीच्या निर्मितीला कारणीभूत ठरली.

(९) **लॉर्ड कर्झनची राजवट** : भारतीय राष्ट्रवादाच्या निर्मितीला काही अंशी जशी लॉर्ड लिटनची कारकीर्द कारणीभूत ठरली तशीच लॉर्ड कर्झनची कारकीर्द (१८९९ ते १९०५) जहालांच्या उदयाला कारणीभूत ठरली. जसजसा ब्रिटिश सत्ताधाऱ्यांचा उद्दामपणा, अन्याय, अत्याचार वाढत गेले तसतसा जहालांचा प्रभाव वाढत गेला. मवाळांचे धोरण ब्रिटिश सत्ताधाऱ्यांच्या अन्यायाला आवर घालण्यास प्रभावी ठरले नव्हते; एकूणच ब्रिटिश अधिकाऱ्यांची वागणूक भारतीय जनतेबद्दल तुच्छतेची आणि उपेक्षेची होती.

कर्झनच्या मते, भारतीय जनता राज्यकारभार सांभाळण्यास पात्र नसून, त्यांच्या मते ती पात्रता फक्त ब्रिटिशांकडे होती. अहंमन्य स्वभाव, सत्तेचे केंद्रीकरण, लोकमताबद्दल उपेक्षा, प्रचंड आत्मविश्वास आणि प्रशासकीय क्षमता ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये होती. कलकत्ता कॉर्पोरेशन कायदा (१८९९), युनिव्हर्सिटी ॲक्ट (१९०४) आणि बंगालची फाळणी (१९०५) या निर्णयामुळे त्यांचा भारतातील राष्ट्रवादी गटाशी संघर्ष झाला. कलकत्ता कॉर्पोरेशन कायद्याद्वारे विद्यापीठावरील लोकप्रतिनिधींच्या नियंत्रणाऐवजी सरकारचे नियंत्रण त्याने वाढविले. शासनाशिवाय इतरांनी चालविलेल्या शाळांचा विस्तार होऊ नये यासाठी त्याने बंधने घातली; भारतीयांना 'सत्य' या संकल्पनेची यथार्थ जाणीव नाही, उलट त्याची जाणीव फक्त पाश्चात्त्यांना आहे, असेही संतापजनक उद्गार त्याने काढले. भारतात स्वातंत्र्य आणि लोकशाही प्रस्थापित करण्याच्या तो विरोधी होता. भारतीयांना फक्त कार्यक्षम प्रशासन देणे हीच आवश्यक बाब आहे आणि ते देण्याची क्षमता ब्रिटिश नोकरशाहीत आहे असे त्याचे मत होते; यामुळेच प्रशासनातील वरिष्ठ पदे ब्रिटिशांकडे असावीत असा त्याचा आग्रह होता. इंग्रजी शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या सुशिक्षित भारतीयांमधील आपल्या हक्कांबद्दल असलेल्या जागृतीच्या तो विरोधी होता. काँग्रेस संघटना लवकरच संपुष्टात येईल असा त्याचा विश्वास होता. भारतीयांना राज्यकारभारात अधिक सहभाग देण्याच्या तो विरोधी होता आणि या मुद्द्यावरून भारतीयांमध्ये असंतोष निर्माण झाला.

(१०) **बंगालची फाळणी** : कर्झनचा बंगालच्या फाळणीचा निर्णय अतिशय वादग्रस्त आणि राष्ट्रीय चळवळीला चालना देणारा ठरला. बंगालची फाळणी हा निर्णय प्रामुख्याने बंगालच्या जनतेला आणि इतर प्रांतांतील जनतेला धक्का देणारा निर्णय होता. या निर्णयाविरुद्ध वंगभंगाचे आंदोलन उभारले गेले; यातूनच स्वदेशीचा वापर व परकीय मालावर बहिष्कार या नव्या शस्त्राचा वापर आंदोलनात केला गेला. जे राष्ट्रीय ऐक्य साधण्यास आणि ब्रिटिश शासनाविरुद्ध जनमत तयार करण्यास काही दशके लागली असती ते काम बंगालच्या फाळणीमुळे चार-पाच वर्षांतच साधले गेले; यातूनच जहालांचे राजकारण प्रभावी झाले व क्रांती कार्याला चालना मिळाली. पुढे इ. स. १९११ मध्ये जनतेमधील असंतोष लक्षात घेऊन शासनाने बंगालची फाळणी रद्द केली.

(११) **सुशिक्षित भारतीयांमधील असंतोष** : भारतातील ब्रिटिश अधिकाऱ्यांची उद्दाम वृत्ती, वांशिक अहंकार, भारतीयांबद्दलची तुच्छता यांमुळे सुशिक्षित भारतीय तरुण अस्वस्थ बनले होते. ब्रिटिश अधिकारी आणि भारतीय जनता, विशेषत: सुशिक्षित तरुण यांच्यामधील दरी रुंदावत गेली. लॉर्ड कर्झन व लॉर्ड मिंटो यांसारख्या अधिकाऱ्यांनी आपल्या दडपशाहीच्या धोरणातून भारतीयांच्या असंतोषाला धार प्राप्त करून दिली. भारतीय प्रशासनाचे दरवाजे भारतीय तरुणांसाठी उघडण्याची ब्रिटिश अधिकाऱ्यांची तयारी नव्हती; त्याचबरोबर जनतेच्या प्रतिनिधींनाही प्रशासनात सहभागी करून घेण्याची त्यांची तयारी नव्हती. सुशिक्षित तरुणांना कामाची संधी कुठेच मिळत नव्हती. परिणामत: सुशिक्षित तरुण ब्रिटिश सत्तेच्या विरोधात जाऊन राष्ट्रीय चळवळीकडे आकर्षित झाले. त्यांपैकी काही तरुण अधिकच जहाल अशा क्रांतिकार्याकडे वळले.

(१२) **जहालांचे नेतृत्व** : जहालांच्या कालखंडात लोकमान्य टिळक, अरविंद घोष, बिपिनचंद्र पाल व लाला लजपतराय यांचे नेतृत्व प्रामुख्याने होते. या नेत्यांनी अनुक्रमे महाराष्ट्र, बंगाल व पंजाब या प्रांतांत जरी प्रारंभी आपले

कार्य सुरू केले तरी पुढे ते अखिल भारतीय स्तरावर प्रसिद्धीस आले. या सर्वांनीच आपल्या लिखाणातून ब्रिटिश शासनाच्या अन्यायी व जनहितविरोधी धोरणावर टीका केली; भारतीय जनतेत आत्मविश्वास, स्वावलंबी वृत्ती, हक्कासाठी संघर्ष करण्याची व कष्ट सोसण्याची प्रेरणा दिली; स्वत: शिक्षा सोसून तसा आदर्श घालून दिला; अर्ज, विनंतीचा मार्ग न स्वीकारता चळवळीचा मार्ग दाखविला आणि राजकीय जागृती घडवून आणली.

**जहालांचे तत्त्वज्ञान**

काँग्रेस ज्यांच्या प्रभावाखाली होती त्या मवाळांपेक्षा या काळात उदयाला आलेल्या जहाल गटाचे तत्त्वज्ञान व कार्यपद्धती वेगळी होती; हा संघर्ष व्यक्तिगत नसून वैचारिक भिन्नतेचा होता. काँग्रेसची ध्येय-धोरणे, कार्यपद्धती, ब्रिटिश राज्यकर्त्यांबद्दलचा दृष्टिकोन या सर्वांबाबत जहाल मवाळांपेक्षा वेगळे होते. केवळ राजकीयच नव्हे तर सांस्कृतिक क्षेत्रातही जहाल मवाळांपेक्षा वेगळे होते. काँग्रेसबाहेर असलेली बहुसंख्य अशिक्षित व अज्ञानी जनता आणि काँग्रेस यांच्या संबंधांबाबत जहाल व मवाळांच्या भूमिका परस्परांपासून भिन्न होत्या. थोडक्यात, स्वातंत्र्य चळवळीची दिशा व मार्ग याबद्दलच दोघांच्या दृष्टिकोनांत भिन्नता होती.

या काळात एक नवे चैतन्य जनतेत निर्माण झाले होते. ब्रिटिशांविरुद्धचा असंतोष तीव्रपणे व स्पष्ट रूपाने व्यक्त होऊ लागला होता. देशीपणा म्हणजे आपला धर्म, संस्कृती, इतिहास, परंपरा, भाषा, देश, शिक्षणपद्धती इत्यादींबद्दल आग्रहीपणाची भावना व त्यांचा आविष्कार आणि वापर या काळात दिसून येत होता; हेच जनतेमधील नवे चैतन्य जहालांच्या नेतृत्वाच्या रूपाने व्यक्त झाले. भाषिक वृत्तपत्रांच्या खपात वाढ, शिवजयंती उत्सव, गणपती, कालीमातेच्या पूजेला महत्त्व, टागोरांची शांतिनिकेतन संस्था, मेळे व जत्रा यांचा प्रचारासाठी वापर, बॉंबचा वापर, स्वदेशी व बहिष्कार ही काही नव्या चैतन्याच्या अभिव्यक्तीची उदाहरणे सांगता येतील. एकूणच जहालांची वैचारिक भूमिका पुढीलप्रमाणे सांगता येईल–

(१) **ब्रिटिश शासनासंबंधी दृष्टिकोन** : ब्रिटिश शासकांचा उदारमतवाद जहालांना अमान्य होता; किंबहुना त्यांचा उदारमतवाद व लोकशाहीबद्दलचे प्रेम फक्त त्यांच्या देशापुरतेच मर्यादित आहे असे जहालांचे मत होते. आपल्या साम्राज्यांतर्गत वसाहतींना स्वातंत्र्य, उदारमतवाद, लोकशाही इत्यादींचा परिचय घडवून आणावा असे ब्रिटिशांचे धोरण नाही ही जहालांची धारणा होती. कोणतीही साम्राज्यसत्ता आपल्या वसाहतीमधील लोकांच्या हिताचा व कल्याणाचा विचार करीत नसते, तर साम्राज्यसत्तेचा उद्देश वसाहतीचे शोषण हाच असतो, हे जहालांचे मत होते; म्हणून त्यांच्या मते, ब्रिटिशांकडून स्वत: ते भारताचे शोषण थांबवून भारतीयांच्या प्रगतीचा मार्ग खुला करतील ही अपेक्षा करणे चूक होते; तेव्हा शोषण थांबविण्यासाठी भारताने स्वराज्याची प्राप्ती करून घेणे हाच एक मार्ग आहे आणि त्यासाठी ब्रिटिश साम्राज्यशाहीशी संघर्ष करण्याशिवाय दुसरा मार्ग नाही असा जहालांचा विश्वास होता. त्यांच्या मते, मोर्लेसारखा एखादा ब्रिटिश अधिकारी उदारमतवादी असला तरी त्याचा उदारमतवाद साम्राज्यवादाच्या चौकटीतच मर्यादित असतो; त्याचबरोबर ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवर जहालांचा विश्वास नव्हता.

(२) **स्वराज्यप्राप्ती हे ध्येय** : स्वराज्याची प्राप्ती हे ध्येय जहालांनी आपल्यासमोर ठेवले. अर्थात, यात ब्रिटिश साम्राज्याच्या सत्तेखाली भारत राहील असे असले तरी भारताचे प्रशासन, अंतर्गत धोरण, आर्थिक व्यवहार इत्यादी भारतीयांच्याच हाती असतील हे अभिप्रेत होते. ब्रिटिशांची सत्ता ही भारतीयांची प्रगती साधणारी आहे म्हणून ती टिकावी, या काही मवाळांच्या मताशी जहाल मंडळी सहमत नव्हती. स्वराज्य हाती आले तरच देशाचा कारभार भारतीयांच्या हितासाठी राबवता येईल, अन्यथा नाही, ही त्यांची धारणा होती. राजकीय सुधारणांचे हप्ते ब्रिटिशांकडे मागत राहणे हे जहालांना मान्य नव्हते; त्याऐवजी स्वराज्यप्राप्ती हाच भारतीयांचे शोषण थांबवून प्रगतीसाठी योग्य मार्ग राहील असे जहालांना वाटत होते.

(३) **स्वावलंबन व लोकसंघटनेवर भर** : मवाळांप्रमाणे आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी किंवा हक्क प्राप्त करून घेण्यासाठी ब्रिटिश शासनाकडे अर्ज, विनंत्या करणे जहालांना मान्य नव्हते. ब्रिटिश शासनाकडून

भारतीय जनतेला त्यांच्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी चळवळ करणे, आंदोलन करणे गरजेचे आहे आणि अशी चळवळ उभी करून शासनावर लोकमताचा दबाव आणला पाहिजे; त्यासाठी जनतेमध्ये जागृती आणून त्यांना संघटित करणे हा मार्ग जहालांनी सुचविला आणि हे साध्य करण्यासाठी काँग्रेसने खेड्यापाड्यात पसरलेल्या शेतकरी व इतर वर्गांतील लोकांशी संपर्क प्रस्थापित केला पाहिजे; शेतकरी व इतर वर्गांना काँग्रेस संघटनेत आणून त्यांचे प्रश्न हाती घेऊन शासनाशी संघर्ष केला पाहिजे, असे त्यांचे सांगणे होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नांची चर्चा काँग्रेसच्या सर्व स्तरांवरील अधिवेशनांत करणे जहालांना आवश्यक वाटत होते. संघटित झाल्याशिवाय आणि चळवळ केल्याशिवाय जनतेचे प्रश्न सुटणार नाहीत याची जाणीव लोकांना करून देणे जहालांना आवश्यक वाटत होते; म्हणूनच त्यांनी लोकजागृती, लोकसंघटन आणि लोकसंग्रह यांवर विशेष भर दिला; किंबहुना हा जनाधार हेच खरे त्यांचे सामर्थ्य आहे असे जहालांना वाटत होते. विनंती-अर्जाऐवजी स्वावलंबनावर जहालांचा विश्वास होता. जनतेला तिच्या सामर्थ्यांचा, आत्मशक्तीचा प्रत्यय आणून दिल्यास ते स्वसामर्थ्यावर, स्वावलंबनावर आपल्या मागण्या मान्य करून घेऊ शकतील, असा जहालांचा विश्वास होता. चळवळीमुळे शासन नाराज होईल याची पर्वा करण्याची गरज नाही, असे जहालांचे मत होते.

(४) **राष्ट्रवादाच्या उभारणीसाठी धर्म, इतिहास व परंपरा यांचा आधार**: जहालांना राष्ट्रवादाच्या उभारणीसाठी धर्म, इतिहास व परंपरा यांचा आधार घेणे आवश्यक व योग्य वाटले. भारतातील बहुसंख्य जनता धार्मिक आहे तेव्हा त्यांच्यात राष्ट्रवादाची भावना निर्माण करण्यासाठी धर्माचा आधार घेणे अयोग्य नाही, असे जहाल नेत्यांना वाटत होते. धर्म सर्वांना एकत्र आणणारा व जोडणारा दुवा असल्याकारणाने धर्माच्या आधारावर त्यांनी राष्ट्रवादाची उभारणी केली. महाराष्ट्रात गणपती उत्सवाच्या माध्यमातून लोकांना एकत्र आणले गेले, तर बंगालमध्ये कालीमातेचे सार्वजनिक पूजन केले गेले. भारत हा भारतीयांसाठी केवळ भूमीचा तुकडा नसून ती भारतमाता आहे आणि तिच्या मुक्तीसाठी तिच्या लेकरांनी त्यागाला सज्ज व्हावे असे आवाहन केले गेले. या काळात कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनी लिहिलेल्या 'किचकवध' या नाटकातून राष्ट्रभावना जागविण्याचा प्रयत्न केला गेला; या नाटकातील किचक, भीम आणि द्रौपदी ही पात्रे अनुक्रमे लॉर्ड कर्झन, भारतीय तरुण आणि भारतमाता यांचे प्रतीक आहेत हे स्पष्टपणे न सांगताही हा संदेश प्रेक्षकांपर्यंत पोहचविला जात होता.

भारतीयांच्या इतिहासातील अनेक व्यक्ती आणि कालखंड असे होते की, ज्यांच्यापासून भारतीय प्रेरणा घेऊ शकत होते; जहालांनी राष्ट्रवादाच्या प्रेरणेसाठी त्यांचा वापर केला. याच हेतूने हिंदवी स्वराज्याची स्थापना करणाऱ्या शिवाजीमहाराजांची जयंती लोकमान्य टिळकांना साजरी करणे इष्ट वाटले. ज्यांनी देशावरची आक्रमणे परतवून लावली, पारतंत्र्यातून देशाला मुक्त केले, प्रशासन, तत्त्वज्ञान, कला, विज्ञान, शास्त्र इत्यादी क्षेत्रांत मोलाची भर घातली अशा व्यक्तींचे स्मरण करून पुन्हा एकदा त्यांचे व्यक्तिमत्त्व ब्रिटिश सत्तेविरोधी लढ्यात वापरणे जहालांना योग्य वाटले; तसेच त्यांच्याबद्दल देशवासीयांना सार्थ अभिमान होता, त्यांचे स्मरण, जत्रा, उत्सव, जयंती, पुण्यतिथी इत्यादी परंपरांमधून केले गेले. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी 'आमच्या देशाची स्थिती' या निबंधात प्राचीन भारतीयांच्या गौरवपूर्ण इतिहासाचा उल्लेख केला होता.

(५) **स्वातंत्र्यप्राप्तीला अग्रक्रम** : परकीय सत्तेला आधी हाकलून देऊन भारताला स्वतंत्र करणे, या राजकीय कार्यक्रमाला जहाल गटाच्या नेत्यांनी अग्रक्रम दिला. समाजसुधारणेऐवजी राजकीय चळवळ करणे त्यांना आवश्यक वाटत होते. समाजसुधारणेच्या चळवळीमुळे मतभेद निर्माण होतील व समाजात फूट पडेल अशी भीती त्यांना होती. ब्रिटिशांना यात हस्तक्षेप करू देण्यापेक्षा भारतीयांनी समाजसुधारणेचा कार्यक्रम स्वातंत्र्यानंतर हाती घेणे अधिक योग्य होईल असे जहाल गटाच्या नेत्यांचे मत होते.

(६) **आंदोलन सनदशीर असण्याचा आग्रह नाही** : काँग्रेसचे आंदोलन सनदशीर, घटनात्मक असावे असा मवाळांचा नेहमीच आग्रह होता; परंतु जहालांना हे मान्य नव्हते. भारताला घटना किंवा सनदच नाही, तेव्हा

आंदोलन सनदशीर किंवा घटनात्मक आहे किंवा नाही हे कोण व कसे ठरविणार हा त्यांचा प्रश्न होता. राणीचा जाहीरनामा (१८५८) ही भारतीयांसाठी सनद आहे हे जहाल गटाच्या नेत्यांना मान्य नव्हते; फक्त आपली चळवळ कायदेशीर आहे किंवा नाही एवढाच विचार केला जाऊ शकत होता; परंतु जिथे कायदा हा लोकमताचा विचार न घेता, सत्ताधाऱ्यांच्या मताप्रमाणे केला जातो तिथे कायद्याचे पालन करणे कठीण आहे असे जहालांचे मत होते. वस्तुत: कायदा लोकांची इच्छा, परंपरा, नीती, न्याय यांना धरून असणे आवश्यक होते; परंतु इथे कायदा ब्रिटिशांनी त्यांच्या इच्छेप्रमाणे केला होता; यासाठी चळवळीत भाग घेणाऱ्यांनी अन्यायी कायदा मोडावा असे जहालांचे सांगणे होते. मात्र, कायदेभंगासाठी दिलेली शिक्षा सहन करावी, तरच ज्या उद्दिष्टासाठी कायदा मोडला त्या उद्दिष्टाला महत्त्व प्राप्त होईल अशी त्यांची धारणा होती.

(७) **क्रांतिकारकांना नैतिक पाठिंबा** : क्रांतिकारकांनी जहाल गटापेक्षा दोन पावले पुढे जाऊन ब्रिटिश सत्तेविरुद्ध सशस्त्र संघर्ष केला. त्यांनी क्रांतिकारी संघटना स्थापन केल्या. जहालांनी क्रांतिकार्यात जरी प्रत्यक्ष भाग घेतला नाही तरी त्यांनी क्रांतिकारकांचा तेजोभंग केला नाही. टिळक व अरविंद घोष यांचा अनेक क्रांतिकारकांशी संबंध होता; टिळकांनी 'केसरी'त लेख लिहून क्रांतिकारक हिंसाचाराला प्रवृत्त का झाले याचा शासनाने विचार करावा अशी भूमिका मांडली. क्रांतिकारकांच्या हिंसाचाराचे समर्थन त्यांनी केले नाही; परंतु शासनाच्या दडपशाहीतून क्रांतिकारक या मार्गाकडे वळत आहेत हे स्पष्ट केले; या लेखासाठी त्यांना तुरुंगवासाची शिक्षा सहन करावी लागली.

(८) **कष्ट, नि:स्वार्थी भावना व त्याग** : जहाल गटाच्या बहुतेक नेत्यांनी राष्ट्रकार्याला स्वत: वाहून घेतले होते. जनतेला ब्रिटिशांच्या अन्यायी सत्तेचे खरे रूप समजावून सांगणे, जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी चळवळी करणे, राष्ट्रीय चळवळ प्रबळ करणे, स्वदेशी व बहिष्काराचा कार्यक्रम करणे हेच कार्य त्यांनी अंगीकारले होते. हे करताना जे कष्ट सोसावे लागले, शासनाने जी शिक्षा केली ती त्यांनी सोसली; त्यातूनच त्याग, कष्ट व नि:स्वार्थी सेवेचा आदर्श त्यांनी इतरांसमोर उभा केला.

**जहाल गटाचा कार्यक्रम**

जहाल गटाच्या नेत्यांनी राष्ट्रीय चळवळीच्या संदर्भात जनतेसमोर जो कार्यक्रम ठेवला त्यात स्वराज्यप्राप्ती हे उद्दिष्ट होते, तर त्याच्या प्राप्तीसाठी राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी, बहिष्कार, सरकारची अडवणूक किंवा नि:शस्त्र प्रतिकार इत्यादी मार्गांचा वापर केला.

(१) **स्वराज्य** : स्वराज्याच्या प्राप्तीशिवाय भारतीयांची प्रगती होणारी नाही असा जहालांचा विश्वास होता. किरकोळ सुधारणा किंवा कायदेमंडळातील भारतीय सदस्यांच्या संख्येत वाढ एवढ्यावर त्यांचे समाधान नव्हते. जहालांची अपेक्षा भारताच्या शासनाची सूत्रे त्यांच्या हाती असावीत, भारतातील नोकरशाही भारतीयांना जबाबदार असावी ही होती. त्यांनी ब्रिटिश सम्राटाची भारतावरची सत्ता मान्य केली होती. खरे तर जहालांनाही पूर्ण स्वातंत्र्य हवे होते आणि त्यांचे अंतिम साध्य पूर्ण स्वातंत्र्य हेच होते; परंतु एक टप्पा म्हणून स्वराज्याची मागणी त्यांनी मान्य केली होती. पूर्ण स्वातंत्र्य याच अर्थाने 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळविणारच' अशी घोषणा टिळकांनी केली होती. परकीयांच्या कार्यक्षम सत्तेपेक्षाही स्वराज्य अधिक चांगले हीच त्यांची धारणा होती.

(२) **राष्ट्रीय शिक्षण** : ब्रिटिश शासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या सरकारी शाळांमधून जे शिक्षण मिळते त्यातून विविध विषयांचे ज्ञान मिळत असले तरी राष्ट्रीय वृत्ती मुलांच्या अंगी बाणवली जात नाही; तेव्हा शासकीय शाळांऐवजी राष्ट्रीय शिक्षण-संस्थांकडून शाळा चालविल्या जाव्यात असे जहाल गटाच्या नेत्यांचे मत होते. राष्ट्रजागृती, राष्ट्रनिर्मितीला लागणारे सांस्कृतिक प्रबोधन व राजकीय कार्यकर्त्यांची निर्मिती ही राष्ट्रीय शिक्षणामागील उद्दिष्टे होती. राष्ट्रीय शिक्षणामध्ये देशाभिमान वाढविणारे राष्ट्रीय शिक्षण, शील व नीतिमत्ता निर्माण करणारे

धर्मशिक्षण, उपजीविका आणि औद्योगिक विकासासाठी धंदे-शिक्षण, विद्वत्तेची व संशोधनाची दिशा दाखविणारे शिक्षण असे विविध प्रकारचे शिक्षण विद्यार्थ्यांना दिले गेले पाहिजे, अशी मागणी जहालांचे प्रमुख नेते लोकमान्य टिळक यांनी केली होती. ब्रिटिश शासनाच्या नियंत्रणाखालील सरकारी शाळांतील शिक्षण हे राष्ट्रीय वृत्तीला व स्वातंत्र्य भावनेला चालना देणारे शिक्षण नसून राष्ट्रीयत्व खच्ची करणारे व गुलामीची भावना वाढविणारे शिक्षण आहे असे जहाल गटाचे मत होते. राष्ट्राला स्वावलंबी करणाऱ्या शिक्षणाची गरज आहे. आणि ते शिक्षण शासन देणार नाही म्हणून सरकारी अनुदानावर अवलंबून न राहता लोकाश्रयावर आधारित राष्ट्रीय शाळा उघडल्या पाहिजेत, असा या गटाचा आग्रह होता. स्वधर्म, स्वसंस्कृती, राष्ट्रीयत्व, इतिहास, परंपरा इत्यादींबद्दल शिक्षणामुळे अभिमान निर्माण झाला पाहिजे, आपल्या राष्ट्राच्या पराभवाची कारणे आणि दुर्दशेची मीमांसा त्यांना शिक्षणातून कळाली पाहिजे ही त्यांची अपेक्षा होती; त्याचबरोबर विकासासाठी विज्ञान व तंत्रज्ञान हे शिक्षणातून मिळावे हे राष्ट्रीय शिक्षणामागील उद्दिष्ट होते. राष्ट्रीय शिक्षणाबरोबरच शिक्षणाचे माध्यम म्हणून इंग्रजीपेक्षा भारतीय भाषा असावी असे जहाल गटाचे मत होते.

(३) **स्वदेशी व बहिष्कार** : स्वदेशी व बहिष्कार या संकल्पना परस्परांशी संलग्न आणि परस्परपूरक आहेत. ब्रिटिश शासन भारतीयांच्या आर्थिक शोषणाला, दुर्दशेला व अधोगतीला कारणीभूत आहे; तेव्हा भारतीयांना आपला निषेध व्यक्त करता येईल, ब्रिटिशांचे आर्थिक नुकसान करता येईल आणि स्वावलंबनाने देशाचा औद्योगिक विकास घडविता येईल या हेतूने स्वदेशी व बहिष्कार या साधनांची योजना करण्यात आली होती; याला तात्कालिक कारण म्हणून बंगालची फाळणी कारणीभूत ठरली. सरकार फाळणी रद्द करण्यास तयार नाही, तेव्हा सरकारला धडा शिकविण्यासाठी बहिष्काराचा मार्ग अवलंबिला गेला. इंग्लंडमध्ये तयार झालेल्या सर्व वस्तूंवर बहिष्कार घातल्यामुळे इंग्लंडचे आर्थिक नुकसान होईलच पण त्याशिवाय भारतीयांचा जो पैसा इंग्लंडकडे जातो आहे तो भारतातच राहील असा दावा केला गेला. परदेशी वस्तूंऐवजी भारतात तयार झालेल्या स्वदेशी वस्तू वापरल्यास इथे असलेल्या स्वदेशी उद्योगांना चांगली अवस्था प्राप्त होईल असे स्वदेशीच्या पुरस्कर्त्यांचे मत होते; यात ब्रिटिशांशी प्रत्यक्ष संघर्ष होण्याची फारशी शक्यता नव्हती. ब्रिटिशांसाठी हानीकारक परंतु भारतीयांना लाभदायक असा हा मार्ग होता. परकीय सत्तेशी सशस्त्र संघर्षाचा मार्ग सर्वांना शक्य नव्हता; परंतु बहिष्काराचा नि:शस्त्र प्रतिकाराचा मार्ग सर्वांना खुला होता; अर्थात, बहिष्काराची व्याप्ती ब्रिटिश कापडापुरतीच किंवा इतर वस्तूंपुरतीच मर्यादित असावी असे जहालांचे मत नव्हते. उलट, त्यात ब्रिटिशांच्या ताब्यातील शिक्षण, न्यायदान, सैन्य इत्यादी सर्वांवर परिस्थिती लक्षात घेऊन बहिष्कार लागू करता येऊ शकतो असे त्यांचे मत होते.

## होमरूल चळवळ

### ॲनी बेझंट व होमरूल चळवळ (१९१६)

दुसऱ्या महायुद्धापासून देशात होमरूल लीग (Home Rule League) म्हणजे स्वराज्य संघ स्थापन करून टिळक व ॲनी बेझंट यांनी भारतातील राष्ट्रीय चळवळीला पुन्हा एकदा चालना दिली. जहालांच्या अनुपस्थितीत मवाळांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने कोणतीही चळवळ हाती घेतली नव्हती.

ॲनी बेझंट (१८४७-१९३३) या मद्रासजवळील अड्यार येथील थिऑसॉफिकल सोसायटीच्या अध्यक्षा होत्या. इ. स. १८९३ पासून या संस्थेमार्फत भारतीय संस्कृतीचा अभ्यास, प्रसार व शिक्षणक्षेत्रांत त्या कार्य करीत होत्या; मूलतः ब्रिटिश आयरिश असलेल्या बेझंटबाईंना भारतीय संस्कृतीचे श्रेष्ठत्व पटल्यामुळे विविध ज्ञानशाखांतील भारतीय ग्रंथांचा परिचय सर्वांना करवून देणे, भारतीय संस्कृतीचे पुनरुत्थान घडवून आणणे हे कार्य त्यांनी स्वीकारले होते. आपल्या सोसायटीच्या शाखा भारतात काही ठिकाणी त्यांनी काढल्या. ब्रिटिशांच्या संस्कृतीमुळे प्रभावित झालेल्या भारतीयांना त्यांचा महान सांस्कृतिक वारसा सांगण्याचे काम त्यांनी केले; याबाबतीत टिळक, अरविंद घोष आणि इतरांशी त्या जवळ होत्या.

सांस्कृतिक क्षेत्रात समाधान न मानता बेझंटबाईंनी राजकीय क्षेत्रात भारतीयांना स्वशासन मिळवून देण्यासाठी चळवळ उभारण्याचे ठरविले. भारतीयांच्या हाती सत्ता आल्याशिवाय त्यांच्या स्थितीत बदल होऊ शकणार नाही असे त्यांचे मत होते. या चळवळीला अनुकूल जनमत तयार करण्यासाठी त्यांनी 'कॉमनवील' हे साप्ताहिक व 'न्यू इंडिया' हे दैनिक इ. स. १९१४ मध्ये सुरू केले. बेझंट यांनी इ. स. १९१४ मध्ये इंग्लंडला जाऊन भारतीयांनी ब्रिटिश साम्राज्याबद्दल जी निष्ठा दाखविली आहे त्याची परतफेड त्यांना स्वराज्य देऊन करावी अशी मागणी केली व

होमरूल मागणीचा प्रसार केला. विशेषत: ब्रिटिश संसद सदस्यांना वळविण्याचे प्रयत्न केले. ब्रिटिश साम्राज्याचे भवितव्य भारताच्या भवितव्यावर अवलंबून असल्यामुळे इंग्लंडने भारताला स्वराज्य देऊन संतुष्ट करणे शहाणपणाचे राहील असा इशाराही त्यांनी दिला; विशेषत: आपली स्वराज्याची मागणी मान्य करवून घेण्यासाठी इंग्लंड पहिल्या महायुद्धात गुंतले आहे, ही चांगली संधी आहे असे बेझंट यांचे मत होते.

कॉंग्रेसच्या मवाळ नेतृत्वाकडून स्वराज्यप्राप्ती संबंधाने होमरूल चळवळ सुरू करण्यासंबंधी भरीव प्रयत्न होणार नाहीत हा अनुभव आल्यावर ॲनी बेझंट यांनी स्वत:च याबाबत पुढाकार घेण्याचे ठरविले. त्यांनी भारताला ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्य मिळवून देण्यासाठी होमरूल चळवळ सुरू करण्याचे ठरविले. भारतीय शासन हे लोकांनी निवडून दिलेले आणि विधिमंडळाला जबाबदार असावे अशी त्यांची होमरूलबद्दल कल्पना होती. या हेतूने होमरूल लीग किंवा स्वराज्य संघाची स्थापना त्यांनी सप्टेंबर, १९१६ मध्ये केली. थोड्याच अवधीत होमरूल लीगच्या शाखा मुंबई, कानपूर, अलाहाबाद, वाराणसी, मथुरा, कालिकत, मद्रास इत्यादी ठिकाणी स्थापन करण्यात आल्या. होमरूल लीगच्या अध्यक्षा स्वत: बेझंट होत्या, तर अरूंडेल त्यांचे संघटक सचिव होते. सी. पी. रामस्वामी लीगचे सर्वसाधारण सचिव होते, तर बी. पी. वाडिया कोषाध्यक्ष होते.

होमरूल लीगने आपल्या उद्दिष्टांच्या प्रचारासाठी अनेक पत्रके छापून वाटली. बेझंट यांनी स्वत: भारतात अनेक भागांत दौरा करून ठिकठिकाणी भाषणे दिली. या भाषणात त्यांनी इंग्लंडने भारताला स्वराज्य दिले पाहिजे या मागणीचा पुनरुच्चार केला. इंग्लंड भारतावर जो अन्याय करीत आहे त्यावर बेझंट यांनी टीका केली. त्यांच्या प्रभावी भाषणांचा परिणाम भारतीयांवर झाला; त्याहीपेक्षा एक ब्रिटिश महिला भारतीयांच्या हक्कासाठी ब्रिटिश शासनाविरुद्ध लढा देत आहे ही बाब भारतीयांना अपूर्वाईची व कौतुकास्पद वाटली. भारताला स्वराज्य दिल्यास, संतुष्ट झालेल्या भारतीय समाजाकडून इंग्लंडला अधिक चांगल्या रीतीने मदत होईल हा मुद्दाही त्यांनी आपल्या भाषणांमध्ये मांडला. याच सुमारास टिळकांनीही वेगळ्या होमरूल लीगची स्थापना केली. मात्र टिळक आणि बेझंट यांनी परस्परांना सहकार्य करून आपल्या कार्यात समन्वय ठेवला. मुंबई प्रांत, मध्य प्रदेश (सेंट्रल प्रॉव्हिन्सेस्) इत्यादी प्रदेशांत लोकमान्य टिळकांनी आपली होमरूल चळवळ चालविली, तर उर्वरित भारतात बेझंट यांनी आपली चळवळ चालविली.

ॲनी बेझंट आणि टिळक यांच्या होमरूल चळवळीला जनतेचा व्यापक प्रतिसाद मिळत असल्यामुळे ती धोकादायक स्वरूप धारण करीत आहे असे ब्रिटिश अधिकाऱ्यांना वाटले; त्यामुळे काही प्रांतांत टिळक व बेझंट यांच्यावर प्रवेशबंदीचे हुकूम बजावण्यात आले; तसेच चळवळ थोपविण्यासाठी बेझंट आणि त्यांच्या दोन सहकाऱ्यांना अटक करण्याचा निर्णय शासनाने घेतला. मद्रास प्रांताच्या शासनाने जून, १९१७ मध्ये ॲनी बेझंट आणि त्यांचे दोन सहकारी अरुंडेल व वाडिया यांना स्थानबद्ध केले. बेझंट यांच्या स्थानबद्धतेचा निषेध केवळ भारतातच नव्हे तर इंग्लंडमध्येही केला गेला; भारतीय जनमत प्रक्षुब्ध झाले आणि बेझंट यांच्या अटकेविरुद्ध निषेधाच्या सभा अनेक ठिकाणी घेण्यात आल्या. अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीने टिळकांच्या मार्गदर्शनाखाली व्हाइसरॉय यांना पत्र पाठवून बेझंट यांच्या अटकेचा निषेध केला आणि त्याच वेळी त्यांच्या सुटकेची मागणी केली व बेझंट यांच्या होमरूलच्या मागणीकडे अधिक गांभीर्याने लक्ष देण्याची विनंती केली. ब्रिटिश शासनाने या सुमारास भारतीयांना राजकीय सुधारणा देण्याचा निर्णय घेतला. या सुधारणांद्वारे भारतीयांचे सहकार्य मिळविण्याचे शासनाने ठरविले. या धोरणात्मक बदलामुळे व भारतीय जनतेमधील वाढत्या असंतोषामुळे ब्रिटिश शासनाने ॲनी बेझंट व त्यांच्या सहकाऱ्यांची सुटका केली.

बेझंट यांनी भारतीयांच्या राजकीय हक्कांसाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन कॉंग्रेसच्या इ. स. १९१७ मधील कोलकाता येथील अधिवेशनाच्या अध्यक्षा म्हणून त्यांची निवड केली. बेझंट यांना कॉंग्रेसचे अध्यक्षपद देण्यात टिळकांचा मोठा वाटा होता. इ. स. १९१७ मधील कोलकाता येथील कॉंग्रेसच्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून बोलतांना बेझंट यांनी ब्रिटिशांना भारताला स्वराज्य देण्याची मागणी केली. भारताला स्वराज्य का

मिळाले पाहिजे याची चर्चा करताना त्या म्हणाल्या की, स्वतंत्र असणे हा प्रत्येक राष्ट्राचा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि पारतंत्र्यात असल्यामुळे भारताचे शोषण होत आहे, ते थांबवून त्याच्या प्रगतीसाठी भारताला स्वातंत्र्य मिळणे आवश्यक आहे.

भारतमंत्री मॉन्टेग्यू यांनी ब्रिटिश संसदेत १४ ऑगस्ट, १९१७ रोजी एक महत्त्वपूर्ण घोषणा केली. या घोषणेत भारतमंत्र्यांनी हे स्पष्ट केले की, भारतात जबाबदार राज्यपद्धती स्थापन करणे हे ब्रिटिश शासनाचे उद्दिष्ट आहे. हा होमरूल चळवळीचाच परिणाम होता. यानंतर बेझंट यांनी आपली चळवळ मागे घेतली; कारण त्यांनी केलेली जबाबदार राज्यपद्धतीची मागणी हे आपले उद्दिष्ट असल्याचे शासनाने घोषित केले होते. टिळकांनी मात्र आपली होमरूल चळवळ न थांबविता सुरू ठेवली. मॉन्टेग्यू घोषणेनंतरच्या मॉन्टेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा व त्यावर आधारित इ. स. १९१९ चा कायदा हे होमरूल चळवळीचे फलित होते आणि यात ॲनी बेझंट यांचा महत्त्वाचा वाटा होता.

## टिळक आणि होमरूल चळवळ

मंडालेहून सुटून आल्यानंतर टिळकांनी आपल्या अनुयायांना एकत्र करून प्रांतिक परिषद स्थापन केली. स्वराज्याची मागणी घेऊन काँग्रेसने चळवळ सुरू करावी अशी टिळकांची इच्छा होती; परंतु काँग्रेसवर मवाळांचे वर्चस्व होते आणि ते कोणतीही चळवळ हाती घेऊ इच्छित नव्हते. टिळकांच्या काँग्रेस प्रवेशाला मवाळ नेत्यांचा विरोध होता. आपल्या स्वराज्यसाठीच्या चळवळीची योजना काँग्रेसचे मवाळ स्वीकारणार नाहीत याची स्पष्ट कल्पना टिळकांना होती. अशा परिस्थितीत टिळकांनी स्वराज्य किंवा होमरूलसाठी स्वतंत्र चळवळ सुरू करण्याचे ठरविले. मात्र, आपली होमरूल चळवळ टिळकांनी स्वतंत्रपणे चालविली.

स्वराज्याच्या चळवळीचा विचार करण्यासाठी टिळकांनी आपल्या राष्ट्रीय पक्षाच्या सदस्यांची परिषद पुण्यात डिसेंबर, १९१५ मध्ये बोलाविली. या बैठकीला मुंबई प्रांत, मध्य प्रांत आणि वऱ्हाड भागातील प्रतिनिधी उपस्थित होते. या परिषदेने एका समितीकडे स्वराज्याच्या चळवळीसंबंधी अहवाल तयार करण्याचे काम सोपविले. समितीच्या अहवालाच्या आधारावर २८ एप्रिल, १९१६ रोजी बेळगाव येथे होमरूल लीग म्हणजेच स्वराज्य संघाची स्थापना करण्यात आली. जोसेफ बॅप्टिस्टा हे या संघाचे अध्यक्ष होते, तर न. चिं. केळकर सचिव होते. टिळकांचे सहकारी जी. एस. खापर्डे, बा. शि. मुंजे आणि आर. पी. करंदीकर या संघाचे सदस्य होते. आपली स्वराज्यासाठीची होमरूल चळवळ टिळकांनी, ॲनी बेझंट यांच्या चळवळीशी समांतर, समन्वयाने परंतु स्वतंत्रपणे चालविली.

## होमरूल चळवळीचे उद्दिष्ट

टिळकांच्या होमरूल चळवळीचे उद्दिष्ट सनदशीर मार्गांनी स्वराज्य मिळविणे हे होते. या स्वराज्याच्या संकल्पनेत इंग्लंडच्या राजाची सत्ता भारतावर राहील; परंतु कायदे करण्याचे अधिकार भारतीयांना मिळाले पाहिजेत. नोकरशाहीवर भारतीय लोकप्रतिनिधींचे नियंत्रण असावे, भारताची अंतर्गत व्यवस्था भारतीय लोकप्रतिनिधींच्या तंत्राने चालावी इत्यादी गोष्टींचाही त्यात समावेश होता. ब्रिटिश साम्राज्याच्या अंतर्गत स्वयंशासित राज्याचा दर्जा भारताला मिळवून देणे हे या चळवळीचे उद्दिष्ट होते. आपल्या चळवळीच्या प्रचारार्थ टिळकांनी अनेक सभा घेतल्या आणि 'केसरी'मध्ये लेख लिहिले. अतिशय साधी, सोपी व व्यवहारातील उदाहरणे देऊन जनतेला आपल्या स्वराज्याच्या चळवळीचे स्वरूप टिळक स्पष्ट करीत असत.

टिळकांनी आपल्या चळवळीचे क्षेत्र महाराष्ट्र, कर्नाटक व मध्य प्रांत किंवा मध्य प्रदेश हे ठेवले होते; उर्वरित भागात बेझंट यांची होमरूल चळवळ कार्य करीत होती. ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्य हे जरी टिळकांनी आपल्या होमरूल चळवळीचे ध्येय ठेवले असले तरी, पूर्ण स्वातंत्र्य हेच त्यांचे ध्येय होते, ज्याचा स्पष्ट उच्चार त्यांनी केला होता. स्वराज्य हे पूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येयाच्या मार्गावरील एक टप्पा होता; कारण ''राष्ट्राचे अगदी अखेरचे अंतिम साध्य स्वातंत्र्य हे होय'' असे उद्गार टिळकांनी काढले होते.

### चळवळीची वाटचाल

आपल्या होमरूल चळवळीला टिळकांनी मुस्लीम लीगचाही पाठिंबा मिळविला होता. टिळकांच्या होमरूल चळवळीला जनतेचा चांगला प्रतिसाद मिळाला. त्यांच्या होमरूल लीगची सदस्यसंख्या एप्रिल, १९१७ मध्ये चौदा हजार तर, इ. स. १९१८ च्या प्रारंभी बत्तीस हजारांपर्यंत पोहोचली होती. चळवळीच्या प्रचारासाठी त्यांनी चर्चामंडळे, व्याख्याने, भाषणे, प्रचारपत्रके तयार करून वाटणे इत्यादी मार्गांचा वापर केला. इंग्रजी व मराठीत लिहिलेल्या पत्रकांच्या पंधरा हजारांपेक्षा जास्त प्रती टिळकांच्या होमरूल लीगने जनतेत वाटल्या. काँग्रेसची दुसरी कोणतीही चळवळ सुरू नसल्यामुळे टिळक व बेझंट यांची होमरूल चळवळ हीच या काळात राष्ट्रीय चळवळ बनली. टिळकांनी भारताच्या स्वराज्यासाठी आजवर केलेल्या त्यागामुळे आणि नुकत्याच त्यांनी सहन केलेल्या मंडालेतील प्रदीर्घ तुरुंगवासामुळे जनतेमध्ये त्यांच्याबद्दल प्रचंड आदर होता. या वयातही त्यांची भारतीयांना स्वराज्य मिळवून देण्यासाठी चाललेली धडपड लोकांना या चळवळीकडे आकर्षित करून घेण्यास कारणीभूत ठरली.

### शासनाची दडपशाही

भारतीय नोकरशाहीवर आणि प्रामुख्याने त्यातील साम्राज्यवादी ब्रिटिश अधिकाऱ्यांवर टिळक नेहमीच प्रहार करीत. नोकरशाही त्यांना ब्रिटिश सत्तेचा क्रमांक एकचा शत्रू मानीत असे. टिळकांच्या होमरूल चळवळीचा लोकांवरील प्रभाव वाढू लागताच ब्रिटिश शासन अस्वस्थ झाले आणि त्यांनी ही चळवळ दडपून टाकण्याचे ठरविले. या हेतूने जुलै, १९१६ मध्ये मुंबई प्रांताच्या शासनाने टिळकांवर होमरूल चळवळीत प्रक्षोभक भाषणे केल्याचा आरोप करून खटला भरला आणि व्यक्तिगत जामीन म्हणून चाळीस हजार रुपयांची मागणी केली. टिळकांनी शासनाच्या कार्यवाहीविरुद्ध न्यायालयात दाद मागितली. उच्च न्यायालयाने शासनाचा आदेश अवैध ठरविला आणि टिळकांची निर्दोष म्हणून सुटका केली. मागच्या वेळच्या (१९०८) टिळकांवरील खटल्याप्रमाणे यावेळी न्यायालयाने शासनावर टीका करणे हा गुन्हा मानला नाही; यामुळे टिळकांनी आपला होमरूल चळवळीचा प्रचार देशभर सुरू ठेवला.

या चळवळीचा प्रभाव समाजातील विविध घटकांवर किती पडला होता, याचा अंदाज तत्कालीन शासकीय पत्रव्यवहारावरून दिसून येतो. इ. स. १९१७ मध्ये भारत सरकारच्या गृहखात्याकडून इंग्लंडमधील भारतमंत्र्याला कळविण्यात आले होते की, 'मवाळांचा प्रभाव काँग्रेस पक्षात ओसरला असून जनता त्यांच्यामागे नाही; सध्या टिळक आणि बेझंट यांचाच फक्त जनतेवर प्रभाव आहे;' तरीही होमरूल चळवळीच्या नेत्यांवर बंधने घालून चळवळीचा प्रभाव कमी करण्याचा प्रयत्न शासनाने केला. टिळक आणि बिपिनचंद्र पाल यांना पंजाब व दिल्लीच्या सरकारांनी त्या प्रदेशात प्रवेशास मनाई केली. व्हाइसरॉयने होमरूल चळवळीबाबत भारतमंत्र्यांना आपल्या अहवालात कळविले की, 'श्रीमती बेझंट व टिळक इंग्लंडकडून भारताला स्वराज्य (होमरूल) ताबडतोब मिळाले पाहिजे या मागणीसाठी चळवळ उत्साहाने चालवीत आहेत. आजवर ज्यांनी अशा प्रकारच्या राजकीय मागणीला पाठिंबा दिला नव्हता, समाजातील असा वर्गही या चळवळीमागे उभा आहे, त्यांचाही या चळवळीला पाठिंबा आहे.' इ. स. १९१७ मध्ये होमरूल चळवळीच्या नेत्यांनी आपल्या मागणीसाठी निःशस्त्र प्रतिकाराचा (पॅसिव्ह रेझिस्टन्स) मार्ग हाताळण्याचा विचार गंभीरपणे केला होता.

### परदेशातील होमरूलचा प्रचार

भारतीयांनी स्वराज्याच्या मागणीसाठी चालविलेल्या होमरूल चळवळीबद्दल माहिती परदेशांतील शासनाला व जनतेला करून देण्याचा प्रयत्न होमरूल चळवळीच्या नेत्यांनी केला. यामागे हेतू असा होता की, इतर देशांचे, विशेषतः अमेरिकेचे दडपण इंग्लंडवर येऊन ब्रिटिश शासन भारतीयांना स्वराज्य देईल. पहिले महायुद्ध सुरू झाल्यामुळे इंग्लंडला अमेरिकेच्या मदतीची गरज होती; तसेच अमेरिकेचे अध्यक्ष विल्सन यांना लोकशाही,

राष्ट्रवाद, पारतंत्र्यातील राष्ट्रांना स्वयंनिर्णयाचा हक्क देण्याबद्दल असलेली आस्था लक्षात घेऊन त्यांची मदत घेण्याचा प्रयत्न भारतीयांनी केला.

मद्रास प्रांतातील होमरूल लीगचे अध्यक्ष सर सुब्रमण्यम अय्यर यांनी अमेरिकेचे अध्यक्ष विल्सन यांना जून, १९१७ मध्ये पत्र पाठवून ते ज्या लोकशाही व स्वयंनिर्णयाचा पुरस्कार करतात ती तत्त्वे भारताला लागू करण्याबाबत प्रयत्न करावे अशी विनंती केली आणि स्वराज्याचे आश्वासन इंग्लंडने भारताला दिल्यास भारत इंग्लंडला युद्धप्रयत्नात भरीव मदत करील अशी हमी अय्यर यांनी आपल्या पत्रात दिली. अय्यर यांनी मद्रास उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश म्हणून काम केले होते. हे पत्र प्रसिद्ध झाल्यावर इंग्लंडमध्ये तेथील संसदेत त्यावर टीका करण्यात आली. भारतमंत्री मॉन्टेग्यू यांनी या पत्राचा 'अशोभनीय' या शब्दात निषेध केल्यावर सुब्रमण्यम अय्यर यांनी त्यांना ब्रिटिश शासनाने बहाल केलेल्या मानाच्या पदव्यांचा त्याग केला मात्र, अय्यर यांच्या पत्राला अमेरिकेत व्यापक प्रसिद्धी मिळाली. अमेरिकन काँग्रेसच्या सदस्यांना या पत्राच्या प्रती देण्यात आल्या होत्या. या पत्रामुळे भारतीय बाजू अमेरिकेच्या लक्षात आली. भारताच्या होमरूलच्या मागणीला अमेरिकेत पाठिंबा मिळाला. अमेरिकन कामगार संघटनांनी भारताला ताबडतोब स्वराज्य दिले जावे अशी मागणी केली. इंग्लंडच्या भारतासंबंधी धोरणावर अमेरिकेत टीका झाली.

टिळकांनी भारतातील होमरूल चळवळीचा प्रचार करण्यासाठी एन. एस. हार्डीकर आणि के. डी. शास्त्री यांना अमेरिकेत पाठविले. अमेरिकेचा पाठिंबा भारतासाठी महत्त्वाचा आहे याची जाणीव टिळकांना होती. लाला लजपतराय जे पूर्वी अमेरिकेत होते, त्यांनी अमेरिकेत होमरूल चळवळीचा प्रचार केला. न्यूयॉर्क येथे इंडियन होमरूल लीगची स्थापना करण्यात येऊन या संघटनेच्या वतीने जुलै, १९१८ मध्ये 'यंग इंडिया' हे नियतकालिक काढण्यात आले. या नियतकालिकाने होमरूल चळवळीच्या विरोधकांच्या आक्षेपांना उत्तर देऊन आणि भारतीयांच्या होमरूल चळवळीबाबत बाजू मांडून चळवळीला हातभार लावला. होमरूल चळवळीच्या प्रचारासाठी शास्त्री व हार्डीकर यांनी अनेक शहरांना भेटी दिल्या; व्याख्याने व भाषणे दिली; परिषदा आयोजित केल्या; भारतीयांच्या होमरूलच्या मागणीचे समर्थन करणाऱ्या पुस्तिकांचे वाटप केले; वृत्तपत्रांच्या कार्यालयांना भेटी दिल्या आणि अनेक राजकीय नेत्यांच्या भेटी घेतल्या. अमेरिकेतील होमरूल प्रचारासाठी केलेल्या कार्याचा हा वृत्तांत हार्डीकर यांनी टिळकांना लिहिलेल्या पत्रात कळविला होता.

युद्धसमाप्तीनंतर टिळकांनी फ्रान्सचे अध्यक्ष व पॅरिस शांतता परिषदेचे अध्यक्ष क्लेमिन्सो यांना पत्र पाठवून भारताच्या पुढील मागण्यांना पाठिंबा देण्याची विनंती केली–

(१) भारताच्या स्वराज्याच्या मागणीला पाठिंबा देणे.

(२) भारताला स्वयंनिर्णयाचे तत्त्व लागू करणे.

(३) आशियातील एक प्रमुख सत्ता म्हणून भारताला उदयास येण्यास मदत करणे.

(४) ब्रिटिश वसाहतींना राष्ट्रसंघात (लीग ऑफ नेशन्स) प्रतिनिधी पाठविण्याचा जसा हक्क आहे तसाच हक्क भारताला मिळावा.

इंग्लंडमध्येही होमरूल लीगची स्थापना करण्यात आली. या शाखेच्या प्रयत्नातून भारताच्या होमरूल चळवळीला पाठिंबा असणारा ब्रिटिश संसदेतील सदस्यांचा एक गट तयार करण्यात आला. इंग्लंडमधील लेबर पार्टीने इ. स. १९१८ मध्ये आपल्या पक्षाच्या अधिवेशनात भारताच्या होमरूल चळवळीला पाठिंबा व्यक्त करणारा ठराव संमत केला. टिळकांनी जुलै, १९१७ मध्ये आपले सहकारी जोसेफ बॅप्टिस्टा यांच्या नेतृत्वाखाली होमरूलच्या प्रचारासाठी एक शिष्टमंडळ इंग्लंडला पाठविले. या शिष्टमंडळाने अनेक ठिकाणी सभा घेऊन भारतीयांच्या होमरूल चळवळीबद्दल माहिती दिली; तसेच त्यांनी इंग्लंडमधील भारतविरोधी प्रचाराला उत्तर दिले. स्वतः

टिळकांनी इंग्लंडमध्ये होमरूल चळवळीच्या प्रचारासाठी इ. स. १९१८ च्या मार्चच्या अखेरीस जाण्याचे ठरविले. टिळकांच्या शिष्टमंडळाच्या प्रवास व इतर खर्चासाठी मुंबईतील गिरणी कामगारांनीही प्रत्येकी एक आणा वर्गणी जमवून काही रक्कम उभी केली होती. मुंबईतील व्यापाऱ्यांनीसुद्धा टिळकांना आर्थिक मदत केली. टिळकांच्या शिष्टमंडळाला इंग्लंडच्या वाटेवर असताना कोलंबोपाशी त्यांचे पासपोर्ट रद्द केल्याचे सरकारने त्यांना कळविले आणि टिळकांना त्यांच्या शिष्टमंडळासह परत यावे लागले; याचा सर्व भारतीयांनी निषेध केला. याशिवाय अन्य दोन शिष्टमंडळे मार्च, १९१८ मध्ये टिळकांनी इंग्लंडला पाठविली; पण जिब्राल्टरहून त्यांना ब्रिटिश शासनाच्या आज्ञेमुळे परत यावे लागले. पुढे व्हॅलेन्टाइन चिरोल विरुद्धच्या बदनामीच्या खटल्यासाठी टिळक सप्टेंबर, १९१८ मध्ये इंग्लंडला गेले. इंग्लंडला जाताना टिळकांवर ते राजकारण करणार नाहीत असे बंधन घालण्यात आले होते. आपल्या इंग्लंडमधील मुक्कामात टिळकांनी लेबर पार्टीच्या नेत्यांशी (मजूर पक्ष) संपर्क प्रस्थापित केला. इंग्लंडच्या राजकारणात लेबर पार्टीला महत्त्व येईल असा टिळकांचा अंदाज होता. हा त्यांचा अंदाज पुढे खरा ठरला आणि लेबर पार्टीला भारतीय स्वातंत्र्यलढ्याबद्दल आस्था असल्यामुळे त्यांच्याशी संपर्क ठेवण्याचा प्रयत्न टिळकांनी केला होता. भारताला स्वातंत्र्य देण्याचा निर्णय अखेर सत्तारूढ लेबर पार्टीनेच घेतला होता.

भारतमंत्री मॉन्टेग्यू यांनी २० ऑगस्ट, १९१७ रोजी ब्रिटिश संसदेत भारताला टप्प्याटप्प्याने जबाबदार शासनपद्धती देण्याचे ब्रिटिश शासनाचे उद्दिष्ट असल्याची घोषणा केली आणि याबद्दल चर्चा करण्यासाठी भारतात जाण्याचा आपला विचार असल्याचेही मॉन्टेग्यू यांनी स्पष्ट केले. या घोषणेचा परिणाम भारतीय राजकारणावर झाला. ॲनी बेझंट यांनी आपली होमरूल चळवळ आवरती घेतली. काँग्रेसमधील मवाळ मॉन्टेग्यूच्या योजनेच्या तपशिलाची वाट पाहू लागले. होमरूल चळवळीची आता गरज नाही असे मवाळांचे मत बनले; मात्र, टिळकांनी आपली होमरूल चळवळ न थांबवता तशीच पुढे सुरू ठेवली. टिळकांचा ब्रिटिश शासनावर एक तर फारसा विश्वास नव्हता, त्यामुळे प्रत्यक्ष योजना जाहीर होईपर्यंत चळवळ थांबविणे त्यांना योग्य वाटत नव्हते; तसेच चळवळीचे दडपण राहिले, तरच ब्रिटिश शासन आपली योजना लवकर जाहीर करेल असेही त्यांना वाटत होते. शासन ज्या सुधारणा देते त्या स्वीकारून, आपला लढा आपण उर्वरित मागण्यांसाठी सुरू ठेवावा असे सामान्यपणे टिळकांचे धोरण होते. मात्र, जे उधाण व जो प्रचंड प्रतिसाद होमरूल चळवळीला लाभला होता, त्याला आवर घालण्याचे काम मॉन्टेग्यूच्या घोषणेने केले. इंग्लंड जेव्हा युद्धात गुंतले होते अशा बिकट प्रसंगी भारतीयांमध्ये होमरूल चळवळीमुळे ऐक्य निर्माण झाले होते; त्या ऐक्यात फूट पाडण्याचे काम ब्रिटिश शासनाच्या या घोषणेने साध्य केले.

### होमरूल चळवळीचे महत्त्व

बंगालच्या फाळणीनंतर निर्माण झालेल्या वंगभंग आणि स्वदेशी आंदोलनानंतर पुन्हा एकदा स्वराज्यप्राप्तीच्या राष्ट्रीय प्रश्नावर होमरूल चळवळीने जनतेला संघटित केले. पाश्चात्य देशांत विशेषत: अमेरिका व इंग्लंडमध्ये भारताच्या स्वराज्याच्या चळवळीला होमरूल चळवळीने अनुकूल वातावरण निर्माण केले. या चळवळीचा परिणाम म्हणूनच भारतमंत्री मॉन्टेग्यू यांनी जबाबदार शासनपद्धती भारताला देण्याची घोषणा केली. महायुद्धात इंग्लंड गुंतलेले असताना, होमरूल चळवळीमुळे भारतीयांमध्ये जो आत्मविश्वास व निर्धार स्वराज्यप्राप्तीबाबत दिसून आला, त्याची दखल घेऊन ब्रिटिश शासनाला ही घोषणा करावी लागली होती असे म्हणणे योग्य होईल. टिळकांनी मात्र अखेरपर्यंत आपला लढा सुरूच ठेवला. भारतीय राजकारणात या काळात टिळक हे सर्वांत प्रभावशाली नेते होते असा अभिप्राय भारतमंत्री मॉन्टेग्यू यांनी टिळकांच्या नोव्हेंबर, १९१७ मधील भेटीनंतर नोंदविला होता.

### मॉन्टेग्यू-चेम्सफोर्ड रिपोर्ट

भारतमंत्री मॉन्टेग्यू यांनी भारताला इ. स. १९१७ च्या अखेरीस भेट देऊन भारताला राजकीय सुधारणा देण्याबाबत भारतातील विविध पक्ष व संघटनांच्या नेत्यांचे मत जाणून घेतले आणि त्यानंतर ८ जुलै, १९१८ रोजी

म्हणता येईल.

## भारतातील सशस्त्र क्रांतिकारी चळवळ

भारतात ब्रिटिश सत्तेची स्थापना झाल्यावर काही काळानंतर त्या सत्तेविरुद्धचा असंतोष जनतेत निर्माण होऊ लागला. या असंतोषाचा उद्रेक इ. स. १८५७ च्या रूपाने झाला; परंतु ब्रिटिशांनी हा उठाव आपल्या लष्करी बळाचा वापर करून मोडून काढला. यानंतर भारतीयांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध आपला असंतोष व्यक्त करण्यासाठी आणि आपल्यावरील अन्यायाविरुद्ध लढा देण्यासाठी प्रामुख्याने सनदशीर मार्गाचा वापर केला. हा लढा प्रामुख्याने काँग्रेसच्या नेतृत्वाखाली दिला गेला; तरीही भारतीय समाजात तरुणांचा असा एक वर्ग अस्तित्वात होता, ज्याने सशस्त्र क्रांतीच्या मार्गानेच स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांविरुद्ध लढा दिला; म्हणून भारतीय स्वातंत्र्यलढ्यात अहिंसक आंदोलनाचा आणि सशस्त्र क्रांतीचा असे दोन समांतर प्रवाह दिसून येतात.

**क्रांतिकारी चळवळीच्या उदयाची कारणे**

(१) **ब्रिटिशांचे अत्याचार व शोषण** : दादाभाई नौरोजींसारख्या नेत्यांनी ब्रिटिशांकडून भारतीयांचे शोषण केले जात आहे याचे साधार विवेचन केले होते. ब्रिटिशांच्या काळात भारतात पडलेल्या दुष्काळांना व त्यातील मनुष्यहानीला ब्रिटिश शासनाची धोरणे आणि सहानुभूतीचा अभाव कारणीभूत आहे हे भारतीयांना माहीत झाले होते. लिटन, कर्झनसारख्या कट्टर साम्राज्यवादी गव्हर्नर जनरल यांनी भारतीयांबद्दल दाखविलेली तुच्छता व वांशिक अहंता, भारतीयांना प्रशासनात येऊ न देण्याचे ब्रिटिशांचे धोरण, आपल्या लष्करी सामर्थ्याबद्दल त्यांचा उद्दामपणा, विविध अन्यायकारक कायदे इत्यादी बाबींचा एकत्रित परिणाम होऊन भारतीय तरुण ब्रिटिश शासनाबद्दल संतप्त होते, त्यातूनच क्रांतिकार्याला चालना मिळाली.

(२) **जहालांचा लढाऊ राष्ट्रवाद** : काँग्रेसच्या प्रारंभीच्या मवाळ नेत्यांनी सरकारकडे भारतीयांवर होत असलेल्या अन्यायाबाबत आणि भारतीयांच्या मागण्यांबाबत अर्ज, विनंती आणि शिष्टमंडळाचा मार्ग स्वीकारला; परंतु त्यातून काही साध्य होत नाही हे तरुणांच्या लक्षात आले. जहालांच्या कालखंडातील टिळक, लाला लजपतराय, अरविंद घोष यांसारख्या नेत्यांनी तरुणांमध्ये राष्ट्रभक्तीचा अंगार फुलविला; त्यांना परकीय राजवटीकडून होणाऱ्या अन्यायांविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा दिली. या नेत्यांच्या वृत्तपत्रांनी आणि इतर वृत्तपत्रांनी तरुणांची स्वातंत्र्यलढ्यात भाग घेण्यासाठी मने तयार केली; यातूनच काही तरुण क्रांतिकार्याकडे वळले; या नेत्यांचे क्रांतिकारी संघटनांशी संबंध होते.

(३) **टिळकांचे कार्य** : टिळकांच्या काळापासून भारतीय राजकारणाला लढाऊ राष्ट्रवादाचे आणि जहालवादाचे वळण मिळाले. त्यांनी आपल्या चळवळीत अनेक राष्ट्रभक्त तरुणांना आणले; त्यांपैकी काही तरुण क्रांतिकार्याकडे वळले. अशा तरुणांशी टिळकांनी संपर्क ठेवला होता. स्वातंत्र्यवीर सावरकरांना इंग्लंडमध्ये शिक्षणासाठी स्कॉलरशिप देण्याबद्दल टिळकांनी श्यामजी कृष्ण वर्मा यांना पत्र लिहिले होते. रँडची हत्या करणाऱ्या चापेकर बंधूंशी टिळकांचे संबंध होते. टिळकांनी क्रांतिकारकांचा तेजोभंग कधीही केला नाही. टिळकांना क्रांतिकारकांचा हिंसेचा मार्ग व्यवहार्य वाटत नव्हता; परंतु त्यांचा धगधगता राष्ट्रवाद टिळकांना मान्य होता. क्रांतिकारकांच्या त्याग व बलिदानाचा टिळकांनी सदैव आदर केला. क्रांतिकारकांच्या कार्याचे (हिंसाचाराचे नव्हे) त्यांनी समर्थन केले. टिळकांच्या प्रभावामुळेच क्रांतिकार्याला बंगालच्या फाळणीनंतर गती आली होती.

(४) **भारतीय तरुणांची कोंडी** : शासन भारतीयांचे सर्व हक्क नाकारीत होते, त्यांना प्रशासकीय सेवेत येण्याची संधी नाकारीत होते, राष्ट्रीय चळवळीत भाग घेतल्याबद्दल कठोर शिक्षा करीत होते; अशा शासनाला

धडा शिकविण्यासाठी तरुणांनी हिंसाचाराचा मार्ग स्वीकारला. लाला लजपतराय आणि टिळकांसारख्या नेत्यांना हद्दपारी आणि तुरुंगवासाची शिक्षा दिली जाते हे पाहिल्यानंतर भारतीय तरुण पेटून उठणे आणि त्यांनी हाती शस्त्र घेणे हे साहजिकच होते.

**क्रांतिकारी चळवळीची उद्दिष्टे**

(१) **ब्रिटिशांना दहशत बसविणे** : देशाला स्वातंत्र्य मिळवून देणे व मातृभूमीला पारतंत्र्यातून मुक्त करणे हे क्रांतिकारकांचे पहिले उद्दिष्ट होते. या ध्येयाच्या प्राप्तीसाठी त्यांनी ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या जरी हत्या केल्या असल्या तरी या हत्यांमुळे स्वातंत्र्य मिळणार नाही याची जाणीव त्यांना होती. त्या अधिकाऱ्यांशी क्रांतिकारकांचे वैयक्तिक शत्रुत्व होते असे नाही, तर ते अधिकारी दमनकारी ब्रिटिश साम्राज्य सत्तेचे आधारस्तंभ होते म्हणून क्रांतिकारकांनी त्यांच्याविरोधी आघाडी उघडली होती. या हत्यांमुळे ब्रिटिश शासकांवर दहशत बसेल व ते भारतीय जनतेवर अन्याय करण्यास धजावणार नाहीत असा विश्वास त्यांना होता.

(२) **ब्रिटिशांबद्दलची भीती दूर करणे** : ब्रिटिशांच्या लष्करी सामर्थ्यामुळे भारतीयांना त्यांच्याबद्दल भीती व धाक वाटत असे. ब्रिटिश अधिकाऱ्यांची हत्या करून भारतीयांच्या मनातील ब्रिटिश सत्तेबद्दलची भीती दूर करणे हे क्रांतिकारकांचे उद्दिष्ट होते. ब्रिटिश सत्ता ही अजिंक्य नाही, तिला आव्हान देणारे तरुण भारतात आहेत हे क्रांतिकारकांना आपल्या साहसी कृत्यांमधून दाखवून द्यावयाचे होते.

(३) **ब्रिटिशांचा अन्याय जगासमोर मांडणे** : ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या हत्या केल्यावर त्याची चर्चा सर्वत्र होईल आणि त्यातून ब्रिटिश शासकांच्या दुष्कृत्यांची व ते भारतीयांवर करीत असलेल्या अन्याय, अत्याचाराची माहिती जगाला होईल अशी क्रांतिकारकांची अपेक्षा होती; म्हणूनच काही वेळा क्रांतिकारकांनी पळून जाता येणे शक्य असूनही स्वत:ला अटक करवून घेतली. काही क्रांतिकारकांनी इंग्रजांच्या राजधानीत जाऊन इंग्रजी अधिकाऱ्यांच्या हत्या केल्या.

(४) **आत्मबलिदानापासून इतरांना प्रेरणा** : ब्रिटिश सत्तेशी संघर्ष करण्यासाठी आत्मबलिदान करणाऱ्यांची संख्या सदैव मर्यादित असणार याची जाणीव क्रांतिकारकांना होती; तेव्हा कमीत कमी प्राणहानी देऊन त्यातून अधिकाधिक परिणाम साधणे हे त्यांचे उद्दिष्ट होते; तसेच आपल्या हौतात्म्यातून भारतीयांना स्वातंत्र्यलढ्यात यथाशक्ती योगदान करण्याची प्रेरणा मिळेल ही अपेक्षा क्रांतिकारकांना होती. ब्रिटिशांच्या अन्यायी राजवटीला निमूटपणे सहन करणारी ही भारतीय जनता यातून सक्रिय व्हावी असा त्यांचा हेतू होता.

**क्रांतिकारकांचे मार्ग**

मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारकांनी जे अनेक मार्ग व साधने वापरली ती पुढीलप्रमाणे होती-

(१) ब्रिटिश सत्तेला दहशत बसविण्यासाठी ब्रिटिश अधिकाऱ्यांची हत्या करणे.

(२) सरकारी मालमत्तेला नुकसान पोहोचविणे.

(३) ब्रिटिशांच्या सैन्यातील भारतीय सैनिकांना आपल्याकडे वळवून, बंड घडवून आणणे.

(४) परकीय सत्तेची मदत घेऊन इंग्लंडवर दबाव आणणे.

(५) इतर देशांतून शस्त्रास्त्रे व इतर मदत मिळविणे.

(६) क्रांतिकार्यासाठी आवश्यक पैसा सरकारी खजिना लुटून उभा करणे.

(७) बॉम्ब तयार करणे.

(८) परदेशात भारतीय स्वातंत्र्याच्या प्रश्नांचा प्रसार करणे.

(९) गुप्त संघटना व प्रशिक्षित क्रांतिकारी दल तयार करणे.

(१०) प्रचारसाहित्य तयार करणे, इत्यादी मार्गांचा वापर क्रांतिकारकांनी आपल्या कार्यात केला.

क्रांतिकारी संघटनांकडून आपल्या सदस्यांसाठी उपयुक्त साहित्य निर्माण केले गेले किंवा उपलब्ध केले गेले. त्यांची वैचारिक भूमिका वाचन, चर्चा इत्यादी मार्गांनी घडविली गेली.

## क्रांतिकार्याचे स्वरूप

प्रारंभीच्या क्रांतिकारकांनी वैयक्तिकरीत्या साहसी कृत्ये केली; परंतु पुढे मात्र संघटनात्मक कार्यावर अधिक भर दिला गेला. क्रांतिकारी चळवळीत येणारे बहुतेक तरुण सुशिक्षित असत; त्यांना क्रांतिकारी चळवळीत दाखल करून घेण्यापूर्वी त्यांच्या साहसाची, धाडसाची, विश्वासार्हतेची, निष्ठेची व देशभक्तीच्या प्रखरतेची परीक्षा घेतली जाई. क्रांतिकारी संघटनांत गुप्तता पाळली जाई. वंगभंगाच्या चळवळीच्या काळात क्रांतिकारकांवर धार्मिक प्रभाव अधिक होता. कालिमाता, भवानी, हनुमान, भारतमाता इत्यादींच्या प्रतिमा ठेवल्या जात; तसेच प्रारंभी देशाचे स्वातंत्र्य हेच उद्दिष्ट होते; परंतु पुढे मात्र स्वातंत्र्योत्तर भारतात शासन कसे असावे याबद्दलचा विचार क्रांतिकारकांनी केलेला दिसतो. जसे, भारतात गणराज्य असावे, समाजवादी समाजरचना असावी हे उद्दिष्ट घेऊन क्रांतिकारकांनी आपल्या संघटनांना तशी नावे दिली. उदाहरणार्थ– हिन्दुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मी, आंतरराष्ट्रीय क्रांतिकारी संघटनांशी भारतीय क्रांतिकारकांचा संपर्क आला; त्यांची मदत भारतीय क्रांतिकारकांनी घेतली. क्रांतिकारी चळवळीत बंगाल, महाराष्ट्र व पंजाब हे प्रांत आघाडीवर होते.

**वासुदेव बळवंत फडके**

इ. स. १८५७ नंतरही महाराष्ट्रात सशस्त्र उठाव तुरळकपणे होतच राहिले. फडके यांचा उठाव हा त्यांपैकीच एक होता. फडके यांना 'आद्य क्रांतिकारक' म्हणून मान दिला जातो. सरकारी नोकरीत काम करताना ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या अमानुष व उद्दाम वागणुकीमुळे त्यांनी नोकरी सोडून दिली. पुण्याच्या सार्वजनिक सभेच्या कार्यात काम करताना न्यायमूर्ती रानडे यांच्या विचारांचा व लिखाणाचा फडक्यांवर प्रभाव पडला. ब्रिटिशांकडून भारतीयांचे आर्थिक शोषण कसे केले जात आहे हे फडके यांच्या लक्षात आले; त्यातून प्रेरणा घेऊन फडके यांनी स्वदेशीच्या प्रचाराला सुरुवात केली. लोकांसमोर भाषणे करून ब्रिटिशांची सत्ता भारतीयांना कशी हानीकारक आहे हे फडके पटवून देऊ लागले. या सुमारास म्हणजे इ. स. १८७६ मध्ये महाराष्ट्रात दुष्काळ पडला. लोकांचे हाल होत असतानाही परकीय शासन निष्क्रिय होते; याचाही परिणाम परकीय सत्तेबद्दल फडके यांना चीड येण्यात झाला. फडक्यांना त्यांच्या जनजागृतीच्या मोहिमेत सुशिक्षितांमध्ये उदासीनता आढळून आली होती; यामुळेच त्यांनी अशिक्षित रामोशी जमातीच्या शूर व धाडसी लोकांना हाताशी धरून ब्रिटिशांविरुद्ध उठाव करण्याचे ठरविले. त्यासाठी लागणारी शस्त्रास्त्रे मिळविण्यासाठी त्यांनी श्रीमंत शेठ-सावकारांच्या घरांवर दरोडे घातले; या पैशाचा उपयोग त्यांनी दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठीही केला. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी त्यांचे शोषण करणाऱ्या सावकारांवर हल्ले केले होते. पश्चिम महाराष्ट्रात सह्याद्रीच्या दुर्गमतेच्या आधाराने परकीय सत्तेला फडक्यांनी आव्हान दिले; परंतु भारतीय जनतेची उदासीनता व ब्रिटिश सत्तेचे सामर्थ्य यापुढे फडकेंचा उठाव टिकू शकला नाही. जुलै, १८७९ मध्ये ते पकडले गेले व त्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली; त्यांना भारतापासून दूर एडनच्या तुरुंगात ठेवण्यात आले. तेथूनही सुटकेचा एक अयशस्वी प्रयत्न त्यांनी केला. तुरुंगात त्यांचा जो छळ झाला तो सहन न होऊन फेब्रुवारी, १८८३ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. फडके यांचे कार्य इतरांना प्रेरणा देणारे ठरले; बंकीमचंद्रांच्या 'आनंदमठ' कादंबरीवर फडकेंचा प्रभाव दिसून येतो.

**चापेकर बंधू**

टिळकांच्या राजकीय कारकिर्दीच्या प्रारंभीच्या काळात महाराष्ट्रात व विशेषत: पुण्यात टिळकांच्या प्रभावाने बलोपासना, राष्ट्रवाद, परकीय सत्तेबद्दल असंतोष व परकियांच्या अन्यायाला सडेतोड उत्तर देण्याची प्रेरणा तरुणांना मिळाली. इ. स. १८९६-९७ च्या सुमारास पुण्यात प्लेगची साथ पसरली होती. या साथीविरुद्ध उपाययोजनेसाठी नेमलेल्या पथकातील गोऱ्या सैनिकांकडून पुण्यातील जनतेवर अनेक अत्याचार झाले. याविरुद्ध शासनाला निवेदन

देऊनही त्याची दखल घेतली गेली नाही. गोऱ्या सैनिकांनी पुणेकरांवर विशेषत: महिलांशी केलेल्या दुर्वर्तनाची पुणेकर तरुणांना चीड आली होती. त्यांचा राग प्लेगविरोधी मोहिमेचा प्रमुख रँड या ब्रिटिश अधिकाऱ्यावर होता; तसेच महाराष्ट्रात दुष्काळ व प्लेगच्या साथीचे संकट असतानाही इंग्लंडच्या राणीच्या राज्यारोहणाचा हीरक महोत्सव साजरा केला जावा याची चापेकर बंधूंना चीड आली होती. यामुळे २२ जून, १८९७ रोजी पुण्यात व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहणाच्या हीरकमहोत्सवाच्या समारंभाहून परतणाऱ्या रँड व आयर्स्ट यांच्यावर गोळ्या झाडल्या गेल्या, ज्यात हे दोन्ही अधिकारी मारले गेले. या प्रकरणी पोलिसांनी दामोदर व बाळकृष्ण चापेकर या बंधूंचा हात असल्याच्या आरोपावरून त्यांना अटक केली. त्यांच्यावरील खटल्यात न्यायालयाने दोघा बंधूंना फाशीची शिक्षा दिली. चापेकरांच्या अटकेला ज्या द्रविड बंधूंची फितुरी कारणीभूत ठरली त्यांची हत्या वासुदेव चापेकर याने केली; त्यालाही फाशीची शिक्षा न्यायालयाने दिली. एकाच कुटुंबातील तीन तरुणांनी हौतात्म्य पत्करले.

रँडच्या हत्येमुळे पुणेकरांवर पुन्हा जुलूम करणाऱ्या ब्रिटिश अधिकाऱ्यांविरुद्ध टिळकांनी 'केसरी'तून कडक टीका केली. चापेकर बंधूंशी टिळकांचे चांगले संबंध होते; बाळकृष्ण चापेकर याला अज्ञातवासात मदतीची व्यवस्था करण्यासाठी टिळकांनी प्रयत्न केले. टिळकांचा या प्रकरणात हात असल्याच्या संशयावरून गणेशोत्सवात प्रक्षोभक भाषणे केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला. या खटल्यात टिळकांना अठरा महिन्यांची शिक्षा झाली. चापेकर बंधूंच्या हौतात्म्याने अनेकांना विशेषत: स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना क्रांतिकार्याची प्रेरणा मिळाली.

**अभिनव भारत व सावरकर बंधू**

वि. दा. सावरकर यांनी चापेकर बंधूंच्यापासून प्रेरणा घेऊन क्रांतिकार्याची व देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी शेवटच्या श्वासापर्यंत ब्रिटिश सत्तेशी झुंजण्याची प्रतिज्ञा केली. सुदैवाने त्यांना भारताला स्वातंत्र्य मिळाल्याचे पाहण्याचे भाग्य लाभले. जानेवारी, १९०० मध्ये सावरकरांनी नाशिक येथे 'मित्रमेळा' या संघटनेची स्थापना केली. देशाच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र लढा आवश्यक आहे ही सावरकरांची धारणा होती, किंबहुना 'रणाविन स्वातंत्र्य कोणा मिळाले?' असा त्यांचा सवाल होता. या हेतूने सावरकर समविचारी मित्रांना एकत्र करून तत्कालीन राजकीय परिस्थितीवर चर्चा करीत, इतर देशांच्या स्वातंत्र्यलढ्यांचा अभ्यास करीत आणि रामदास, शिवाजीमहाराज यांसारख्यांची चरित्रे वाचत असत. राजकीय जागृती व समर्पणाची भावना सदस्यांमध्ये रुजविली जाई. मित्रमेळ्याच्या वतीने महापुरुषांचे उत्सव साजरे केले जात. इ. स. १९०२ मध्ये सावरकर नाशिक सोडून पुण्याला शिक्षणासाठी आले. इ. स. १९०४ मध्ये 'मित्रमेळा' या संघटनेचे रूपांतर 'अभिनव भारत' या संघटनेत करण्यात आले. पुण्यामध्ये टिळकांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय चळवळीत सावरकरांनी भाग घेतला. बहिष्कार आंदोलनात परदेशी कापडांची होळी करण्यात सावरकरांचा पुढाकार होता. इ. स. १९०६ मध्ये सावरकर उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी टिळकांनी त्यांना मदत केली.

सावरकरांच्या अनुपस्थितीत अभिनव भारताचे नेतृत्व सावरकरांचे ज्येष्ठ बंधू गणेश दामोदर ऊर्फ बाबाराव सावरकर यांनी सांभाळले. यावेळेपावेतो अभिनव भारताच्या शाखा महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर काही ठिकाणी स्थापन झाल्या होत्या. नाशिकच्या अभिनव भारत शाखेने कवी गोविंद यांच्या राष्ट्रवादी गीतांचा एक संग्रह 'लघु अभिनव भारतमाला' इ. स. १९०८ मध्ये प्रकाशित केला. त्यातल्या बहुतेक कविता ब्रिटनच्या सम्राटाविरुद्ध, त्यांच्या भारतातील सरकारविरुद्ध भारतीयांमध्ये द्वेषभावना पसरविणाऱ्या आहेत; तसेच ब्रिटनविरुद्ध लढ्याची प्रेरणा देणाऱ्या आहेत, असा आरोप या पुस्तकाचे प्रकाशक बाबाराव सावरकर यांच्यावर शासनाकडून ठेवण्यात आला. राजद्रोहाच्या आरोपाखाली बाबारावांवर खटला भरण्यात आला.

जून, १९०९ मध्ये न्यायाधीशांनी बाबारावांना जन्मठेपेची शिक्षा दिली. न्यायालयाचे असे मत होते की, इतिहास व पौराणिक कथा यांचा वापर ब्रिटिश शासनविरोधी भावना भडकाविण्यासाठी या गीतांमध्ये करण्यात आला

आहे. सावरकरांच्या शिक्षेविरुद्ध उच्च न्यायालयात केलेले अपील नोव्हेंबर, १९०९ मध्ये फेटाळून लावण्यात आले. बाबारावांच्या अटकेनंतर त्यांच्या घरात बरेच आक्षेपार्ह साहित्य पोलिसांना सापडले. बाबारावांना अंदमानच्या तुरुंगात पाठविण्यात आले. बाबारावांना झालेल्या शिक्षेबद्दल नाशिकचा कलेक्टर जॅक्सन हा जबाबदार होता; त्याची हत्या करून सूड घेण्यात आला.

सावरकरांनी लंडनहून काही पिस्तुले गुप्तपणे भारतातील आपल्या सहकारी मित्रांना पाठविली होती. या पिस्तुलांचा वापर करून अभिनव भारतच्या औरंगाबाद शाखेचा एक सदस्य अनंत कान्हेरे याने २१ डिसेंबर, १९०९ रोजी नाशिक येथे जॅक्सनची गोळ्या झाडून हत्या केली. या प्रकरणात कान्हेरे, कर्वे आणि देशपांडे यांना फाशीची शिक्षा दिली; इतर तिघांना जन्मठेपेची शिक्षा झाली. या खटल्यामुळे महाराष्ट्रातील अभिनव भारत संघटनेच्या इतर शाखांची माहिती पोलिसांना कळाली आणि संघटनेच्या अनेक कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. या काळात महाराष्ट्रात अभिनव भारतशिवाय इतरही क्रांतिकारी गट कार्यरत होते.

**बंगालमधील क्रांतिकार्य व अनुशीलन समिती**

बंगालमधील क्रांतिकार्याची सुरुवात वंगभंगाच्या आंदोलनापासून झाली. अरविंद घोष यांचे धाकटे बंधू बारिंद्रकुमार घोष हे बंगालच्या क्रांतिकारी चळवळीचे संस्थापक व नेते होते. इ. स. १९०२ च्या सुमारास बारिंद्रकुमार आणि जतींद्रनाथ बॅनर्जी यांनी कोलकता येथे अनुशीलन समितीची स्थापना केली. लवकरच अनुशीलन समितीच्या अनेक शाखा बंगालमध्ये स्थापन करण्यात आल्या. त्यांच्या गटाच्या वतीनेच 'युगांतर' हे वृत्तपत्र चालविले गेले. या वृत्तपत्रामधील लेखांनी तरुणांना राष्ट्रवाद व क्रांतिकार्याची दीक्षा दिली. समितीमधील तरुणांना शारीरिक शिक्षण व शस्त्रे चालविण्याचे शिक्षण दिले जाई. या समितीच्या वतीने प्रसिद्ध केल्या गेलेल्या 'मुक्ती कोन पथे?' या पुस्तकात भारतीय सैनिकांना क्रांतिकारकांनी आपल्याकडे वळवून घेऊन सशस्त्र संघर्ष केला पाहिजे असे प्रतिपादन केले आहे, तर 'वर्तमान रणनीती' या पुस्तकात सशस्त्र संघर्षावर भर देऊन गनिमीकाव्याने युद्ध कसे लढावे याची माहिती दिली आहे.

या संघटनेचे एक सदस्य हेमचंद्र दास हे इंग्लंडला गेले होते. इतर भारतीय क्रांतिकारकांसमवेत पॅरिसमध्ये जाऊन ते बॉम्ब तयार करण्याची माहिती घेऊन भारतात परत आले. त्यांच्या मदतीने कोलकात्यातील माणिकतला भागात बॉम्बनिर्मितीचे केंद्र सुरू करण्यात आले. या बॉम्बचा वापर मुजफ्फरपूरच्या किंग्ज फोर्ड या जुलमी ब्रिटिश अधिकाऱ्याविरुद्ध करण्याचे ठरविले. त्याने किरकोळ आरोप असताना स्वदेशी चळवळीतील अनेक तरुणांना कठोर शिक्षा ठोठावल्या होत्या; परंतु चुकीने यात किंग्ज फोर्डऐवजी केनेडी कुटुंबातील दोन स्त्रिया मारल्या गेल्या. एप्रिल, १९०८ मध्ये या कृत्याला जबाबदार असलेल्या प्रफुल्ल चाकी याने पोलीस पाठलाग करीत असताना आत्महत्या केली, तर दुसरा तरुण खुदिराम बोस हा पकडला गेला. त्याच्यावर खटला भरला जाऊन त्याला फाशीची शिक्षा झाली. पोलिसांनी या प्रकरणी चौकशी करून बारिंद्रकुमार घोष, अरविंद घोष व त्यांच्या सहकाऱ्यांना अटक करून त्यांच्यावर खटला भरला. हा खटला अलिपूर कटाचा खटला म्हणून ओळखला जातो. यावेळी चौकशीत पोलिसांना कोलकात्यामधील माणिकतला भागात अनुशीलन समितीच्या बॉम्ब बनविण्याच्या केंद्राचा पत्ता मिळाला. हा खटला सुरू असताना सरकारी वकील आणि संबंधित पोलीस अधिकाऱ्याची हत्या करण्यात आली. अलिपूर कटाच्या खटल्यात माफीचा साक्षीदार बनलेल्या आणि ज्याच्यामुळे पोलिसांना समितीची सर्व माहिती कळाली, त्या नरेंद्र गोस्वामी याची हत्या अनुशीलन समितीच्या कन्हैयालाल दत्त आणि सत्येन बोस या सदस्यांनी केली. अलिपूर कटाच्या खटल्यात बारिंद्रकुमार यांना जन्मठेपेची शिक्षा झाली, तर अरविंद घोष निर्दोष सुटले. पुढे अरविंद घोषांनी राजकारणातून संन्यास घेतला व ते अध्यात्माकडे वळले. या क्रांतिकारकांच्या हौतात्म्याने बंगालची जनता प्रभावित झाली.

ढाक्याच्या अनुशीलन समितीने पुलिनदास यांच्या नेतृत्वाखाली आपले कार्य सुरू ठेवले; त्यांनी परदेशातून शस्त्रास्त्रे व दारूगोळा मिळविला; अनेक शासकीय अधिकाऱ्यांच्या हत्या केल्या; काही अधिकाऱ्यांवर बॉम्बहल्ले

## पुढील काळातील क्रांतिकार्य

### महायुद्धकाळातील क्रांतिकारी चळवळ

गदर पार्टीच्या वतीने अमेरिका, कॅनडा व पूर्वेकडील देशांतील भारतीयांनी भारतात जाऊन व्यापक सशस्त्र उठावात भाग घेण्याची भव्य योजना आखण्यात आली. या उठावात ब्रिटिश सेनेतील भारतीय सैनिक, भारतीय क्रांतिकारक आणि परदेशातील भारतीय या सर्वांचा सहभाग आणि समन्वय अपेक्षित होता. या उठावाला प्रत्यक्षात आणण्याची जबाबदारी रासबिहारी बोस व विष्णू गणेश पिंगळे यांच्यावर सोपविली होती; त्यांनी फिरोजपूर, लाहोर, रावळपिंडी इत्यादी ठिकाणांच्या सैनिकी छावण्यांना भेटी देऊन सैनिकांशी उठावासंबंधी बोलणी केली होती. हे सैन्य उठाव करून आपल्या अधिकाऱ्यांना २१ फेब्रुवारी, १९१५ रोजी अटक करून सैन्याचा शस्त्रसाठा आपल्या ताब्यात घेणार होते. वायव्य सरहद्द प्रांतापासून पंजाब, उत्तर प्रदेशात, लखनौपर्यंतच्या प्रदेशात एकाच वेळी उठाव व्हावयाचा होता. पहिल्या महायुद्धात इंग्लंड गुंतल्यामुळे हीच वेळ इंग्लंडविरुद्ध भारतात उठाव करण्यास योग्य आहे असे वाटल्यामुळे गदरच्या अनुयायांनी भारतात जाण्याचे ठरविले.

अमेरिका व इतर देशांतून गदर संघटनेचे कार्यकर्ते भारतात येण्यास सुरुवात झाली होती. इ. स. १९१६ पर्यंत एकूण आठ हजारांपैकी गदर पार्टीच्या तीन हजार सदस्यांना पोलिसांनी अटक केली होती. या उठावाची माहिती ब्रिटिश शासनाच्या गुप्त पोलिसांना समजल्यामुळे उठावाची तारीख बदलून ती १९ फेब्रुवारी करण्यात आली; परंतु त्याचा उपयोग झाला नाही. लाहोर येथे पोलिसांना प्रचंड शस्त्रसाठा सापडला. शासनाने या उठावाशी संबंधित अनेकांना अटक केली; यामुळेच या उठावाला 'लाहोर कट' म्हणून ओळखले जाते. रासबिहारी बोस गुप्तपणे भारत सोडून जपानला गेले व पुढे तिथे त्यांनी आझाद हिंद सेना उभारण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी पार पाडली. बनारस व दानपूरच्या लष्करी छावण्यांमध्ये बंड घडवून आणण्याचा प्रयत्न केल्याबद्दल सचिन्द्रनाथ संन्याल यांना जन्मठेपेची शिक्षा झाली. ज्यांना अटक करण्यात आली होती त्यांच्यावर शासनाविरुद्ध उठाव केल्याचा आरोप ठेवून खटले भरण्यात आले. अमेरिकेतून भारतात या उठावासाठी मुद्दाम आलेल्या पिंगळे यांना फाशीची शिक्षा झाली; याशिवाय इतर पंचेचाळीसजणांना फाशीची शिक्षा झाली, तर दोनशेजणांना दीर्घ मुदतीच्या शिक्षा झाल्या. फाशी झालेल्यांमध्ये या उठावाचे नेते कर्तारसिंग सराभा, बक्षिससिंग, जगनसिंग आदींचा समावेश होता.

अशा रीतीने गदर चळवळीचा शेवट झाला. या चळवळीने सामान्य भारतीयांनाही आपल्या आर्थिक दुर्दशेला परकीय राजवट जबाबदार आहे हे कळले. या चळवळीने शेतकऱ्यांमध्ये काम करणारे कार्यकर्ते घडविले, ज्यांनी पुढे या क्षेत्रांत कार्य केले. या उठावाने सामान्य जनतेमधील ब्रिटिश राजवटीबद्दलचा असंतोष स्पष्ट झाला.

**दोन महायुद्धांदरम्यानची क्रांतिकारी चळवळ**

लाहोर कटाच्या अपयशानंतर व गदर पार्टीच्या अयशस्वी उठावानंतर बऱ्याच काळासाठी भारतात क्रांतिकारी चळवळ अस्तित्वात उरली नव्हती; बरेचसे महत्त्वाचे क्रांतिकारक तुरुंगात होते; काहीजण भूमिगत झाले होते आणि काहीजण देशाबाहेर गेले होते. जहालांचे नेते आणि क्रांतिकारकांचे पाठीराखे लोकमान्य टिळक यांनी होमरूल चळवळ सुरू केली व या कालखंडात त्यांचा बराचसा काळ इंग्लंडमध्ये गेला. यानंतर गांधीजींचा राजकीय क्षेत्रात उदय झाला व त्यांचा अहिंसेवर विश्वास असल्याने क्रांतिकारकांना त्यांच्याकडून प्रोत्साहन मिळणे शक्य नव्हते; उलट, त्यांच्या असहकार चळवळीत अनेक क्रांतिकारकांनी भाग घेतला; परंतु गांधीजींनी अचानक चळवळ मागे घेतल्यावर, निराश झालेल्या तरुणांनी पुन्हा क्रांतिकार्याला सुरुवात केली. इ. स. १९१९ च्या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शासनाशी सहकार्य करावे असा एकूण मतप्रवाह होता. यावेळी तुरुंगात असलेल्या अनेक क्रांतिकारकांची शासनाने तुरुंगातून सुटका केली; यामागे हेतू असा होता की, सुधारणा राबविण्यासाठी अनुकूल वातावरण तयार व्हावे. इ. स. १९२४ च्या सुमारास क्रांतिकारकांचे गट पुन्हा उदयास येण्यास प्रारंभ झाला. क्रांतिकारकांची तुरुंगातून सुटका युद्ध जिंकल्याच्या आनंदानेही झाली; कारण युद्धविजयात भारताचे योगदान मोठे होते.

सचिन्द्रनाथ संन्याल इ. स. १९२० मध्ये तुरुंगातून सुटून आले होते. त्यांनी लिहिलेल्या 'बंदी जीवन' या आत्मचरित्राने अनेक तरुणांना क्रांतिकार्याची प्रेरणा दिली होती. या काळात क्रांतिकारकांनी व्यक्तिगत साहसी कृत्ये करण्यापेक्षा समूहाने एकत्र येऊन कट आखण्याला महत्त्व दिले. तसेच क्रांतिकारकांवरील धार्मिक प्रभाव कमी होऊन राजकीय विचारांचा प्रभाव अधिक वाढला. या काळातील क्रांतिकारकांनी भांडवलशाही व साम्राज्यवादाला विरोध करून शोषणमुक्त समाज, समाजवाद, प्रजासत्ताक राज्यपद्धती इत्यादी राजकीय मूल्यांचा पुरस्कार केला. इ. स. १९१७ मध्ये झालेल्या साम्यवादी रशियन क्रांतीचा प्रभाव क्रांतिकारकांवर पडला. या काळातील क्रांतिकारी चळवळ मुख्यत्वे पंजाब, उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश आणि बंगालमध्ये दिसून येते.

**हिन्दुस्थान रिपब्लिकन असोसिएशन**

ऑक्टोबर, १९२४ मध्ये उत्तर प्रदेशात कानपूर येथे विविध प्रांतांत कार्य करणाऱ्या क्रांतिकारकांनी पुन्हा क्रांतिकार्याला चालना देण्याचे ठरविले; यांमध्ये सचिंद्रनाथ संन्याल, जोगेशचंद्र चटर्जी, राजेंद्रनाथ लाहिरी, रामप्रसाद बिस्मिल यांचा समावेश होता. या बैठकीत 'हिन्दुस्थान रिपब्लिकन असोसिएशन' या केंद्रीय संघटनेची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला. या संघटनेने विविध प्रांतांत काम करणाऱ्या संघटनांशी सातत्याने संपर्क ठेवला. संघटनेचा उद्देश ब्रिटिश सत्तेविरुद्ध सशस्त्र उठाव करून भारताला स्वतंत्र करणे आणि सर्व प्रांतांचे मिळून गणराज्य स्थापन करणे हे होते.

संघटनेने आपल्या कार्याला लागणारा पैसा उभा करण्यासाठी सरकारी खजिना लुटण्याचे ठरविले. यासाठी क्रांतिकारकांनी शहारणपूर ते लखनौ रेल्वेमार्गावरील लखनौ जवळच्या काकोरी येथे ९ ऑगस्ट, १९२५ रोजी रेल्वे अडवून त्यातील सरकारी खजिना लुटला. या प्रकरणात या संघटनेच्या अनेक सदस्यांना अटक करण्यात आली व त्यांच्यावर आरोप ठेवून खटला चालविण्यात आला. इ. स. १९२७ मध्ये खटल्याचा निकाल लागून रामप्रसाद बिस्मिल, राजेंद्रनाथ लाहिरी, रोशनलाल आणि अश्फाकउल्ला यांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली; इतर चौघांना जन्मठेप झाली, तर उर्वरित लोकांना दीर्घ मुदतीच्या शिक्षा झाल्या. मात्र, संघटनेचे चंद्रशेखर आझाद

पोलिसांच्या हाती लागले नाहीत. खटला सुरू असताना आरोपींना तुरुंगात दिल्या जाणाऱ्या क्रूर वागणुकीविरुद्ध उपोषण करून क्रांतिकारकांनी ही बाब जनतेसमोर आणली.

## हिन्दुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशन

काकोरी कटात हिन्दुस्थान रिपब्लिकन असोसिएशनचे अनेक सदस्य सरकारच्या हाती सापडले असले तरी, नाउमेद न होता संघटनेच्या उर्वरित सदस्यांनी संघटनेची पुनर्बांधणी करण्याचे ठरविले. उत्तर भारतातील अनेक प्रांतांतील क्रांतिकारक एकत्र आले आणि नऊ व दहा डिसेंबर, १९२८ रोजी दिल्ली येथे बैठक घेतली. या बैठकीत संघटनेच्या नावात सोशालिस्ट (समाजवादी) हा शब्द घालण्यात येऊन 'हिन्दुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशन' असे नवे नामकरण करण्यात आले; यावरून भारतात गणराज्याच्या स्थापनेबरोबरच समाजवादाची स्थापना करणे हे या संघटनेचे ध्येय होते हे स्पष्ट झाले; तसेच केवळ स्वातंत्र्य मिळविणे पुरेसे नाही, तर विषमता दूर करून आर्थिक समता समाजात प्रस्थापित होणे हे त्यांना महत्त्वाचे वाटत होते. या काळात सोव्हिएत रशियातील समाजवादाच्या अंमलबजावणीचा प्रभाव काही क्रांतिकारकांवर होता. या संघटनेचे वेगळे सशस्त्र दल (आर्मी) तयार करण्यात येऊन त्याचे नेतृत्व चंद्रशेखर आझादांकडे देण्यात आले.

व्यक्तिश: साहसी कृत्ये करण्यापेक्षा क्रांतिकार्याला व्यापक सामाजिक पाठिंबा मिळविणे हे ध्येय असतानाही, या संघटनेला (हिन्दुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशन) तशा प्रकारचे कृत्य करावे लागले. ३० ऑक्टोबर, १९२८ रोजी लाहोर येथे सायमन कमिशनच्या विरोधात झालेल्या निदर्शनाचे नेतृत्व करणारे लाला लजपतराय पोलिसांच्या लाठीमारात गंभीर जखमी झाले आणि १७ नोव्हेंबर रोजी त्यांचा मृत्यू झाला. लालाजींच्या हत्येचा बदला या संघटनेने घेण्याचे ठरविले. १७ डिसेंबर, १९२८ रोजी लाहोर येथे लालाजींवरील लाठीमारात हात असलेल्या सॉंडर्स या पोलीस अधिकाऱ्याची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. या हत्येमध्ये भगतसिंग आणि राजगुरू यांनी भाग घेतला होता. एका निवेदनाद्वारे संघटनेने हे स्पष्ट केले की, 'सॉंडर्सची हत्या ही वैयक्तिक शत्रुत्वामुळे केली गेली नसून जुलमी, अत्याचारी अशा ब्रिटिश सत्तेचा तो एक प्रतिनिधी होता, या कारणासाठी त्याची हत्या करण्यात आली आहे. तसेच लाला लजपतरायसारख्या ज्येष्ठ नेत्याच्या हत्येचा व राष्ट्रीय अपमानाचा बदला घेण्याचा तो प्रयत्न होता'. असे म्हटले गेले आहे की, लालाजींवरील लाठीमाराला स्कॉट हा मुख्य पोलिस अधिकारी जबाबदार होता आणि त्याचीच हत्या क्रांतिकारकांना करावयाची होती, पण यात चुकून सॉंडर्स हा कनिष्ठ अधिकारी त्यांच्याकडून मारला गेला. परंतु बाळशास्त्री हरदास यांच्या मते, लाहोरच्या कटातील खटल्यातील माफीचा साक्षीदार झालेल्या जयगोपाल याच्या न्यायालयीन वक्तव्यातील चुकीच्या विधानामुळे असा एक गैरसमज निर्माण झाला आहे. क्रांतिकारकांच्या दृष्टीने स्कॉट व सॉंडर्स हे दोघेही सारखेच पापी होते; पण त्यातल्या त्यात प्रत्यक्ष आघात करणारा म्हणून सॉंडर्स क्रांतिकारकांच्या डोळ्यात अधिक सलत होता. तेव्हा तो चुकीने मारला गेला नसून योजनेनुसारच मारला गेला; कारण लाठीमाराची आज्ञा स्कॉटची होती व प्रत्यक्षात सॉंडर्सने त्यांना लाठी मारली होती. (भारतीय स्वातंत्र्यसमर. १८५७ ते सुभाष, ले. बाळशास्त्री हरदास, काळ प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९५७. पृष्ठ ३६०) अशा रीतीने संघटनेने सॉंडर्सच्या हत्येची जबाबदारी स्वीकारली. संघटनेचे सदस्य लवकरच पंजाब सोडून इतरत्र निघून गेले. चंद्रशेखर आझादांनी बंगाली क्रांतिकारकांकडून बॉम्ब तयार करण्याचे प्रशिक्षण घेऊन बॉम्ब तयार करण्यास सुरुवात केली.

इ. स. १९२९ मध्ये सरकारने केंद्रीय कायदेमंडळापुढे दोन बिले सादर केली; यांपैकी पहिले बिल 'पब्लिक सेफ्टी बिल' व दुसरे 'ट्रेड डिस्प्यूट बिल' हे होते. पहिल्या विधेयकाद्वारे नागरिकांच्या हक्कावर आणि स्वातंत्र्यावर बंधने घालण्याची तर दुसऱ्या विधेयकाद्वारे कामगारांच्या हक्कांवर बंधने घालण्याची सरकारने तरतूद केली होती. केंद्रीय कायदेमंडळातील निवडून आलेल्या भारतीय सदस्यांनी या बिलांना विरोध केला होता; तरीही या बिलांचे कायद्यात रूपांतर होण्याची शक्यता होती. या बिलाला आपला विरोध करण्यासाठी ८ एप्रिल, १९२९ रोजी

भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी बिलाच्या चर्चेच्या वेळी केंद्रीय कायदेमंडळात बॉम्बस्फोट घडवून आणले, पत्रके फेकली आणि पळून न जाता स्वत:ला अटक करवून घेतली. या पत्रकात क्रांतिकारकांनी आपली भूमिका स्पष्ट केली होती. त्यांनी पत्रकात नमूद केले होते की, 'भारतीयांचे ब्रिटिश सत्तेने चालविलेले शोषण, भारतीयांवरील अत्याचार, लालाजींचा मृत्यू, कामगारांच्या हक्कांवर घालण्यात येणारे निर्बंध या सर्वांविरुद्ध आम्ही निषेध नोंदवित आहोत.' तसेच आपल्याला अपेक्षित असलेल्या क्रांतीबद्दल हे मत व्यक्त केले की, देशाला स्वातंत्र्य मिळवून देणे हा क्रांतीचा पहिला टप्पा असून शोषणविरहित, आर्थिक विषमता नसलेला, समतेवर आधारित समाज व अर्थव्यवस्थेची निर्मिती हा आपला दुसरा टप्पा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. क्रांती म्हणजे लष्करी उठाव नव्हे, तर महत्त्वपूर्ण राजकीय व आर्थिक बदल घडवून आणणे आणि या बदलात बहुसंख्य जनता, विशेषत: ग्रामीण जनता सामील होणे महत्त्वाचे आहे हे त्यांचे मत होते.

### लाहोर कटाचा खटला

केंद्रीय कायदेमंडळातील बॉम्बस्फोटानंतर पोलिसांनी केलेल्या तपासात पंजाबातील क्रांतिकारी चळवळीबद्दल माहिती त्यांना कळली. लाहोर येथे बॉम्ब तयार करण्याची फॅक्टरी पोलिसांना सापडली; तसेच या संघटनेबद्दल (हि.सो.रि.अ.) पोलिसांना सर्व माहिती कळाली.

सॉंडर्सची हत्या करणाऱ्यांचाही तपास पोलिसांनी लावला आणि सरकारविरुद्ध कट केल्याचा आरोप, तसेच सॉंडर्सची हत्या केल्याचा आरोप क्रांतिकारकांवर ठेवून त्यांच्यावर खटला भरण्यात आला. लाहोर कटाचा निकाल ऑक्टोबर, १९३० मध्ये लागला; यात भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना फाशीची शिक्षा देण्यात आली. काहींना जन्मठेप तर काहींना दीर्घ मुदतीच्या शिक्षा देण्यात आल्या. या तिघांची शिक्षा रद्द करण्यासाठी सर्व स्तरांवर प्रयत्न करण्यात आले; परंतु ते अयशस्वी ठरले. मार्च, १९३१ मध्ये भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांना फाशी देण्यात आली. तुरुंगात असताना त्यांनी आपल्याला गुन्हेगार कैद्यांसारखी वागणूक न देता, राजकीय कैदी किंवा बंदी म्हणून अधिक चांगली वागणूक मिळावी यासाठी उपोषण केले. या उपोषणातच जतिंद्रनाथ दास यांचा तुरुंगात दु:खद अंत झाला.

## बंगालमधील क्रांतिकारी चळवळ

लाहोर कटाच्या खटल्यात पोलिसांना चंद्रशेखर आझादांना गोवता आले नाही; कारण ते भूमिगत झाले होते. आझादांनी आपले अस्तित्व सरकारला दाखवून देण्यासाठी गव्हर्नर जनरल आयर्विन ज्या रेल्वेने प्रवास करणार होते त्या गाडीला दिल्लीजवळ बॉम्ब वापरून अपघात घडवून आणला; परंतु यात आयर्विन बचावले. मात्र फेब्रुवारी, १९३१ मध्ये अलाहाबाद येथे अचानक पोलिसांकडून आझाद घेरले गेले व झालेल्या चकमकीत त्यांना हौतात्म्य आले. क्रांतिकारकाला व देशभक्ताला शोभेल असा निरोप जनतेने या क्रांतिकारकाच्या अंत्यसंस्काराच्या वेळी दिला. यानंतर क्रांतिकारकांकडून तुरळक घातपाताचे प्रकार किंवा सरकारी अधिकाऱ्यांवर हल्ले केले गेले; परंतु इ. स. १९३५ च्या नंतर उत्तर भारतातील क्रांतिकारी चळवळ संपुष्टात आली.

उत्तर भारताप्रमाणेच बंगालमध्येही इ. स. १९२२ नंतर क्रांतिकारक सक्रिय झाले. जानेवारी, १९२४ मध्ये कोलकाता येथे पोलीस कमिशनर चार्लस् टेगार्ड यांच्या हत्येचा प्रयत्न गोपीनाथ सहा यांनी केला. गोपीनाथ यांना याबद्दल फाशीची शिक्षा देण्यात आली. पोलिसांनी क्रांतिकारी संघटनांविरुद्ध मोहीम उभारल्यामुळे क्रांतिकारक काही काळ शांत राहिले.

पुन्हा क्रांतिकारकांनी शासनाविरुद्ध आघाडी उघडली. या मोहिमेचे नेतृत्व सूर्यसेन यांच्याकडे होते. ते चितगाव येथील शाळेत शिक्षक होते. असहकार चळवळीत त्यांनी भाग घेतला होता. 'मास्तरदा' म्हणून ओळखले जाणारे सूर्यसेन कुशल संघटक होते. त्यांच्या क्रांतिकारी गटात अनंतसिंग, गणेश घोष, अंबिका चक्रवर्ती यांसारखे तरुण-तरुणी सामील होते. शासनाविरुद्ध व्यापक सशस्त्र उठाव करण्यासाठी, सरकारी शस्त्रागारावर हल्ला करून शस्त्रे

लुटण्याची धाडसी योजना सूर्यसेन यांनी आखली. यांपैकी पहिला हल्ला दोन शस्त्रागारांवर करण्याचे ठरले. १८ एप्रिल, १९३० मध्ये केलेल्या हल्ल्यामध्ये प्रथम चितगावचा इतर गावांशी दळणवळण व संदेशवहनाचा सर्व संपर्क तोडण्यात आला; नंतर एका गटाने गणेश घोषच्या तर दुसऱ्या गटाने निर्मल घोषच्या नेतृत्वाखाली शस्त्रागारे लुटली. यावेळी त्यांचा संघर्ष ब्रिटिश पोलिसांशी झाला. या घटनेनंतरही क्रांतिकारकांचा संघर्ष पोलिसांशी चालूच राहिला.

फेब्रुवारी, १९३३ मध्ये सूर्यसेन फितुरीने पकडले गेले. त्यांच्यावर खटला भरण्यात येऊन त्यांना फाशीची शिक्षा देण्यात आली. चितगाव शस्त्रागार लुटणाऱ्या बहुतेक क्रांतिकारकांना पकडण्यात आले. त्यांच्यावर खटले भरून त्यांना वेगवेगळ्या कालावधीच्या शिक्षा देण्यात आल्या. या क्रांतिकारी गटात काही तरुणींचाही सहभाग होता. प्रीतिलता वड्डेदार ही तरुणी पोलिसांशी झालेल्या चकमकीत जखमी झाली आणि तिने जखमी झाल्यावर प्राणार्पण केले, तर कल्पना दत्त हिला जन्मठेपेची शिक्षा झाली. डिसेंबर, १९३१ मध्ये कोम्मिला येथील शांती घोष व सुनीती चौधरी या शाळकरी मुलींनी जिल्हा मॅजिस्ट्रेटला ठार मारले. इ. स. १९३२ मध्ये वीणा दास या तरुणीने पदवीदान समारंभात बंगालच्या गव्हर्नरवर गोळ्या झाडल्या. यानंतरही बंगालमध्ये बॉम्बस्फोट किंवा ब्रिटिश अधिकाऱ्यांवर हल्ल्यांच्या तुरळक घटना घडत राहिल्या.

उत्तर भारतात चंद्रशेखर आझादांच्या मृत्यूनंतर आणि बंगालमध्ये सूर्यसेन यांच्या हौतात्म्यानंतर क्रांतिकारी चळवळ जवळजवळ संपुष्टात आली. क्रांतिकारकांनी तुरुंगातून बाहेर आल्यानंतर राजकीय चळवळीत भाग घेतला. इ. स. १९३५ च्या कायद्याने प्रांतात भारतीयांच्या हाती मर्यादित का होईना सत्ता येणार होती. इ. स. १९४२ च्या 'छोडो भारत' चळवळीच्या प्रारंभी महत्त्वाच्या केंद्रीय नेत्यांना शासनाने अटक केली होती. ही चळवळ जनतेने नेत्यांच्या अनुपस्थितीत चालविली. या चळवळीत सैन्य व पोलिसांशी जो संघर्ष झाला त्यात दळणवळण व संदेशव्यवस्था उद्ध्वस्त करण्यात आली. जे बॉम्बस्फोट झाले ते पाहता यात क्रांतिकारी गटाचा सहभाग असला पाहिजे हे स्पष्ट होते. जी प्रतिसरकारे या काळात स्थापन झाली ती बंगाल, उत्तर प्रदेश व महाराष्ट्र या पूर्वीपासूनच क्रांतिकार्यासाठी प्रसिद्ध असलेल्या प्रांतांत होती आणि १९४२ नंतर सत्तांतरांची बोलणी ब्रिटिश सरकारकडून सुरू झाल्यामुळे क्रांतिकार्याची फारशी गरज उरली नव्हती.

## क्रांतिकारी चळवळीचे मूल्यमापन

क्रांतिकारकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्यापरीने प्रयत्न केले. या संदर्भात त्यांनी बजावलेल्या कामगिरीचे मूल्यमापन पुढीलप्रमाणे करता येईल–

### जनतेचा असंतोष व्यक्त झाला

शासनाच्या अत्याचारांमुळे व अन्यायी धोरणामुळे आणि भारतीयांच्या दुर्दशेमुळे भारतीय जनतेत काही वेळ असंतोषाची लाट उसळून येत असे. जसे, जालियनवाला हत्याकांड, लाला लजपतराय यांच्यावरील लाठीहल्ला, टिळकांना झालेली शिक्षा, बंगालची फाळणी, दुष्काळात झालेले भारतीयांचे मृत्यू, या पार्श्वभूमीवर ब्रिटिश साम्राज्याच्या वैभवाचे प्रदर्शन इत्यादी. यांसारख्या घटनांबद्दल भारतीयांच्या असंतोषाला क्रांतिकारकांनी आपल्या कृत्यातून वाचा फोडली आणि जनतेच्या असंतोषाची जाणीव शासनाला करून दिली. क्रांतिकारकांनी ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या हत्या केल्यामुळे भारतीय जनतेतील असंतोषाकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले. सरकारी अधिकाऱ्यांमध्ये व नोकरशाहीत केलेल्या हत्यांद्वारे क्रांतिकारकांनी दहशत निर्माण केली; जी बहुसंख्य जनता शासनाचे अत्याचार निमूटपणे सहन करीत होती, तिच्या वतीने क्रांतिकारकांनी हा इशारा दिला की, यापुढे जनता शासनाचे अत्याचार सहन करणार नाही.

### स्वातंत्र्याच्या लढ्यात योगदान

काही अधिकाऱ्यांना ठार मारून स्वातंत्र्य मिळणार नाही हे क्रांतिकारकांना ठाऊक होते; परंतु जनतेवर अत्याचार करण्याबाबत शासनाला धाक वाटावा एवढा प्रयत्न त्यांनी केला. क्रांतिकारकांना एडन किंवा अंदमानसारख्या

ठिकाणी दूर ठेवले जात होते; यातून शासनाला त्यांची दहशत कितपत होती याचा अंदाज येतो. क्रांतिकारकांना याची जाणीव होती की, सर्वसामान्य जनता ब्रिटिश सत्तेविरुद्ध उठाव करणार नाही; कारण, या मार्गात अनेक धोके होते. मरणाला न भिता देशासाठी वाटेल तो त्याग, कष्ट व बलिदान करणाऱ्यांची संख्या नेहमीच कमी असते, या हेतूने कमीत कमी मनुष्यबळ खर्ची घालून त्यांनी जास्तीत जास्त परिणाम साधण्याचा प्रयत्न केला.

**हौतात्म्यातून जनतेला प्रेरणा दिली**

सर्व सुखांना दूर सारून मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी या क्रांतिकारी तरुणांनी मृत्यूला कवटाळले; काहींनी तुरुंगवासाच्या यातना सहन केल्या; आपल्या संसारावर निखारे ठेवले. त्यांच्या आत्मबलिदानाने अनेकांना देशसेवेची प्रेरणा मिळाली; ब्रिटिश शासनविरोधी भावना तीव्र केली आणि त्यांच्यातील राष्ट्रवादाची भावना अधिक प्रबळ केली. क्रांतिकारकांबद्दल जनतेत अपार आदर होता आणि तो जनतेने अनेक प्रसंगी व्यक्त केला. जनतेचे क्रांतिकारकांना मिळणारे प्रेम ही क्रांतिकारकांच्या देशसेवेची पावती होती. जनतेने क्रांतिकारकांपासून प्रेरणा घेऊन आपल्यापरीने राष्ट्रीय चळवळीत योगदान दिले.

क्रांतिकारक व शासन यांच्यातील लढाई व संघर्ष हा विषम होता. शासनाजवळ ब्रिटिश साम्राज्याची आर्थिक व लष्करी शक्ती होती. क्रांतिकारकांना या विषम लढाईत यश मिळण्याची शक्यता जवळजवळ नव्हतीच; तरीही देशाच्या सन्मानासाठी त्यांनी लढा दिला.

❖❖❖❖